इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - ३२४ ▸ रविवार,ता.२९ मार्च २०२६ ▸ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

**मुळव्याध...**
आग पडते रक्त पडते कोंब आहे सूज फणक वेदना जखम फिशर टोचल्यासारखे वाटते पाइल्स पिस्टोला ऑपरेशन सांगितले आहे... आमचे आयुर्वेदिक औषध आजच मागवा औषध किंमत फक्त रुपये 3500. ऑपरेशनची गरज नाही.. पाच दिवसात शंभर टक्के आराम. वर्षांचा अनुभव औषध घरपोच कुरिअरने मिळेल. आजच फोन करा ऑफर फक्त आजच आहे औषध लिंबू सरबत किंवा ताका सोबत घ्यावे दुसऱ्या दिवशी रक्तपणाचे थांबते आज थांबते पाच दिवसात शंभर टक्के तुम्ही बरे व्हा पण औषध 30 दिवस घ्या. आयुर्वेदिक औषध.. पोळ्या मलम पावडर साईड इफेक्ट नाही.. पंचवीस वर्षांचा अनुभव.
**मो. 7387447577**
नाव पत्ता व्हाट्सअप करावा पिन कोड सहित

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव



केसांच्या आरोग्यासाठी संजीवनी...
**योगिनी**
भृंग केश तेल
डॉ. अमोल मगदुम यांचे अत्यंत गुणकारी उत्पादन
सर्व मेडिकल स्टोअर्स मध्ये उपलब्ध
Customer Care 9270 14 5446

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# एलपीजी तीन महिन्यांनी बंद होणार ?

नवी दिल्ली,ता.२८



राज्यातील विविध शहरात स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला असताना राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी कदाचित तीन महिन्यांत एलपीजी गॅस बंद होईल, असे खळबळजनक वक्तव्य केले आहे.सध्या पीएनजी गॅस स्वस्त पडत आहे. त्यामुळे त्याचा अधिकाधिक वापर झाला पाहिजे.केंद्राच्या एका पत्रकात तीन महिन्यांनी कदाचित एलपीजी बंद होईल असा उल्लेख आहे. त्यामुळे आपण पीएनजीच्या जास्तीत जास्त जोडण्या घेतल्या पाहिजेत, असे ते म्हणाले.

## ना.छगन भुजबळ यांचे दिल्लीत वक्तव्य; पीएनजीची जोडणी करून घेण्याचे आवाहन

नवी दिल्लीत शनिवारी केंद्रीय शहरी विकास मंत्री मनोहरलाल खट्टर व केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या नेतृत्वात एक महत्त्वाची बैठक झाली.या बैठकीत निवासी व व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी व पीएनजी गॅसचा अधिक चांगला व सुलभ पुरवठा उपलब्ध करून देणे तसेच एका निश्चित कालावधीत पीएनजी सेवांचा विस्तार करण्याच्या मुद्यावर चर्चा झाली. त्यानंतर महाराष्ट्र सदनात आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री मंत्री छगन भुजबळ यांनी हे विधान केले.



भुजबळ म्हणाले, देशातील निवासी व व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी गॅसचा पुरवठा सुलभपणे कसा करता येईल? त्यात कोणत्या अडचणी आहेत याचा आढावा घेण्यासाठी शनिवारी दिल्लीत सर्व राज्यांच्या सचिवांना आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना बोलावण्यात आले होते. या बैठकीला केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी, प्रल्हाद जोशी व

(पान २ वर)

छगन भुजबळांनी यावेळी गॅस टंचाईमुळे केरोसीनचा अधिकाधिक वापर करण्यावरही भर दिला. ते म्हणाले, राज्य सरकारकडे केरोसीन उपलब्ध होते. पण आपण ते देऊ शकत नव्हतो. कारण, उच्च न्यायालयाने त्यावेळी एक आदेश दिला होता. आता आपण न्यायालयाला कळवले आहे. त्यानुसार, जिथे एलपीजी व पीएनजी कमी आहे, तिथे केरोसीनचा वापर करण्याची परवानगी दिली आहे.ज्या जुन्या डिलर्सच्या परवान्यांचे नुतनीकरण प्रलंबित होते, त्यांनी ते झाले असे समजून कामाला लागावे. या प्रकरणी पेट्रोल पंपावर केरोसीनचे टँकर उभे करून तेथून पुरवठा करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे भुजबळ म्हणाले.

# भीती का विश्वास प.बंगालची निवडणूक ठरवणार-शहा

कोलकाता,ता.२८–



पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी कोलकाता येथे तृणमूल काँग्रेस सरकार आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. राज्य गेल्या १५ वर्षांपासून भीती, भ्रष्टाचार आणि लांगुलांचनचे राजकारण करत आहे आणि बंगालची जनता भीती निवडणार की विश्वास हे आगामी निवडणुका ठरवतील.

अमित शहा यांनी तृणमूल काँग्रेस सरकारविरोधात एक सविस्तर आरोपपत्रही प्रसिध्द केले. त्यांनी म्हटले की, हा कोणत्याही एका पक्षाचा दस्तऐवज नाही, तर बंगालच्या जनतेचा आवाज आहे, जो त्यांचा पक्ष समोर आणत आहे. हे

(पान २ वर)

## ममता बॅनर्जी यांच्याकडून सहानुभूतीचे राजकारण

अमित शहा म्हणाले, बंगालच्या जनतेला हे ठरवायचे की, त्यांना भीती, भ्रष्टाचार आणि हिंसाचाराचे राजकारण सुरू ठेवायचे की शांतता, विकास आणि विश्वासाच्या मार्गावर पुढे जायचे आहे. यावेळी जनता भाजपाला स्पष्ट बहुमत देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# खरातच्या कोणत्याही कृत्यात सहभागी नाही-केसरकर



मुंबई,ता.२८–

भोंदूबाबा अशोक खरात अघोरी पूजा करतोय हे माहिती असते तर मी त्याच्याकडे कधीच गेलो नसतो, मी साईभक्त आहे. अशोक खरातच्या कोणत्याही कृत्यात आपला सहभाग नाही, कोणत्याही महिलेची त्याच्याशी ओळख करून दिली नाही, असे स्पष्टीकरण माजी मंत्री आणि शिंदे गटाचे आमदार दीपक केसरकर यांनी दिले.

संजय राऊत आणि त्यांच्या कंपूने जे काही राजकीय षडयंत्र रचले आहे ते कधीही यशस्वी होणार नाही. मी लवकरच या संदर्भात सल्ला घेणार आहे. त्यावर कोणती कारवाई करायची हे ठरवू.

खरात प्रकरणाशी आपला संबंध जोडला जात आहे, तो राजकीय द्वेषाने.ज्यावेळी शिवसेनेमध्ये संघर्ष पेटला होता, त्यावेळी मी एकनाथ शिंदेंची बाजू महाराष्ट्रासमोर आणली. त्यामुळे ठाकरे गटाचा आपल्यावर राग आहे. त्या रागापोटी बदनाम केले जात असल्याचा आरोप करत मी साईबाबांचा भक्त आहे, त्यामुळे कुठलीही अघोरी पूजा किंवा कृत्य करत नाही,असे केसरकरांनी स्पष्ट केले.

केसरकर म्हणाले की,अशोक खरातला अटक होईपर्यंत मला त्याच्या कृत्याची माहिती नव्हती. एखाद्याचा फोटो सोबत असणे म्हणजे त्याच्या वाईट कृत्यात सहभागी असणे असे नाही. खरातला वाचवण्यासाठी मी कुठल्याही पोलीस

(पान २ वर)

## दोन पाकिस्तानी दहशतवाद्यांना अटक

नवी दिल्ली, ता.२८–

पंजाब आणि जम्मू-काश्मिर पोलिसांच्या संयुक्त कारवाईत दोन पाकिस्तानी दहशतवाद्यांना अटक करण्यात आली. अब्बू गाबा हुरैरा आणि उस्मान अशी त्यांची नांवे आहेत. पोलिसांनी मालेरकोटला येथील शेरवानी कोट गावात केलेल्या छापेमारीत हे दोघे सापडले. ही कारवाई स्थानिक नशा तस्करी विरोधी मोहिमेतून झाली होती.


या मोहिमेत एका स्थानिक अंमली पदार्थ तस्कराच्या चौकशीत या दोन व्यक्तींबद्दल महत्त्वाची माहिती मिळवली. माहितीनुसार, दोघांची ओळख जम्मू-काश्मीरमध्ये सूचीबद्ध दोन वॉन्टेड दहशतवाद्यांशी जुळते. गावकऱ्यांकडून

(पान २ वर)

# रशियाची पेट्रोल निर्यातीवर बंदी

## देशांतर्गत इंधनाचा तुटवडा भासू नये म्हणून निर्णय

मॉस्को/नवी दिल्ली,ता.२८–



मध्य पूर्वेतील युद्धामुळे जगभरात खनिज तेलाची टंचाई निर्माण झाली आहे. पेट्रोल, डिझेलचा तुटवडा जाणवू लागला. आखाती देशांमधून होणारी खनिज तेलाची निर्यात रोडावल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात रशियन तेलाची मागणी वाढली. त्यातच रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी १ एप्रिलपासून गॅसोलिनची (पेट्रोल) निर्यात रोखण्याचा निर्णय घेतला आहे.यामुळे याचा भारतावर फारसा परिणाम होणार नसला तरी चीन, तुर्कीसाठी मोठा धक्का मानला जातो.

भारताकडे दररोज ५.६ दशलक्ष बॅरल तेल शुध्द करण्याची प्रचंड क्षमता आहे. भारत कच्च्या तेलावर प्रक्रिया करून स्वतःचे पेट्रोल आणि डिझेल तयार करतो. इतकेच नाही तर भारत मोठ्या प्रमाणात शुध्द केलेले इंधन जगाला निर्यात देखील करतो. त्यामुळे रशियाच्या पेट्रोल बंदीचा भारताच्या थेट पुरवठ्यावर कोणताही परिणाम होणार नाही.

मध्य पूर्वेतील संघर्षामुळे जगभरात इंधन टंचाई निर्माण झाली. या परिस्थितीत देशांतर्गत मागणीला प्राधान्य देण्याचा निर्णय रशियानं घेतला आहे. आखाती देशातील युद्धामुळे जागतिक इंधन बाजारात उलथापालथ सुरु असताना पुतीन यांनी घेतलेला निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. रशियाच्या निर्णयाचा थेट फटका चीन आणि तुर्कीसारख्या देशांना बसेल. दोन्ही देशांसाठी हा मोठा धक्का आहे.मात्र भारतावर याचा फारसा परिणाम होणार नाही. जागतिक संकटामुळे खनिज तेल आणि पेट्रोलियम उत्पादकांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. परदेशांमध्ये रशियन इंधनाला मोठी मागणी आहे, अशी माहिती रशियाचे उपपंतप्रधान नोवाक यांनी दिली. गॅसोलीनची निर्यात थांबवण्याचा निर्णय नोवाक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये झाला.बैठकीत देशांतर्गत पेट्रोलियम उत्पादन आणि त्यांना असलेली मागणी यांचा आढावा घेण्यात आला.रशिया दिवसाकाठी १ लाख २० हजार ते १ लाख ७० हजार बॅरल गॅसोलीनची निर्यात करतो. चीन, तुर्की, ब्राझील, आफ्रिका, सिंगापूर यांच्याकडून गॅसोलीनची सर्वाधिक खरेदी होते.

## परदेशी कोर्टाचा घटस्फोट वैध नाही

नवी दिल्ली,ता.२८–

भारतीय कायदा, विशेषतः हिंदू विवाह अधिनियम (एचएमए), अंतर्गत मान्यता न दिलेल्या आधारांवर दिलेला विदेशी तलाक भारतात वैध मानला जाणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करत, १८ वर्षे वेगळे राहणाऱ्या जोडप्याला अनुच्छेद १४२ अंतर्गत आपली विशेष शक्ती वापरून अंतिम घटस्फोट दिला. सर्वोच्च न्यायालयातील न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

हे प्रकरण भारतात हिंदू रीतीनुसार झालेल्या विवाहाशी संबंधित आहे

(पान २ वर)

# आषाढी वारीसाठी ८ जुलैला माऊलींचे पालखी प्रस्थान



पंढरपूर,ता.२८(प्रतिनिधी) –

आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा ८ जुलै रोजी पंढरपूरला प्रस्थान ठेवणार आहे. २४ जुलै रोजी पंढरपूरला पालखी सोहळा पोहचणार आहे. या वर्षी प्रस्थानाची वेळ दुपारी तीनची आहे. १७ दिवस मुक्काम, ४ गोल तर ३ उभे रिंगण होणार असल्याची माहिती पालखी सोहळाप्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांनी दिली.

आषाढी एकादशी २५ जुलै रोजी साजरी होणार आहे. येथील संत ज्ञानेश्वर महाराज मठात आळंदी संस्थानची बैठक झाली.ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता शेकडो मैल पायी चालत सावळ्या विठुरायाचे दर्शन घेण्यास भाविक आसुसलेला असतो.

## आळंदी संस्थांनच्या बैठकीत निर्णय

शेतकरी जसा मृग नक्षत्र किंवा पावसाची वाट पहात असतो. तशी वारकऱ्यांना आषाढी यात्रेची आस लागलेली असते. अनेक वर्षांपासून चैत्र दशमीला आषाढी यात्रेची तयारी, प्रस्थान आणि इतर विषयांवर आळंदी देवस्थानची

(पान २ वर)

## न्यायालय परिसरात पक्षकार महिलेला मारहाण

## पंधरा वकीलांच्या विरोधात गुन्हा दाखल

कोल्हापूर,ता.२८ (प्रतिनिधी)

कौटुंबिक वादातून दाखल झालेल्या घटस्फोट प्रकरणाच्या सुनावणीसाठी जिल्हा व सत्र न्यायालयात आलेल्या एका पक्षकार महिलेला मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी १५ वकीलांच्या विरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना ७ मार्च २०२६ रोजी घडली होती.

या प्रकरणात ॲड.काजल शेळके,कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष व्ही.आर.पाटील, ज्येष्ठ वकील ॲड. विवेक घाटगे यांच्यासह मनिषा सातपुते, साक्षी निकम, हर्षा खंडेलवाल, संदीप चौगुले, संदीप देशपांडे

(पान २ वर)

# बँकांच्या डॉलर होल्डिंगवर मर्यादा




नवी दिल्ली,ता.२८–

नव्या निर्देशानुसार बँकांना दररोज १०० दशलक्ष डॉलर (सुमारे ९५० कोटी रुपये) पेक्षा जास्त रक्कम स्वतःकडे ठेवता येणार नाही. यापूर्वी बँका ३०० ते ५०० दशलक्ष डॉलरपर्यंतची रक्कम ठेवत होत्या. बँकांना अतिरिक्त डॉलर बाजारात विकावे लागतील आणि त्यामुळे डॉलरचा पुरवठा वाढून रुपया मजबूत होण्यास मदत होईल, असा अंदाज भारतीय रिझर्व्ह बँकेने व्यक्त केला आहे.

## आरबीआयचा निर्णय ;रुपया मजबूत होण्याची शक्यता

रुपयाच्या सतत घसरत चाललेल्या किमतीला आळा घालण्यासाठी आरबीआयने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नुकताच रुपया डॉलरच्या तुलनेत ९४.५९ रुपये या आतापर्यंतच्या नीचांकी पातळीवर बंद झाला होता. गेल्या काही दिवसांत रुपयामध्ये मोठी अस्थिरता पाहायला मिळत असून, परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय

(पान २ वर)

करन्सीची किंमत मुख्यतः मागणी आणि पुरवठ्यावर अवलंबून असते. जर देशाकडे पुरेसा फॉरेन एक्सचेंज साठा असेल तर करन्सी स्थिर राहते, अन्यथा ती कमजोर होते. आरबीआयचा हा नवीन निर्णय रुपयाला स्थिरता देण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १४६३०० रु. | २३०००० रु. |

अंडी ४३५ रुपये शेकडा

**हास्यतुषार** -सुरेंद्र दास




# खरातविरुध्द आणखी एक बलात्काराचा गुन्हा दाखल

नाशिक,ता.२८–



कौटुंबिक समस्येवर सल्ला घेण्यासाठी गेलेल्या महिलेवर पिण्याच्या पाण्यात गुंगीचे औषध टाकून बलात्कार करणाऱ्या भोंदू ज्योतिषी अशोक खरातविरुध्द आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी महिला ही पती व दोन मुलांसह राहते. पीडित महिलेचा २५ मे २०१३ रोजी विवाह झाला. त्यानंतर सन २०१४ मध्ये तिला मुलगी झाली. त्यानंतर पती-पत्नीमध्ये वाद होऊ लागले.तेव्हापासून ही महिला पतीपासून विभक्त राहू लागली. सन २०२२ मध्ये पीडितेला तिच्या एका नातेवाईकाने मिरगाव येथे अशोक खरात याच्याकडे ईशानेश्वर महादेव मंदिर येथे नेले. तेव्हा अशोक खरातने पती-पत्नीला समजावून सांगितले.

(पान २ वर)

## बिद्री गर्भलिंग निदान प्रकरण

# आणखी तिघांना बेड्या;अटकेतील अकराजणांना पोलीस कोठडी

## संशयित आरोपींची संख्या तेरावर

मुरगूड,ता.२८ (प्रतिनिधी)–

अवैधरित्या गर्भलिंग तपासणी होत असल्याच्या संशयावरुन बिद्री (ता.कागल ) येथील श्रध्दा हॉस्पिटलवर कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण व इस्फूर्ली पोलीस पथकाने सोमवारी छापा टाकला होता.



शुभम पाटील विठ्ठल पाटील सुशांत पाटील

या कारवाईत मुख्य संशयीत डॉ. युवराज पाटील आणि एजंट संभाजी शिंदे यांना अटक झाली होती. तर शनिवारी आणखी तिघाजणांना अटक केली.त्यामुळे या प्रकरणातील संशयित आरोपींची संख्या १३ वर

(पान २ वर)

# कणदूरमध्ये बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

शिराळा,ता.२८ (प्रतिनिधी)–

कणदूर (ता.शिराळा) येथील जगन्नाथ बाळू गुंडणके (वय ५५) या शेतकऱ्यावर शेतामध्ये पाणी पाजत असताना बिबट्याने हल्ला करून जखमी केले. त्यांच्यावर शिराळा उपजिल्हा रुग्णालयामध्ये प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी सांगली सिव्हील हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले.



जगन्नाथ गुंडणके हे कणदूर येथे शेतामध्ये शनिवारी सकाळपासून पाणी पाजत होते. दुपारी तीनच्या सुमारास बांधावर असणाऱ्या हत्ती गवतामधून बिबट्याने गुंडणके यांच्यावर हल्ला करून त्यांना जखमी केले. यावेळी ते शेतात एकटेच होते. त्यांच्या हातामध्ये असणारे खोरे त्यांनी बिबट्याच्या बाजूने फिरवल्यामुळे व मोठ्याने ओरडल्याने बिबट्याने त्यांच्या हाताचा चावा घेऊन

(पान २ वर)

## (पान १ वरून)

## प.बंगालची निवडणूक ठरवणार

आरोपपत्र गेल्या १५ वर्षांतील राज्य सरकारच्या गैरकृत्यांचे संकलन आहे.अमित शहा यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर सहानुभूतीचे राजकारण करत असल्याचा आरोप केला.त्या नेहमी स्वतःला पीडित म्हणून दाखवण्याचा प्रयत्न करतात. कधी दुखापतीची प्रकरणे समोर आणली जातात, कधी डोक्याला पट्टी बांधून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला जातो, कधी आजारपणाचे कारण दिले जाते, तर कधी निवडणुका घेणाऱ्या घटनात्मक संस्थेवर आरोप केले जातात. या गोष्टी आता जनतेला समजल्या आहेत, असे ते म्हणाले. बंगालमधील ही निवडणूक केवळ सरकार बदलण्यापुरती नाही, तर राज्याला भीतीचे वातावरण दूर करण्यासाठी आहे. त्यांनी दावा केला की, राज्यातील सामान्य लोकांना आपल्या जीविताची आणि मालमत्तेची भीती वाटते, मालमत्ता लुटली जाण्याची सतत भीती आहे, महिलांच्या सुरक्षेबद्दल चिंता आहे आणि युवकांना त्यांच्या भविष्याबद्दल अनिश्चिततेचा सामना करावा लागत आहे.

राज्यात एक संघटित खंडणीची व्यवस्था प्रस्थापित झाली असून भ्रष्टाचार हा व्यवस्थेचाच एक भाग बनला आहे. गुन्हेगारी टोळ्या वरपासून खालपर्यंत सक्रिय असून सामान्य लोकांचा छळ होत असल्याचा आरोप त्यांनी केला.विकासाच्या अभावामुळे बंगाल उद्योगांसाठी स्मशानभूमी बनले आहे.राज्यात अवैध स्थलांतर ही एक गंभीर समस्या बनली असून त्याला राजकीय आश्रय दिला जात आहे.सीमावर्ती भागातून होणारी घुसखोरी ही राष्ट्रीय सुरक्षेसाठी चिंतेची बाब आहे. त्यांनी सांगितले की, जर त्यांचा पक्ष सत्तेवर आला, तर अशा घटकांवर कठोर कारवाई केली जाईल.

## बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

निघून गेला.यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष रणधीर नाईक यांनी उपजिल्हा रुग्णालयामध्ये जाऊन जखमींची विचारपूस करून शिराळा वनक्षेत्रपाल रमेश कांबळे यांना वनविभागाकडून बिबट्याचा बंदोबस्त करावा व जखमींना जास्तीत जास्त मदत देणे विषयी चर्चा केली.

## बलात्काराचा गुन्हा दाखल

त्यामुळे दोघे जण पुन्हा सोबत नांदू लागले.त्यामुळे या दाम्पत्याचा भोंदूबाबावर विश्वास बसला. त्यानंतर पुन्हा मार्च २०२२ मध्ये अशोक खरातला भेटण्यासाठी पीडित महिला व तिच्या पतीने कॅनडा कॉर्नर येथे ओकस प्रॉपर्टी या कार्यालयामध्ये गेले.प्रथम भोंदूने त्यांना बराचवेळ ताटकळत ठेवले.पीडितेचा नंबर आल्यानंतर भोंदूने या दाम्पत्याला केबीनमध्ये बोलावले. दोघांची जन्मतारीख विचारून लग्नाची तारीख विचारली. त्यावरुन त्यादिवशी शनिवार होता. हा वार लग्नासाठी चांगला नव्हता, असे सांगितले. यामुळेच तुमच्यामध्ये वाद होतात. त्यानंतर या दाम्पत्याने आमच्या शेतात कोणते पिक घेतले पाहिजे, असा सल्ला भोंदूबाबाला विचारला. त्यावर भोंदूबाबाने कमी मेहनतीमध्ये जास्त नफा मिळवून देणारी पिके घेण्याचा सल्ला दिला. थोड्या वेळाने या दाम्पत्याला नारळ पाणी प्रसाद म्हणून दिला.ऑगस्ट २०२४ मध्ये हे दाम्पत्य पुन्हा खरातकडे भेटायला आले. त्यावेळी फिर्यादी महिला समोर बसलेली असताना भोंदूने त्यांना काही अडचण आहे का, असे विचारले व पीडितेच्या पतीला बाहेर जावून बसायला सांगितल आणि पीडितेसोबत तिच्या इच्छेविरुध्द बळजबरीने बलात्कार केला.पीडितेने विरोध केला असता कोणाला काही सांगितले तर मी माझ्याकडील शक्तीने तुझ्या मुलांना मारुन टाकेल आणि तुझे आयुष्य उद्ध्वस्त करेल, अशी धमकी दिली.त्यामुळे भेदरलेल्या महिलेने आजपर्यंत ही बाब कोणाला सांगितली नव्हती. मात्र भोंदू अशोक खरातविरुद्ध रोजच तक्रारी वाढू लागल्याने पीडितेने हा प्रकार तिच्या पतीला सांगितला. त्यानंतर तिने पतीसह सरकारवाडा पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली.

## कृत्यात सहभागी नाही

स्टेशनला फोन केला नाही. कुठल्याही महिलेची मी त्यांच्याशी ओळख करून दिली नाही. महिलांबाबत त्याने केलेल्या कोणत्याही कृत्याबाबत मला माहिती नाही. सार्वजनिक जीवनात माझी प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला गेला.

## माऊलींचे पालखी प्रस्थान

बैठक होते. या बैठकीला आळंदी संस्थेचे सर्व विश्वस्त आणि दिंडी समाजाचे सर्व प्रतिनिधी उपस्थित होते.ज्येष्ठ वद्य अष्टमी अर्थात बुधवारी ८ जुलैला आळंदी येथून प्रस्थान, ९ व १० जुलैला पुण्यात मुक्काम, ११ व १२ जुलै रोजी सासवड मुक्कामी, १३ जुलै रोजी जेजुरी, १४ जुलै रोजी वाल्हे मुक्कामी राहणार आहे.१५ जुलै रोजी नीरा स्नान करून पालखी लोणंद येथे मुक्कमी तर १६ जुलै रोजी लोणंद येथून पुढे दुपारी पालखी चांदोबाचा लिंब येथे सोहळ्यातील पहिले उभे रिंगण होऊन पालखी तरडगाव येथे मुक्कामी येणार आहे. १७ जुलै रोजी फलटण, तर १८ जुलै रोजी बरड येथे पालखी विसावणार आहे.१९ जुलै रोजी नातेपुते येथे पालखी मुक्कामी राहणार आहे. २० जुलै रोजी पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण होऊन पालखी माळशिरस येथे मुक्कामी असेल.२१ जुलै रोजी खडूस फाटा येथे दुसरे गोल रिंगण होऊन वेळापूर येथे पालखी विसावणार आहे.२२ जुलै रोजी ठाकुरबूवा समाधीजवळ तिसरे गोल रिंगण आणि टप्पा येथे बंधू भेट होऊन पालखी भंडीशेगाव मुक्कामी आहे.२३ जुलै रोजी बाजीराव विहीर येथे गोल आणि उभे रिंगण होऊन पालखी वाखरी येथे विसावणार आहे. २४ रोजी म्हणजेच आषाढी दशमीला दुपारी उभे रिंगण होऊन सर्व संतांच्या पालख्या पंढरपूर येथे मुक्कामी राहणार आहेत. २५ जुलै रोजी आषाढी एकादशी सोहळा होणार आहे.

## डॉलर होल्डींगवर मर्यादा

बाजारातून पैसे काढल्याने दबाव अधिक वाढला आहे. अशा परिस्थितीत बाजारातील चढ-उतार नियंत्रित ठेवण्यासाठी आरबीआयने नेट ओपन पोझिशन म्हणजेच एनओपी-इनआरवर थेट मर्यादा घातली आहे.नेट ओपन पोझिशन म्हणजे बँकांनी खरेदी किंवा विक्री केलेले परकीय चलन जे त्यांनी सुरक्षित केलेले नसते. पूर्वी बँकांना त्यांच्या भांडवलाच्या २५ टक्क्यांपर्यंत ही मर्यादा ठेवण्याची मुभा होती, मात्र आता ती थेट १०० दशलक्ष डॉलरवर आणण्यात आली आहे. यामुळे बँकांच्या अनहेज्ड पोझिशन्स कमी होतील आणि सट्टेबाजीवर आळा बसेल. परिणामी इंट्राडे ट्रेडिंगमधील तीव्र चढ-उतार कमी होण्याची शक्यता आहे.आरबीआयने सर्व अधिकृत फॉरेक्स डीलर्सना या नियमांचे पालन करण्यासाठी १० एप्रिलपर्यंतची मुदत दिली आहे. या निर्णयाचा थेट फायदा सामान्य नागरिकांनाही होऊ शकतो. रुपया मजबूत झाल्यास परदेशात शिक्षण घेणे, पर्यटन करणे तसेच आयात होणाऱ्या मोबाईल, लॅपटॉपसारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू स्वस्त होण्याची शक्यता आहे. अमेरिके-इस्रायल आणि इराण संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण झाली असून त्याचा भारतावर थेट परिणाम होत आहे. तेल महागल्याने आयात बिल वाढले आहे आणि त्यामुळे महागाई वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.जर ही परिस्थिती कायम राहिली तर रुपया ९५ ते ९८ च्या पातळीपर्यंत जाऊ शकतो. यामुळे पेट्रोल-डिझेल, एलपीजी तसेच इतर आयात केलेल्या वस्तू महाग होण्याचा धोका आहे.

# नेपाळचे माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली यांना अटक

**काठमांडू,ता.२८-**



**झेन-जी आंदोलनातील कथित भूमिकेप्रकरणी माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली यांना अटक करण्यात आली आहे. नवीन पंतप्रधान बालेंद्र शाह यांनी नुकतीच शपथ घेतल्यानंतर काही तासातच ही कारवाई झाली. सत्तांतरानंतर इतक्या लवकर झालेल्या या अटकेमुळे देशात खळबळ उडाली आहे.**

ओली यांच्यासोबत माजी गृहमंत्री रमेश लेखर यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. काठमांडू व्हॅली पोलीसांच्या माहितीनुसार, दोघांनाही शनिवारी सकाळी अटक करण्यात आली असून आता पुढील कायदेशीर कारवाई सुरू होईल.सरकारने स्पष्ट केले की, ही कारवाई सूडबुद्धीने केलेली नसून कायद्यानुसार आहे. दरम्यान, ओली यांनी या अटकेला राजकीय सूडबुद्धी म्हटले असून कायदेशीर लढाई लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

गेल्या सप्टेंबरमध्ये नेपाळमध्ये झेन-जी आंदोलन म्हणून ओळखले जाणारे मोठे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन झाले होते. या आंदोलनांना अचानक हिंसक वळण लागले आणि दोन दिवसांत ७० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला होता. या हिंसाचारामुळे ओली सरकारवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले, ज्यामुळे अखेरीस सरकार कोसळले. या घटनांनी देशाचे राजकीय चित्र पूर्णपणे बदलून टाकले.

नुकत्याच स्थापन झालेल्या एका उच्चस्तरीय चौकशी आयोगाने आपल्या अहवालात म्हटले आहे की, त्यावेळी उच्च पदांवर असलेल्यांनी परिस्थिती हाताळण्यात हलगर्जीपणा केला. आयोगाने ओली आणि रमेश लेखर यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांना जबाबदार धरले आणि त्यांच्यावर कठोर कारवाईची शिफारस केली. अहवालात १० वर्षांच्या कमाल शिक्षेची शिफारस देखील करण्यात आली होती, जी नवीन सरकारने नंतर लागू करण्याचा निर्णय घेतला.

## निपाणी परिसरात आज वीजपुरवठा खंडित

**निपाणी,ता.२८( प्रतिनिधी)-**

**निपाणी शहर व परिसरात त्रैमासिक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. यासाठी रविवारी २९ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत वीज पुरवठा खंडित राहणार असल्याची माहिती निपाणी हेस्कॉमचे शहर अभियंता अक्षय चौगुला यांनी दिली.**

विद्युत उपकेंद्रे तसेच ट्रान्सफॉर्मरमधील बिघाडामुळे रविवारी दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. त्यामुळे निपाणी येथील ११० केव्ही विद्युत केंद्र तसेच जत्राट येथील ३३ केव्ही, बेनाडी येथील ३३ केव्ही विद्युत उपकेंद्रे व त्याअंतर्गत येणारी सर्व ११ केव्ही क्षमतेची उपकेंद्रे या सर्व ठिकाणी दुरुस्तीची कामे होणार आहेत. त्यामुळे या उपकेंद्रांतर्गत असलेल्या सर्व गावांमध्ये रविवारी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. कोगनोळी व खडकलाट उपकेंद्रातील वीजपुरवठा मात्र सुरळीत सुरू राहणार असल्याचे चौगुला यांनी सांगितले.

# राज्यातील ऊस गाळप हंगाम अंतिम टप्प्यात

## १८३ साखर कारखाने बंद

**पुणे,ता.२८-**

**राज्यातील ऊस गाळप हंगाम अंतिम टप्प्यात आला असून २१० पैकी १८३ साखर कारखाने बंद झाले आहेत.राज्यात आतापर्यंत ९८.८ लाख टन साखरेचे उत्पादन झाले असून सर्वाधिक २३.१ लाख टन उत्पादन कोल्हापूर विभागात झाले आहे. पुणे विभागात २२.१ लाख आणि सोलापूर विभागात १८.९ लाख टन साखरेचे उत्पादन झाल्याची माहिती साखर आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आली.**

दरम्यान, राज्यातील साखर उद्योगाचा यंदाचा गाळप हंगाम सरासरी फक्त ११० दिवस चालला असला तरी साखर उद्योगापुढील आव्हाने कायम राहिली आहेत.राज्यात १ नोव्हेंबर रोजी ऊस गाळप हंगामाला सुरुवात झाली. त्यानुसार साखर आयुक्तालयाने २४ मार्चपर्यंतचे ऊस गाळप, साखर उत्पादन आणि साखर उतारा ही माहिती जाहीर केली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांत राज्यात ९८८.३८ लाख क्विंटल म्हणजेच ९८.८ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे.गेल्या वर्षी ८०३.६२ लाख क्विंटल



म्हणजेच ८० लाख मेट्रिक टन साखरेचे उत्पादन झाले होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा साखर उत्पादन वाढले असले, तरी सरासरीच्या तुलनेत ही वाढ कमी असल्याने साखर उद्योगासमोरील आर्थिक संकट कमी झालेले नाही.कोणताही कारखाना किमान १४० ते १५० दिवस चालला, तरच त्याचे अर्थकारण टिकते. यंदा हंगाम वाढला असला, तरी संपूर्ण साखर उद्योगासमोरील आव्हाने कायम आहेत. यंदा पाऊस कमी असेल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कमी पावसाचा परिणाम संपूर्ण साखर उद्योगावर होऊ शकतो. राज्यातील गाळप हंगाम पुढील १५ दिवसात संपण्याची शक्यता असल्याची माहिती साखर आयुक्तालयाकडून देण्यात आली.

## युवकाची आत्महत्या

**हातकणंगले,ता.२८(प्रतिनिधी)-**



**येथील युवराज राजेंद्र जांभळे (वय २५) या युवकाने शनिवारी दुपारी घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.**

शनिवारी युवकाने आत्महत्या केल्याची घटना घडल्याने परिसरामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही. याची नोंद हातकणंगले पोलिसात झाली आहे.

# सांगलीचे जिल्हाधिकारी म्हणून डॉ.घोष यांनी पदभार स्विकारला

**सांगली,ता.२८(प्रतिनिधी)-**

**सांगलीचे नूतन जिल्हाधिकारी म्हणून डॉ.मैनाक घोष यांनी शनिवारी मावळते जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्याकडून पदभार स्विकारला. पदहस्तांतरणवेळी काकडे यांनी डॉ.घोष यांचे स्वागत करून त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.**

सांगली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक अशा सर्वांना सोबत घेऊन विकसित सांगली जिल्हा २०३० व २०४७ चे उद्दिष्ट समोर ठेवून वाटचाल करणार असल्याचा मनोदय नूतन जिल्हाधिकारी डॉ. घोष यांनी व्यक्त केला.

डॉ. मैनाक घोष हे मूळचे पश्चिम बंगाल येथील असून,



**डॉ.घोष यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करताना मावळते जिल्हाधिकारी अशोक काकडे.**

त्यांनी झूलॉजीमध्ये पदव्युत्तर पदवीचे शिक्षण प्राप्त केले आहे. तसेच, बायोकेमिस्ट्री विषयात पीएचडी पदवी प्राप्त केली आहे.ते भारतीय प्रशासन सेवेतील २०१९ च्या बॅचचे महाराष्ट्र केडरचे अधिकारी आहेत. त्यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी, रायगड येथून प्रशासकीय कारकिर्दीची सुरवात केली. आतापर्यंत त्यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदुरबार व गडचिरोली तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यवतमाळ व धाराशिव येथे कामकाज पाहिले आहे.दरम्यान, मावळते जिल्हाधिकारी अशोक काकडे यांची पदोन्नतीने व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई येथे बदली झाली आहे. आपल्या जिल्हाधिकारी पदाच्या कार्यकालात सांगलीने अनेक चांगले अनुभव दिले असून, सांगलीच्या स्मृती सदैव स्मरणात राहतील, अशा भावना मावळते जिल्हाधिकारी काकडे यांनी व्यक्त केल्या.

## आणखी तिघांना बेड्या

(पान १ वरून )

पोहोचली आहे.अटकेतील ११ जणांना ३० मार्च पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.आज अटक केलेल्यांमध्ये संशयीत सुशांत नानासाहेब पाटील (वय ३९,रा.कसबा वाळवे), शुभम संजय पाटील (वय २५, रा. फराकटेवाडी, ता. कागल), विठ्ठल तुळजाराम पाटील (वय ४२, रा. बिद्री ) यांचा समावेश आहे. अजून काही नावे निष्पण्ण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

बिद्री येथील श्रध्दा हॉस्पिटलवर केलेल्या कारवाईत एक सोनोग्राफी मशीन आणि काही औषधेही जप्त करण्यात आली होती. तर संशयितांचे जबाब आणि त्यांच्या कॉल डिटेल्सवरुन पोलिसांनी एकूण आजपर्यंत १३ जणांवर गुन्हे दाखले झाले आहेत.त्यातील आजपर्यंत ११ जणांना अटक झाली आहे.यातील संशयीत डॉ. युवराज पाटील आणि एजंट संभाजी शिंदे यांना यापूर्वीच अटक झाली आहे. आज मुरगुड पोलीस व फॉरेंसिक लॅबच्या पथकाकडून बिद्री शेजारील दूधगंगा नदीपात्रात व काठावरील शेतजमिनीमध्ये अर्भकांचा शोध घेण्यात आला. पण त्यामध्ये फारसे यश आले नसल्याचे समजते.

मुख्य संशयित डॉ.उत्तमकुमार बळवंत सरदेसाई ( वय ६० रा. कोल्हापूर) आणि आक्काताई बळवंत कांबळे (रा.बिद्री) यांना अद्याप अटक झालेली नाही. त्यांच्या मागावर पोलीस आहेत.यापूर्वी या दवाखान्यावर दोनवेळा धाडी टाकल्या होत्या पण त्याच्या मूळापर्यत जाण्यात पोलीसांना यश मिळाले नव्हते.

# वकीलांच्या विरोधात गुन्हा नोंद

(पान १ वरून )

नारायण भांदिगरे, सुरज भोसले, स्वाती तनवडे, तृप्ती किनरे, विद्या कांबळे-देशमुख, जे. जे. देसाई आणि शिल्पा सुतार यांचा समावेश आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिलेच्या पतीने तिच्याविरोधात घटस्फोटाचा दावा दाखल केला असून, या प्रकरणात पतीच्या बाजूने ॲड.काजल शेळके काम पाहत आहेत. ७ मार्च २०२६ रोजी सुनावणीसाठी महिला न्यायालयात उपस्थित होती. कामकाजानंतर ती बाहेर पडत असताना तळमजल्यावरील झेरॉक्स सेंटर जवळ तिची पतीशी भेट झाली. त्यावेळी तिने पतीकडे तिचे वैयक्तिक साहित्य परत देण्याची मागणी केली.

दरम्यान, हा प्रकार पाहून ॲड. शेळके यांनी हस्तक्षेप केला. वाद मिटवण्याच्या प्रयत्नात त्यांनी संबंधित महिलेला जातीवाचक शिवीगाळ करत तिच्या कानाखाली मारल्याचा आरोप आहे. या मारहाणीत महिलेला दुखापत होऊन तिच्या गालाला रक्तस्राव झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

घटनेची माहिती न्यायालय परिसरात पसरताच मोठ्या संख्येने वकील त्या ठिकाणी जमले. परिस्थिती तणावपूर्ण बनल्याने पोलीसांनी तातडीने हस्तक्षेप करून संबंधित महिलेला सुरक्षित ठिकाणी हलवले. काही वकीलांनी आक्रमक भूमिका घेत हिरकणी कक्षाच्या काचेवर आघात करण्याचा प्रयत्न केल्याचीही नोंद आहे. तसेच संबंधित महिलेला शिवीगाळ करत तिचे वकीलपत्र कोणी स्वीकारू नये, असा दबाव आणल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी पीडित महिलेने २७ मार्च रोजी शाहूपुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार ॲड.काजल शेळके यांच्यासह १५ जणांविरोधात विविध कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास शहर पोलीस उपअधीक्षक प्रिया पाटील करीत आहेत.

## उखळूत गवा रेड्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

**बांबवडे,ता.२८ -**

**गवा रेड्याने हल्ला केल्याने उखळू (ता. शाहूवाडी) गावातील शेतकरी तुकाराम चंद्रु वडाम (वय ६८) हे गंभीर जखमी झाले. ही घटना शनिवारी सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास घडली.**

तुकाराम वडाम हे आपल्या शेतात मक्याच्या पिकाची राखण करण्यासाठी गेले होते. त्यावेळी झुडपांच्या आड लपून बसलेल्या गव्याने अचानक त्यांच्या मागून हल्ला केला. अनपेक्षितपणे झालेल्या या हल्ल्यात गव्याने जोराची धडक देत त्यांना खाली पाडले. त्यानंतर शिंगांनी उचलून जमिनीवर आपटत त्यांना गंभीर जखमी केले.या हल्ल्यात वडाम यांच्या पायाला, मानेस तसेच पाठीच्या कण्याला जबर मार लागला असून ते गंभीर जखमी झाले आहेत. घटनेनंतर स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने मदत करत त्यांना उपचारासाठी शित्तूर वारूण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. प्राथमिक उपचारांनंतर त्यांच्या प्रकृतीची गंभीरता लक्षात घेऊन त्यांना पुढील उपचारासाठी कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात हलविण्यात आले. या परिसरात गव्यांचा वावर वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## दहशतवाद्यांना अटक

(पान १ वरून )

प्राप्त माहितीनुसार अब्बू गाबा हुरैरा आणि उस्मान बराच काळ गावात भाडेकरू म्हणून वास्तव्यास होते. तसेच गेली १५ वर्षे ते देशाच्या विविध भागात राहुन भारत विरोधी कारवाया करायचे परंतु, त्यांच्याबद्दल कुणाला शंकाल आली नव्हती.या कारवाईदरम्यान, सीआयए आणि सायबर क्राईम युनिटने धर्माच्या नावाखाली युवकांना कट्टरपंथी बनवण्याच्या आरोपाखाली फरहान अंजुम, अदनान खान आणि वारिस अली यांनाही अटक केली. या ऑपरेशन दरम्यान ३२ बोरची पिस्तूल, तीन कारतूस आणि ४ मोबाइल फोन जप्त केले. दरम्यान,पोलिसांनी या कारवाईचे संपूर्ण तपशील अद्याप जाहीर केलेले नाहीत.

## साळगाव बंधारा दुरुस्तीसाठी ५८ लाखाचा निधी

**आजरा,ता.२८( प्रतिनिधी)-**

**तालुक्यातील हिरण्यकेशी नदीवरील साळगाव बंधारा दुरुस्तीसाठी ५८ लाख ७० हजारांचा निधी मंजूर झाला आहे. यामुळे भुदरगड तालुक्यासह पेरणोली पंचक्रोशीमधील सहा गावांतील नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे.**

साळगाव येथील हिरण्यकेशी नदीवरील साळगाव बंधाऱ्याचा एक पिलर कोसळला. त्यामुळे बंधारा वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. या बंधाऱ्यावरून एसटी व अवजड वाहनांची वाहतूक बंद आहे. बंधाऱ्यावरून दुचाकी व चारचाकी वाहतूक सुरू आहे. साळगावची एसटी वाहतूक सोहाळे मार्गे वळविली आहे. यामुळे नोकरदार, विद्यार्थी व रुग्णांचे हाल होत आहेत. दरम्यान, साळगावची मे महिन्यात लक्ष्मीदेवीची यात्रा होणार आहे. त्यामुळे बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करण्याची गरज आहे.

# परदेशी कोर्टाचा घटस्फोट वैध नाही

(पान १ वरून )

जे नंतर अमेरिका आणि भारत दोन्हीकडे घटस्फोट प्रक्रियेत आले.न्यायालयाने वाय. नरसिम्हा राव विरुद्ध वाय. वेंकट लक्ष्मी (१९९१) या ऐतिहासिक निर्णयाचा हवाला देत स्पष्ट केले की, अमेरिका किंवा इतर परदेशातील न्यायालयांचा निर्णय भारतात का मान्य होऊ शकत नाही. २५ डिसेंबर २००५ रोजी मुंबईत हिंदू रीतीनुसार विवाह झाल्यानंतर जोडपे अमेरिकेला गेले. परंतु, २००८ मध्ये त्यांचे संबंध तुटले. पत्नीने मिशिगन न्यायालयात घटस्फोटा साठी अर्ज केला. पतीने अमेरिकी न्यायालयात उपस्थित न राहता फक्त लिखित आपत्ति पाठवली. भारतामध्ये, पुण्यातील कौटुंबिक न्यायालयाने पतीच्या बाजूने निर्णय दिला की, घटस्फोट हिंदू विवाह अधिनियमांतर्गत मान्य नाही, त्यामुळे अमेरिकन न्यायालयाचा आदेश भारतात वैध नाही. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने परदेशी न्यायालयाचा अधिकार क्षेत्र मान्य केला होता.


विदेशी न्यायालयाने दिलेला घटस्फोट वैध व बंधनकारक आहे की नाही. तसेच अनुच्छेद १४२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाने सर्व तथ्यांचा विचार करून सांगितले की, विवाह भारतात हिंदू रीतीनुसार झाल्यामुळे हिंदू मॅरेज ॲक्ट लागू होतो आणि अमेरिकेतील न्यायालयाने दिलेला घटस्फोटाचा आदेश भारतात वैध नाही. तसेच संबंधित जोडपे २००८ पासून वेगळे राहत असल्याने न्यायालयाने अनुच्छेद १४२ अंतर्गत अंतिम घटस्फोट मंजूर करत मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला.

# राज्यातील २८ हजार प्रलंबित दावे निघणार निकाली-ना.बावनकुळे

**मुंबई,ता.२८-**

**राज्यातील राष्ट्रीय महामार्गांच्या अनेक प्रकल्पांमुळे भूसंपादनाशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचा वेगवान निपटारा करण्यासाठी केंद्र सरकारने राज्यात ५७ नवीन लवादांची नियुक्ती केली असून, यामुळे अनेक वर्षांपासून मोबदल्याविना रखडलेले २८ हजारांहून अधिक प्रकल्पग्रस्तांचे दावे जलदगतीने निकाली निघणार आहेत.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन यासाठी विशेष पुढाकार घेतला. केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्यासमवेत केंद्र व राज्य सरकारसोबत बैठका झाल्या. राज्यातील विविध भागातील प्रकरणाचा अभ्यास करून सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आता लवादांची नियुक्ती झाली आहे.राज्यात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (एनएचएआय) अनेक प्रकल्प सुरू आहेत. मात्र, भूसंपादनाच्या वाढीव मोबदल्याबाबतची सुमारे २८ हजारांहून अधिक प्रकरणे लवादांकडे प्रलंबित आहेत. यातील काही प्रकरणे तर तीनवर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे प्रकल्पग्रस्तांचे हक्क, मोबदल्याची पद्धत व याविषयातील पारदर्शकता ही बाब लक्षात घेऊन महसूलमंत्री बावनकुळे यांनी या प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी स्वतंत्र लवादांची मागणी केली होती. त्यानुसार महाराष्ट्रातील अतिरिक्त आयुक्त आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील ५७ अनुभवी अधिकाऱ्यांची लवाद म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.नव्याने नियुक्त करण्यात आलेले हे ५७ लवाद कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर या सर्व विभागांतील जिल्ह्यांमध्ये कार्यरत राहतील. या लवादांना आवश्यक मनुष्यबळ आणि कार्यालयीन खर्चासाठी एनएचएआयमार्फत निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे, जेणेकरून कामकाजात कोणताही अडथळा येणार नाही.

कै.भागीरथजी रघुनाथजी गौड

**भावपूर्ण श्रद्धांजली!**

आमच्या असोसिएशनचे सभासद श्री. बजरंग भागीरथजी गौड यांचे वडिल श्री. भागीरथजी रघुनाथजी गौड यांचे शनिवार, दि.२१/०३/२०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

पश्चिम महाराष्ट्र संचलित

**सक्सेस कलरकेम सप्लायर्स असोसिएशन,इचलकरंजी.**

# सिल केलेल्या मिळकतीत प्रवेश दोघांवर गुन्हा दाखल

**इचलकरंजी,ता.२८–**

**फायनान्स कंपनीने थकीत कर्जापोटी सील केलेल्या मिळकतीत बेकायदेशीरित्या प्रवेश करुन सील व कुलूप तोडून नुकसान केल्याप्रकरणी दाम्पत्यावर शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोविंद भद्रया सुलेगाम (वय ४२) व भाग्यलक्ष्मी गोविंद सुलेगाम (वय ३५ दोघे रा. प्रियदर्शनी कॉलनी) अशी त्यांची नावे आहेत. या प्रकरणी ऋषिकेश बळवंतराव देशमुख (वय ३२ रा. कोल्हापूर) यांनी फिर्याद दिली आहे.**

लायकर टॉकीज परिसरातील प्रियदर्शनी कॉलनी येथे राहणाऱ्या गोविंद सुलेगाम यांनी पुणे येथील टायगर होम फायनान्स प्रा. लि. या फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले आहे. कर्ज थकबाकीत गेल्याने फायनान्स कंपनीने सुलेगाम यांची मौजे कबनुर येथील गट क्र. १७३ पैकी प्लॉट नं. १ ही मिळकत कायदेशीर प्रक्रिया करुन ताब्यात घेत सील केली होती. परंतु, २३ मार्च रोजी सुलेगाम दाम्पत्याने या सील केलेल्या मिळकतीत बेकायदेशीररित्या प्रवेश करुन तेथील सील व कुलूप तोडल्याचा प्रकार घडला. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात कंपनीचे प्राधिकृत अधिकारी देशमुख यांनी फिर्याद दिली.

# सूत दरात वाढ ; कापडाला मागणी आणि दरही नाही



## सिंथेटीक यार्नमधील दरवाढ कायम

**इचलकरंजी,ता.२८–**

**आखाती देशात सूत असलेल्या युध्दामुळे तेल साठ्यांवर परिणाम होत चालला आहे. त्यामुळे मानवनिर्मित धागा (सिंथेटीक यार्न)मध्ये दरवाढ सुरूच आहे. तर गेल्या काही दिवसांपासून स्थिर असलेले सूताचे दरही वाढत चालले आहे. मात्र, त्या मानाने कापडाला मागणीही नाही आणि योग्य दरही मिळत नसल्याने आर्थिक कोंडी होऊ लागली आहे. 'आर्थिक वर्ष' संमाप्तीनंतर बाजारपेठ सुधारण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**



गेल्या महिन्यांभरापासून अमेरिका, इस्त्राईल विरूध्द इराणचे युध्द सुरू आहे. या युध्दाची किनार धरून संपूर्ण जगावर विपरीत परिणाम दिसू लागले आहे. त्यामध्ये तेल साठ्यांवर परिणाम होत चालला आहे. मानवनिर्मित धाग्याच्या सूतामध्ये दिवसेंदिवस वाढच होत चालली आहे. महिन्याभरात किलो मागे २० ते २२ रुपयांनी वाढ झाली आहे. तर गेल्या काही दिवसांपासून स्थिर दर असलेल्या सूतामध्ये गेल्या दोन- तीन दिवसांपासून वाढ होत आहे. किलो मागे ३ ते ४ रुपयांची वाढ बाजारपेठेत झाल्याचे दिसून येते. मात्र, कापडाला म्हणावी तशी मागणी नाही तसेच योग्य भावही मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे बाजारपेठेत आर्थिक टंचाई निर्माण झाली आहे. 'आर्थिक वर्ष' मुळे बाजारपेठेमध्ये म्हणावी तशी उलाढाल होत नसल्याचे दिसून येते. मार्च अखेरनंतर बाजारपेठेत सुधारणा होईल, असे बोलले जात आहे.

बाजारात युध्दाचे कारण पुढे करून काही सूतगिरण्या व काही सूत व्यापारी मनमानी पध्दतीने सूत दरवाढ सुरू केली आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या कापसाला दरवाढ मिळत नाही तसेच सूतामध्ये भेसळीचे प्रमाण वाढत चालले आहे. त्याचा फटका कारखानदारांना बसत आहे. तेव्हा सूत भेसळीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे बनले आहे. सूत भेसळ विरोधात कारखानदारांनी एकजुट दाखविण्याची गरज बनली आहे.

## पेटवून घेतलेल्या युवकाचा मृत्यू

**कोल्हापूर ता.२८ (प्रतिनिधी)**

पारले (ता.चंदगड) येथे राहणारे दौलत बापू गुरव (वय ३८) यांनी २३ रोजी रात्री ८.३० वाजता आपल्या अंगावर पेट्रोल ओतून पेटवून घेतले होते. नातेवाईकांनी त्यांना हुबळी येथील रुग्णालयात दाखल केले होते. तेथे उपचार घेतल्यानंतर पुढील उपचारासाठी सीपीआरमध्ये दाखल केले. तेथे उपचार सुरू असताना शनिवार,ता.२८ रोजी रात्री त्यांचा मृत्यू झाला.

## विषप्राशनाने युवकाचा मृत्यू

कोल्हापूर, ता.२८ (प्रतिनिधी)–

कणेरीवाडी, ता. करवीर येथील अमोल परशुराम व्हटकर (वय ३३) या युवकाने घरात विषारी औषध प्राशन केले होते. नातेवाईकांनी त्याला सीपीआर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# साखर कारखान्याची फसवणूक; पाच जणांविरुद्ध गुन्हा

**मिरज,ता.२८ ( प्रतिनिधी)–**

**मिरज तालुक्यातील आरग येथील मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखान्याची २५ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी बीड जिल्ह्यातील पाच जणांविरुद्ध मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी कारखान्याच्या शेती विभागाकडून पोलिसात फिर्याद देण्यात आली आहे.**

मिरज ग्रामीण पोलिसांनी रंगनाथ ज्ञानोबा आंधळे, राधाबाई रंगनाथ आंधळे, विकास बारीकराव सारूक (तिघे राहणार आंधळेवाडी, तालुका केज, जिल्हा बीड), बाबुराव मधुकर ठोंबरे (राहणार धोतरासरणी, सांगवी, तालुका केज), बाबू राजाराम हांगे (राहणार रामेश्वरवाडी, तालुका केज, जिल्हा बीड) या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, वरील पाच जणांनी संगणमत करून ऊसतोड मजूर व वाहतूक यंत्रणा पुरविण्याचे अमिष दाखवून मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने मोहनराव शिंदे सहकारी ऊस तोडणी वाहतूक संस्था यांच्याशी करार करून त्यांच्याकडून २५ लाख रुपये घेऊन फसवणूक केली आहे. या फिर्यादीनुसार मिरज ग्रामीण पोलिसांनी वरील पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास करीत आहेत.



# अपघातातील मयताच्या वारसांना ६० लाखांची नुकसान भरपाई

**कोल्हापूर,ता.२८ –**

**येथील श्रेयांश म. अथणीकर यांचे कारला एक्सप्रेस वे वर कामशेत येथे ट्रक (क्र.एमएच ४२ – टी – ५५९९) ने धडक दिल्याने तो मृत्यूमुखी पडला. याप्रकरणी मयताच्या वारसांनी न्यायालयात दावा दाखल केला होता.याचा निकाल नुकताच न्यायालयाने दिला.**

वारसांना ट्रकचे एच.डी.एफ.सी. विमा कं. ने ६० लाखांची भरपाई देण्याचा आदेश झाला. सदर चेक वारसांना प्रदान करताना जिल्हा व सत्र न्यायमूर्ती डी. व्ही. कश्यप, आर. व्ही. उत्पात, एस. एस. तांबे व ॲड. निखिल कोरे, ॲड. सी. बी. कोरे व सुधाकर वाटेगावे आदि मान्यवर उपस्थित होते. या दाव्यासाठी ॲड. सी. बी. कोरे (रेंदाळकर) यांनी काम पाहिले.

# जि. प. बांधकाम सभापती निवडीत युवा नेत्याला न्याय देणार का?

## शिवाजी जाधव यांच्या निवडीकडे जिल्ह्याचे लक्ष

**हुपरी,ता.२८ (वार्ताहर)–**

**कोल्हापूर जिल्ह्यात शिवसेना (शिंदे गट) वाढवण्याऐवजी स्थानिक पातळीवर अंतर्गत गटबाजीलाच खतपाणी घातले जात असल्याचे चित्र आहे. हातकणंगले मतदारसंघात शिवसेनेने तीनही जागा जिंकून १०० टक्के यश मिळवले. मात्र, असे असूनही कट्टर शिवसैनिक शिवाजी जाधव यांना जिल्हा परिषदेच्या महत्त्वपूर्ण बांधकाम सभापती पदापासून जाणीवपूर्वक डावलले जात असल्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे.**

**हातकणंगलेच्या यशाकडे दुर्लक्ष?**

सध्या जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी, भाजप, जनसुराज्य आणि शिवसेना शिंदे गटाची सत्ता असून बांधकाम समितीचे सभापतीपद शिंदे गटाकडे आले आहे. जिल्ह्यात पक्षाचे एकूण ९ जि.प. सदस्य आहेत. राधानगरी–भुदरगडमध्ये राज्याचे मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री आ. प्रकाश आबिटकर यांचे वर्चस्व असून, जि.प. चे शिवसेनेचे गटनेतेपदही त्याच मतदारसंघातील अरुण जाधव यांना दिले गेले आहे. करवीरमध्ये आ. चंद्रदीप नरके यांच्याकडे साखर कारखान्याची ताकद आहे. मात्र, हातकणंगले लोकसभा मतदारसंघात खा. धैर्यशील माने यांच्या व्यतिरिक्त पक्षाकडे मोठे सत्ताकेंद्र नाही. तरीही या मतदारसंघातून शिवसेनेने तीन जागांवर दणदणीत विजय मिळवला होता.

**जिंकणार बाजी, आपला शिवाजी... तो शब्द खरा ठरणार का?**

रेंदाळ येथील निवडणूक प्रचारसभेत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवाजी जाधव यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास व्यक्त करत, ''जिंकणार बाजी, आपला शिवाजी'' अशी साद जनतेला घातली होती. आता जिल्हा परिषदेच्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या बांधकाम सभापती पदाची माळ गळ्यात पडण्याची वेळ आली असताना, उपमुख्यमंत्र्यांचा तोच विश्वास सार्थ ठरवत शिवाजी जाधव खरोखरच बाजी मारणार का? की स्थानिक गटबाजीचा फटका त्यांना बसणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

**राजकीय भीतीपोटी कोंडी**

रेंदाळ जि. प. मतदारसंघातून निवडून आलेले शिवाजी जाधव यांचे नाव बांधकाम सभापतीपदासाठी आघाडीवर आहे. विद्यार्थी दशेपासूनचे निष्ठावान कार्यकर्ते, अभ्यासू वक्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अत्यंत विश्वासातील युवा नेते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना हे पद दिल्यास हातकणंगले विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची ताकद कैकपटीने वाढेल, अशी ठाण्यातील पक्षश्रेष्ठींचीही धारणा आहे. मात्र, जाधव यांना सभापतीपद मिळाल्यास खा. धैर्यशील माने यांची ताकद वाढेल आणि शिवाजी जाधव यांचे स्वतःचे नेतृत्व अधिक प्रबळ होईल, या राजकीय भीतीपोटी स्थानिक पातळीवरील काही नेत्यांनी त्यांची कोंडी करत पंख छाटण्याची मोहीम उघडली आहे. यामुळे या निवडीत शिवसेनेतील अंतर्गत गटबाजी उफाळून येत असल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे.

**पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेणार?**

आता पक्षनेतृत्व या स्थानिक गटबाजीला बळी पडून हातकणंगलेला पुन्हा वाऱ्यावर सोडणार? की शिवाजी जाधव यांच्या सारख्या तडफदार युवा नेत्याला न्याय देणार? याचीच उत्सुकता संपूर्ण जिल्ह्याला लागली आहे.

# भ. महावीर जन्म कल्याणक महोत्सव निमित्त विविध कार्यक्रम

**कबनूर,ता.२८ (वार्ताहर) –**

**येथील दिगंबर जैन समाज वीर सेवा दल व वीर महिला मंडळ यांच्या वतीने भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

रविवार ता.२९ मार्च रोजी सकाळी ९.०० वाजता रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.सायंकाळी ६.३० वाजता वृषभ अकिवाटे यांचा आमचा कला प्रवास हा कार्यक्रम आहे.रात्री ८.०० वाजता सवाल व कुपन लकी ड्रॉ सोमवार ता.३० मार्च रोजी सकाळी ८.०० वाजता भगवंतांचा अभिषेक व सामुदायिक नवकार मंत्राचा जप, मंगळवार ता.३१ मार्च रोजी सकाळी ७.०० वाजता ध्वजारोहण व लघु अभिषेक पूजा सकाळी ८.०० वाजता भगवंतांची भव्य पालखी व मिरवणूक, १०.०० वाजता रक्तदान शिबिर ११.०० वाजता जनकल्याण महोत्सव ११.३० वाजता महाप्रसाद सायंकाळी ७.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जिल्हाधिकारी येडगे यांचा सन्मान

**कोल्हापूर, ता.२८ (प्रतिनिधी)–**

**प्रशासकीय कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर केल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्याने ई–गव्हर्नन्स क्षेत्रात आघाडी घेतली आहे. राज्य शासनाद्वारे राबविण्यात आलेल्या १५० दिवसांच्या ई–गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या अंतिम मूल्यमापनात कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयाने २०० पैकी १७७ गुण मिळवून राज्यात ५ वा क्रमांक प्राप्त केला होता. याबद्दल शनिवारी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.**



जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची या द्वारे दखल घेण्यात आली आहे. एआय–ऑफिस लेन्स आणि सुरक्षित कार्यालय प्रशासकीय शिस्त आणि सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने एआय–ऑफिस लेन्स हा अत्याधुनिक उपक्रम राबवला आहे. या अंतर्गत कार्यालयातील विद्यमान सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वापर करून कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे कर्मचाऱ्यांची स्वयंचलित हजेरी आणि प्रतिबंधित क्षेत्रातील हालचालींचे विश्लेषण केले जात आहे. तसेच कार्यालय कवच उपक्रमांतर्गत पार्किंग आणि गर्दी व्यवस्थापनावर लक्ष ठेवले जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे जलद निपटारा महसुली खटल्यांमध्ये गतिमानता आणण्यासाठी मित्र प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. याशिवाय, महालक्ष्मी मंदिर आणि जोतिबा यात्रेतील गर्दीचे नियोजन करण्यासाठी स्मार्ट क्राउड मॅनेजमेंट प्रणालीद्वारे हीटमॅप्स वापरून रिअल–टाइम मॉनिटरिंग केले जात आहे.

# जिल्ह्यात अवकाळी पावसाचा तडाखा

**कोल्हापूर ता. २८ (प्रतिनिधी)–**

**कोल्हापूर शहर आणि जिल्ह्याच्या विविध भागात शुक्रवारी सायंकाळी सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि गारांसह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून जाणवणाऱ्या कडक उन्हाच्या झळानंतर अचानक आलेल्या या बदलामुळे नागरिकांना उष्णतेपासून दिलासा मिळाला असला, तरी काढणीला आलेल्या पिकांचे मात्र, नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे प्रामुख्याने आंबा आणि काजू पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय द्राक्षे, केळी आणि पपई या फळबागांनाही या पावसाचा तडाखा बसला आहे.**



टोपमध्ये पावसामुळे घराचे झालेले नुकसान

काढणीच्या उंबरठ्यावर असलेला गहू, शाळू (ज्वारी) आणि हरभरा या पिकांना धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी गारांच्या मारामुळे पिके शेतातच सडण्याची भीती निर्माण झाली आहे. वादळी वाऱ्यामुळे भाजीपाल्याची पिके देखील जमीनदोस्त झाली असून, शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. विद्युत यंत्रणेवर परिणाम झाला. डांब कोसळणे, तारा तुटणे यामुळे शेतीसाठी आवश्यक सिंचन सुविधेसाठी लागणारी लाईट वितरण व्यवस्था पूर्ववत येण्यास वेळ लागणार असल्याने शेतकरी चिंतेत आहे. काही ठिकाणी वीज कोसळल्याची घटना घडल्या, ज्यामुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण पसरले.

जिल्ह्यातील भुदरगड, राधानगरी, पन्हाळा आणि शिरोळ या तालुक्यांमध्ये पावसाचा जोर अधिक होता. शिरोळ तालुक्यात काढणीला आलेला शाळू जमीनदोस्त झाल्याने तो आता जनावरांच्या चाऱ्यासाठी वापरण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. अनेक ठिकाणी पिकांचे पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्याच्या काही भागात पुढील काही दिवस ढगाळ वातावरण राहणार असून ३० मार्च ते १ एप्रिल दरम्यान पुन्हा वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# मिरजेत महिलेस फसवून जमीन विकली

## ११ जणांविरुद्ध गुन्हा

**मिरज,ता.२८ (प्रतिनिधी)–**

**अन्य महिलेस उभे करून, खोटी सही व अंगठा करून, महिलेची फसवणूक करून परस्पर जमिनीची विक्री केल्याची फिर्याद पोलिसात देण्यात आली आहे. मिरजेतील दुय्यम निबंधक कार्यालयात घडलेल्या या घटनेबाबत मिरज शहर पोलिसांनी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.**

रिना आनंद काळे (वय ४५, रा. श्रीहरी नगर, जिल्हा परिषद कॉलनी जवळ, कोल्हापूर) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार मिरज शहर पोलिसांनी रामनाथ शंकर शिंदे (वय ५३), सोमनाथ बाबा मोरे, जिजा बाबा मोरे, तातोबा धोंडी जाधव (वय ७०), चंद्रकांत नारायण मोरे (वय ६२), लक्ष्मण आपुन्या अटक (वय ४८), राजू मारुती सर्वदे, दगडू बाळू आयरेकर, दादोबा गोविंद जाधव (वय ८१), राजू शामराव भोसले, जयवंत नामदेव चौगुले (सर्व रा. मिरज) या ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. वरीलपैकी राजू सर्वदे व दगडू आयरेकर हे दोघे सध्या मयत झाले असल्याची नोंद पोलिसात झाली आहे.

याबाबत पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, वरील ११ जण हे फिर्यादी काळे यांना ओळखतात. त्या सर्वांनी संगणमत करून फिर्यादी काळे यांच्या जागी बोगस व बनावट महिला (नाव सुगंधा शंकर भोसले, रा. मिरज) यांना उभे करून सदर महिला फिर्यादी रीना काळे आहेत असे भासवले. फिर्यादी काळे यांची खोटी सही व अंगठा करून फिर्यादी काळे यांच्या हिश्याची जमीन त्यांना कोणतीही माहिती न देता परस्पर अश्विन विजय पवार (रा. माधवनगर सांगली) यांना खरेदी देण्यास मदत केली आहे. वरील ११ जण हे काळे यांना ओळखत असूनही त्यापैकी कोणीही त्यांना याबाबत माहिती दिली नाही. वरील सर्वांनी आपसात संगणमत करून फसवणूक केली असल्याची फिर्याद काळे यांनी पोलिसात दिली आहे. मिरज शहर पोलिसांनी वरील ११ जणांना विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास करीत आहेत.

**CHANGE OF NAME**

My old Name **SAGAR SANJIV PATIL** Do hereby Solemnly Declare My New Name as **SAGAR SANJEEV PATIL** for Passport Issues

# दुचाकीत लपवलेले गावठी रिव्हॉल्व्हर जप्त

## संशयितास शिताफीने अटक १.७० लाखांचा मुद्देमाल जप्त

**कोल्हापूर, ता.२८(प्रतिनिधी)–**

**दुचाकीमध्ये गावठी बनावटीचे रिव्हॉल्व्हर लपवून फिरणाऱ्या व्यक्तीला करवीर पोलिसांनी शिताफीने अटक केली. या कारवाईत रिव्हॉल्व्हरसह दुचाकी असा सुमारे १ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

पंढरीनाथ श्रीपती पाटील (वय ५०, रा. म्हालसवडे, ता.करवीर) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे. म्हालसवडे परिसरात पाटील हा आपल्या दुचाकीच्या कप्प्यात रिव्हॉल्व्हर लपवून फिरत असल्याची माहिती पोलीस हेड कॉन्स्टेबल सुभाष सरवडेकर यांना मिळाली होती. त्यांनी ही माहिती पोलीस निरीक्षक किशोर शिंदे यांना दिल्यानंतर तात्काळ कारवाईचे नियोजन करण्यात आले.

२७ मार्च रोजी सायंकाळी पोलिसांनी म्हालसवडे येथे जाऊन संशयिताची दुचाकी तपासली असता, त्यात गावठी बनावटीचे रिव्हॉल्व्हर आढळून आले.

या रिव्हॉल्व्हरमध्ये सहा राऊंड क्षमतेचे धातूचे सिलेंडर असल्याची माहिती पोलिसांनी दिली. बेकायदेशीरपणे शस्त्र बाळगल्याप्रकरणी पाटील याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**हार्दिक अभिनंदन!**



मा. श्री. मनोज तराळ



मा. श्री. आशिष खंडेलवाल



मा. श्री. प्रविण बनसोडे

आमचे परममित्र श्री. मनोज तराळ यांची भाजपा युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा सरचिटणीस पदी तसेच श्री. आशिष खंडेलवाल व श्री. प्रविण बनसोडे यांची भाजपा युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झालेबद्दल हार्दिक अभिनंदन!

जयेश उदयराव बुगड * योगेश निर्मळ * सतिश पंडीत

# 'गोकुळ' बिनविरोध करण्यासाठी राजकीय भेटीगाठी

## प्रमुख नेत्यांच्या भूमिकेकडे लक्ष;नव्या राजकीय समीकरणांची चाचणी

कोल्हापूर ता.२८ (प्रतिनिधी)–

**गोकुळ दूध संघाच्या आगामी निवडणुकीच्या सुरू असलेल्या हालचालींकडे केवळ सहकारी संस्थेची निवडणूक म्हणून पाहता येणार नाही. जिल्ह्यातील बदललेली राजकीय समीकरणे, महायुतीचे वाढते वर्चस्व आणि स्थानिक पातळीवरील गटबाजी या सर्वांचा एकत्रित परिणाम या प्रक्रियेत दिसून येत आहे.**



गोकुळमधील २१ पैकी १७ संचालक एकत्र येऊन निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न करत आहेत. या संचालकांनी अलीकडेच जनसुराज्य शक्ती पक्षाचे आमदार विनय कोरे यांची भेट घेतली. या भेटीत निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली. वरकरणी हा निर्णय सहकार क्षेत्रातील परंपरा जपण्याचा वाटत असला, तरी त्यामागे बहुमताचे शक्तीप्रदर्शन आणि विरोधकांवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न दिसत आहे.

मात्र, शोमिका महाडिक, बाळासाहेब खाडे, अंबरीश घाटगे आणि चेतन नरके हे चार संचालक या प्रक्रियेत सहभागी नसल्याने एकसंघतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संचालकांची भूमिका पुढील काळात निर्णायक ठरू शकते.

मागील निवडणुकीत 'राजर्षी शाहू परिवर्तन आघाडी'च्या माध्यमातून विविध पक्षांचे नेते एकत्र आले होते. यामध्ये वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री प्रकाश आबीटकर, काँग्रेसचे आमदार सतेज पाटील, आमदार चंद्रदीप नरके, आमदार विनय कोरे, तसेच माजी आमदार के. पी. पाटील यांचा समावेश होता. या सर्वांनी एकत्र येत माजी आमदार महादेवराव महादेव आणि स्व. आमदार पी. एन. पाटील यांच्या विरोधात मजबूत आघाडी उभी केली होती.

मात्र, सध्याच्या घडीला राज्य आणि जिल्हा पातळीवरील राजकारणात मोठे बदल झाले आहेत. गत निवडणुकीत एकत्र असलेले अनेक नेते आता महायुतीच्या छत्राखाली आले आहेत. हसन मुश्रीफ, प्रकाश आबीटकर यांच्यासह इतर नेत्यांनी महायुतीत भूमिका घेतल्याने सहकारी संस्थांमध्येही त्याचा प्रभाव दिसत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकार क्षेत्रातील निवडणुका महायुतीच्या माध्यमातून लढवण्याचा निर्णय झाल्याने गोकुळची निवडणूकही त्याच चौकटीत बसवण्याचा प्रयत्न सुरू आहे.सहकार क्षेत्रात उघडपणे पक्षीय राजकारण टाळण्याची परंपरा असल्याने 'बिनविरोध' हा पर्याय पुढे केला जात आहे. प्रत्यक्षात हा पर्याय म्हणजे सर्व गटांमध्ये सत्तावाटपाचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे. यात सतेज पाटील यांची भूमिका काय राहते, तसेच महायुतीतील इतर नेते कितपत एकमताने निर्णय घेतात, याकडे विशेष लक्ष लागले आहे.

दरम्यान, गोकुळच्या संचालक मंडळाची संख्या २१ वरून २५ करण्यात आली आहे. नव्याने वाढविण्यात आलेल्या चार जागा सध्या सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरत आहेत. या जागांवर कोणाला संधी मिळते, यावर भविष्यातील सत्ता कोणाच्या बाजूने झुकणार हे ठरणार आहे. त्यामुळेच या जागांबाबत अंतिम निर्णय स्थानिक पातळीवर न घेता, जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांकडे सोपवण्याची भूमिका घेतली गेली आहे.

नेत्यांच्या भेटीगाठी सुरू असणे हे केवळ औपचारिक स्वरूपाचे नसून, त्यामागे पडद्यामागील राजकीय चर्चा सुरू असल्याचे संकेत आहेत. विनय कोरे यांच्यापासून सुरू झालेला हा संवाद इतर प्रमुख नेत्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. बिनविरोध निवडणूक घडवून आणण्यासाठी सर्व गटांना समाधानकारक वाटप करणे आवश्यक आहे; अन्यथा नाराज गट निवडणुकीत उतरण्याची शक्यता आहे.गोकुळची निवडणूक ही सहकार क्षेत्रापुरती मर्यादित न राहता जिल्ह्यातील मोठ्या राजकीय समीकरणांची चाचणी ठरत आहे. बिनविरोध निवडणुकीचे प्रयत्न यशस्वी झाले, तर तो महायुतीच्या एकसंघतेचा संदेश ठरेल; अन्यथा मतभेद उघड होत ही निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# राधानगरी तालुक्यात सुर्यफूल पीक बहरले

शिरगाव ता.२८(प्रतिनिधी) –

**राधानगरी तालुक्यात रब्बी हंगामातील सुर्यफूल पिक सध्या फुलोऱ्याच्या अवस्थेत आहे. त्यामुळे पिवळ्या जर्द फुलांनी शिवार बहरला असून धरणी मातेने जणू पिवळा शालू परिधान केल्याचा भास होत आहे. यंदा तालुक्यात उन्हाळी हंगामातील सुर्यफूल , भुईमूग पिकांच्या लागवडीत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे .**



तालुक्यात शेतकरी रब्बी हंगामात तेलबियांचे पिक म्हणून सुर्यफूल व भूईमूग पिकाची लागवड करतात. साधारणतः जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या तसेच फेब्रुवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यात या पिकांची लागवड केली जाते.मे महिन्याच्या दरम्यान ही पिके काढणीला येतात . गेल्या काही वर्षापूर्वी तालुक्याच्या ग्रामीण भागात शेतकऱ्यांकडून भूईमूगाच्या तुलनेत सुर्यफूल पिके मोठ्या प्रमाणात घेतले जात होते. मात्र मध्यंतरी निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांमुळे सुर्यफुलापासून उपेक्षित उत्पन्न न मिळाल्याने मोठे नुकसान झाले.त्यामुळे शेतकऱ्यांनी सुर्यफूल पिक घेण्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे भूईमूग पिक घेण्याकडे शेतकऱ्यांचा अधिक कल दिसून येत होता. मात्र गतवर्षी दर्जेदार बियाण्यांमुळे सुर्यफूल पिकांपासून उपेक्षित उत्पादन मिळाल्याने यावर्षी लागवडीत वाढ झाली आहे. यंदा ही दोन्हीही पिकांची परिस्थिती समाधानकारक आहे. त्यामुळे यंदा अपेक्षित उत्पन्न मिळण्याची शक्यता शेतकरी वर्गातून वर्तवली जात आहे.

# राजापूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी प्रस्ताव तयार करा

## आम.राजेंद्र पाटील यांच्या पाटबंधारे विभागाला सूचना

जयसिंगपूर,ता.२८(प्रतिनिधी)–



**शिरोळ तालुक्यातील शेतीसाठी, पिण्याच्या पाण्यासाठी व उद्योगासाठी जीवनवाहिनी ठरलेल्या राजापूर बंधाऱ्याच्या दुरुस्ती व डागडूजीसाठी आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी पाटबंधारे विभागाला प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या असून, लवकरच या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे या बंधाऱ्याला नवसंजीवनी मिळणार आहे.**

राजापूर हा बंधारा महाराष्ट्र राज्याचा शेवटचा बंधारा आहे. या बंधाऱ्यामुळे परिसरातील शेकडो एकर शेतीला सिंचनाची सुविधा मिळते. ऊस, भाजीपाला व इतर नगदी पिकांसाठी हा बंधारा जीवनदायी ठरतो. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही या बंधाऱ्याचा मोठा आधार आहे.मागील वर्षी आलेल्या महापुरामुळे बंधाऱ्याची एक बाजू वाहून गेली आहे, तसेच गळतीचे प्रमाणही वाढले आहे. सध्या बंधाऱ्यातील पाण्याची गळती होवून कर्नाटक हद्दीत वाहून जात आहे. यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना अपेक्षित प्रमाणात पाणी मिळत नाही. भविष्यात गळती वाढल्यास शेतीबरोबर पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.

बंधाऱ्याच्या नादुरुस्तीमुळे पाण्याचा अपव्यय होण्याबरोबरच पिकांचे उत्पादन घटते आणि शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसतो. तसेच भूजल पातळीही घटण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याची मागणी वारंवार परिसरातील शेतकऱ्यांच्याकडून होत होती, या मागणीची दखल घेऊन आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी व डागडुजीसाठी पाटबंधारे विभागाला सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. बंधाऱ्याचे मजबुतीकरण, गळती रोखणे व पाणीसाठा वाढविण्यासाठी आवश्यक कामे हाती घेतली जाणार आहेत. या कामांसाठी लवकरच आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध होणार आहे. राजापूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीमुळे पाण्याचे योग्य नियोजन होऊन दिलासा मिळणार आहे.

# केडीसीने सहकारांतर्गत सहकार अभियान पुढे न्यावे

## रश्मी दरद:जिल्हा बँकेतर्फे महिला बचत गटांना धनादेशांचे वाटप

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी) –

**सहकार हे सर्वांगीण विकासाचे मूलभूत क्षेत्र आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सहकारातील संस्था तसेच सहकार वाढवण्यासाठी कार्यरत असलेल्या सर्वच घटकांना प्रोत्साहन देऊन ''सहकारांतर्गत सहकार'' हे अभियान ताकतीने पुढे न्यावे. यामुळे कोल्हापूर जिल्हा हा या चळवळीचे एक वेगळे आणि आदर्श मॉडेल ठरू शकेल, असे प्रतिपादन नाबार्डच्या महाराष्ट्र क्षेत्रीय कार्यालयाच्या चीफ जनरल मॅनेजर श्रीमती रश्मी दरद यांनी केले.**



महिला बचत गटांना धनादेशांचे वाटप करताना रश्मी दरद व इतर.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या केंद्र कार्यालयाला दिलेल्या भेटीप्रसंगी त्या बोलत होत्या.या भेटीत त्यांनी केडीसीसी बँकेच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत महिला बचत गटांना धनादेशांचेही वाटप केले. बँकेने समाजातील छोट्या- छोट्या घटकांना केलेल्या अर्थपुरवठ्याचे त्यांनी यावेळी कौतुक केले.

श्रीमती दरद यांच्या समवेत नाबार्डच्या पुणेच्या जनरल मॅनेजर श्रीमती स्मृती भगत, असिस्टंट मॅनेजर श्रीमती अनन्या एम, कोल्हापूरचे जिल्हा प्रबंधक आशुतोष जाधव आदी अधिकारीही उपस्थित होते. बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्या माने यांच्या हस्ते पाहुण्यांचे सत्कार करण्यात आले.

केडीसीसी बँकेच्या कामकाजाचा आढावा संचालक प्रताप उर्फ भैया माने यांनी सविस्तर मांडला. बँकेच्या तांत्रिक वाटचालीची माहिती आय. टी. विभागाचे रवी बाबर यांनी सविस्तर मांडली. स्वागत व प्रास्ताविक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. एम. शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन सौ. स्वाती कुंभार यांनी केले. एस.एस.काकडे यांनी आभार मानले. यावेळी बँकेच्या सर्व विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# श्री अंबाबाईच्या खजिन्यात १ कोटी ४० लाखांची रक्कम जमा

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)–

**पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीच्यावतीने दिनांक २३ ते २७ मार्च २०२६ या चार दिवसामध्ये श्री अंबाबाई मंदिरातील १२ दान पेट्यातील खजिन्याची मोजदाद करण्यात आली असून या बारा दानपेट्यामध्ये १ कोटी ४० लाख ६१ हजार ८५६ रुपये जमा झाल्याची माहिती पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे सचिव शिवराज नाईकवाडे यांनी दिली.**

| पेटी क्र. | रक्कम |
|---|---|
| १ | २७,१४,२५६, |
| २ | ३३,१०,९४१, |
| ३ | १,६२,७६७, |
| ४ | १,१२,७१७, |
| ५ | २,१७,७५७, |
| ६ | २,०८,७८२, |
| ७ | २८,६०,४२५, |
| ८ | २,२३,९०५, |
| ९ | १,०९,१४४, |
| १० | १,२४,३५४, |
| ११ | ३३,००,९०३, |
| १२ | ७,१५,९१४ |
| एकूण रक्कम : १,४०,६१,८६५ | |

श्री अंबाबाईच्या खजिन्यात जमा झालेल्या खजिन्याची मोजदाद बँक ऑफ बडोदा व पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली असून जमा झालेल्या खजिनाची एकूण रक्कम : १,४०,६१,८६५ इतकी आहे.

# इचलकरंजीत उद्यापासून श्रीमद् भागवत सप्ताहाचे आयोजन

इचलकरंजी,ता.२८–

**येथील जुना चंदुर रोडवरील कलागते मळा येथे श्रीमद् भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.श्री राधारमण परिवाराच्यावतीने हा सात दिवसीय आध्यात्मिक सोहळा ता.३० मार्च ते ५ एप्रिल दरम्यान दररोज सायंकाळी ५ ते ८ या वेळेत संपन्न होणार आहे.**

या सप्ताहात ब्रजवासी प्रख्यात वक्ते वैष्णवाचार्य श्री चंदन गोस्वामी हे श्रीमद् भागवताचे रसपूर्ण कथन करणार आहेत.तरी या कथेचा लाभ शहर परिसरातील सर्व भाविकांनी घ्यावा असे आवाहन आयोजकांच्यवतीने करण्यात आले आहे.

# जोतिबा यात्रा कालावधीत वाहतूक नियमन आदेश जारी

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी) –

**जोतिबा यात्रेतील भाविकांची सुरक्षा व मोटार वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी वाहतूक नियमन आदेश जारी केला आहे.**

त्यानुसार श्री क्षेत्र जोतिबा वाडी रत्नागिरी,येथील केर्ली फाटा- गायमुख- जुने आंब्याचे झाड (दानेवाडी क्रॉसिंग)-नवीन एस.टी. स्टॅन्ड- जुने एस.टी. स्टॅन्ड -एमटीडीसी-सेंट्रल प्लाझा-मेन पार्कींग-यमाई पार्कींग- श्रावणी हॉटेल-दानेवाडी फाटा- माले फाटा- म्हसोबा देवालय आणि श्रावणी हॉटेल गिरोली गाव टी पॉईट या दरम्यानच्या मार्गावर सर्व प्रकारच्या मोटार वाहनांना रस्त्याच्या दोन्ही बाजूस थांबण्यास व पार्कींग करण्यास मनाई केली आहे.या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती कायदेशीर कारवाईस पात्र राहील, असेही या अधिसूचनेत नमुद करण्यात आले आहे.

# जोतिबा यात्रेसाठी आरोग्य विभाग सज्ज

बोरपाडळे,ता.२८(वार्ताहर)–

**जोतिबा यात्रेसाठी महाराष्ट्रातून सुमारे दहा ते बारा लाख भाविक वाडी रत्नागिरीत येण्याची शक्यता आहे.या भक्तांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कोल्हापूर जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग सज्ज झाला आहे. या अनुषंगाने करण्यात आलेल्या व्यापक पूर्वतयारी आणि कृती आराखड्याचा आढावा घेण्यासाठी २७ मार्च जोतिबा आरोग्य पथक येथे एक बैठक पार पडली.**

प्रशासनाने भाविकांच्या आरोग्यासाठी विशेष सोयी-सुविधा केल्या. या बैठकीला २७० आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी परस्पर समन्वयाने कार्य करून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती प्रभावीपणे हाताळण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. जिल्हाधिकारी अमोल येडगे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस.व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मोहम्मदतुरुब अली - देशमुख, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ सुशांत रेवडेकर, तालुका आरोग्याधिकारी डॉ. शैलेश गायकवाड , डॉ हिरा निरंकारी उपस्थित होते .भाविकांना तातडीची वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी आरोग्य विभागाने योग्य नियोजन केले आहे.चोवीस तास वैद्यकीय सेवा आणि सुसज्ज रुग्णवाहिका वैद्यकीय पथके मंदिर परिसर, गायमुख आणि तालुका दवाखाना या तीन मुख्य ठिकाणी ही पथके चोवीस तास कार्यरत राहतील. अठरा रुग्णवाहिका यात्रेकरूंच्या सेवेसाठी उपलब्ध असतील, ज्यात अतिरिक्त एएलएस,बीएलएस सुविधांचा समावेश आहे.रुग्णालयांमध्ये बेड्स आरक्षित कोणतीही गंभीर परिस्थिती उद्भवल्यास रुग्णांना दाखल करण्यासाठी जवळच्या रुग्णालयांमध्ये बेड्स आरक्षित ठेवण्यात आले आहेत: सीपीआर हॉस्पिटल- कोल्हापूर- पंचवीस बेड ,उपजिल्हा रुग्णालय कोडोली - पंधरा बेड- ग्रामीण रुग्णालय,पन्हाळा -दहा बेड याशिवाय पुरेसा औषधसाठा आणि वैद्यकीय साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.यावेळी डॉ. कुणाल चव्हाण, अशोक खाडे - पाटील, महेश सातोसे, मारुती चौगुले, प्रवीण मुळीक, एकनाथ जोशी, अल्ताफ शेख, जयवंत कोरे, दिपक नामे, श्री.माजगावकर, सागर चव्हाण,निवास पाटील,वैद्यकीय अधिकारी,समुदाय आरोग्यधिकारी, औषध निर्माण अधिकारी तालुका व जिल्हा स्तरावरील अधिकारी कर्मचारी , सुपरवायझर, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य सेवक, आरोग्यसेविका उपस्थित होते.यावेळी आरोग्य कर्मचाऱ्यांना ३०० टी-शर्ट आणि कॅपचे वाटप करण्यात आले.

# अत्याचाराचा आकडा शून्यावर असायला हवा

## -जिल्हाधिकारी येडगे

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्हा हा राजर्षी शाहू महाराजांच्या समतेच्या विचारांचा वारसा जपणारा जिल्हा आहे. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत येथे अनुसूचित जाती-जमातींवरील अन्यायाचे प्रमाण कमी असले, तरी हे प्रमाण पूर्णपणे शून्यावर आणण्यासाठी नागरिक आणि प्रशासनाने सोबत कंबर कसावी, असे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले.**



जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीप्रसंगी घेतलेले छायाचित्र.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासोबतच समाजात या कायद्याबाबत व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन केले.

बैठकी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी पोलीस विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना तपासात दिरंगाई न करण्याच्या सूचना दिल्या. कोणत्याही परिस्थितीत गुन्ह्याचे दोषारोपपत्र मुदतीत न्यायालयात दाखल व्हायला हवे, असे त्यांनी सांगितले. मागील बैठकीतील प्रलंबित प्रकरणे पुढील बैठकीपूर्वी मार्गी लावून त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले. या बैठकीत पोलीस तपासावर असलेल्या २१ प्रकरणांपैकी ७ प्रकरणांत दोषारोप पत्र दाखल झाल्याचे सांगण्यात आले, तर उर्वरित १४ प्रकरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच पुर्वीच्या पीडित ११ व्यक्तींना तातडीने अर्थसहाय्य मंजूर करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

या महत्वपूर्ण बैठकांना निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन साळे, पोलीस उपअधीक्षक सुवर्णा पत्की, पोलीस निरीक्षक पुष्पा किर्दत्त विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# पंचगंगेमधील जलपर्णीचा कृष्णेलाही विळखा

## कृष्णेचेही पाणी दूषित ;नदीकाठच्या नागरिकांच्या आरोग्याला धोका

बुबनाळ ता.२८(वार्ताहर)–

**कुरुंदवाड येथील दिनकरराव यादव पुलाजवळ पंचगंगा नदी पात्रात जलपर्णीचा वेढा पडला आहे.ही जलपर्णी नदीप्रवाहातुन वाहत वाहत नृसिंहवाडी संगम घाटावरुन श्री दत्त मंदिर,औरवाड पुलापर्यंत कृष्णेच्या नदीपात्रातही पसरु लागली आहे.यामुळे पंचगंगेबरोबरच आता शिरोळ तालुक्यातील कृष्णेच्या नदीपात्रातही जलपर्णीचा विळखा पडु लागला आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की,गेल्या दोन महिन्यापासुन दुषित पाण्यामुळे पंचगंगा नदीपात्रात जलपर्णीने आपली पाळेमुळे घट्ट केली आहेत.ही जलपर्णी कुरुंदवाडच्या पंचगंगा नदीपात्रात दिनकरराव यादव पुलाखालुन प्रवाहीत होत नृसिंहवाडी संगम घाटाजवळ विस्तारली आहे.



नृसिंहवाडी येथे पंचगंगा व कृष्णा या दोन नद्यांचा संगम झाला आहे.या संगमामुळे कृष्णेच्या प्रवाहाचा पंचगंगेच्या पाण्याला दाब बसतो.या दाबामुळे पंचगंगेचे पाणी मागे सरकुन नृसिंहवाडी श्री दत्त मंदिराकडे उलटे म्हणजे उत्तरेकडे प्रवाहीत होते.पंचगंगेच्या पाण्याच्या या उलट्या प्रवाहामुळे नदीपात्रातील जलपर्णी कृष्णानदीच्या किनाऱ्यालगत हळुहळु सरकत नृसिंहवाडी येथील श्री दत्त मंदिर,औरवाड पुलाखालुन ओतवाडी, शुक्लतीर्थ पर्यंत पसरु लागली आहे.पंचगंगेतील या जलपर्णीमुळे कृष्णेचे पाणीही दुषित होवू लागले आहे.परिणामी नृसिंहवाडी,औरवाड या कृष्णाकाठावरील दोन्ही गावातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.यावर वेळीच उपाय न केल्यास कृष्णानदीपात्रातही जलपर्णीचा मोठा विस्तार होवु शकतो.कारण पाण्यात एकदा जलपर्णी तयार झाली की,काही दिवसातच तिचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होतो.

ही पाण्याच्या पृष्ठभागावर जाड थर तयार करून पसरल्यामुळे पाण्यात जाणारा सुर्यप्रकाश आणि ऑक्सिजन प्रवेश रोखते.यामुळे पाण्यातील जीवनप्रक्रिया थांबते.परिणामी नदीपात्रातील पाणी दुषित होवुन पाण्याला दुर्गंधी येते. हे पाणी जलचर प्राणी,शेतीच्या सिंचनासाठी तसेच माणसांनाही पिण्यासाठी घातक असते.

### जलपर्णी कशी तयार होते?

शहरातील,गावातील ,विविध औद्योगिक वसाहतीमधील कारखान्याचे प्रक्रिया न केलेले सांडपाणी,रासायनिक मळीमिश्रित पाणी नदीत मिसळल्यामुळे पाण्यात नायट्रोजन व फॉस्फरसचे प्रमाण वाढते. हे जलपर्णीच्या वाढीसाठी खत म्हणुन काम करते.ही एकदा पाण्यात तयार झाली की,काही दिवसातच शेकडो पुंजक्याच्या रुपात नदीपात्रातील पाण्याच्या पृष्ठभागावर पसरते.यामुळे पाणी दुषित होते.

### दुषित पाण्यामुळे शिरोळ बंधाऱ्यावर हजारो मासे मृत

जलपर्णीमुळे जलचर जीवांना ऑक्सिजन न मिळाल्याने काही दिवसापूर्वीच शिरोळ बंधाऱ्याजवळ हजारो मासे मृत्युमुखी पडले होते.याबाबत काही सामाजिक संघटनानी आवाज उठवुन प्रदुषण मंडळाला याची जाणीव करुन दिली होती.यामुळे काही औद्योगिक कारखाने बंद करण्यात आले होते.

# स्थानिक स्वराज्य संस्थेत मतपत्रिकेद्वारे मतदान

## विधेयक विधान परिषदेतही मंजूर; निवडणूक प्रक्रियेत बदल

बेंगळुरू,ता.२८(प्रतिनिधी)-

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राऐवजी (ईव्हीएम) मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याचा निर्णय घेतल्याने राज्यातील निवडणूक प्रक्रियेत मोठे बदल अपेक्षित आहेत.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राऐवजी (ईव्हीएम) मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची तरतूद करणारे कर्नाटक ग्राम स्वराज आणि पंचायत राज (दुरुस्ती) विधेयक २०२६ विधान परिषदेतही मंजूर झाले आहे. या बदलामुळे मतदानाची पद्धत, मतमोजणीची गती आणि निवडणूक व्यवस्थापनावर थेट परिणाम होणार आहे.

नवीन तरतुदीनुसार ग्रामपंचायत, नगरपालिकांसह स्थानिक संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदारांना पारंपारिक मतपत्रिकेवर



शिक्का मारून मतदान करता येणार आहे. यामुळे तांत्रिक अडचणींचा प्रश्न कमी होईल; मात्र मतमोजणीसाठी लागणारा वेळ वाढण्याची शक्यता आहे. ईव्हीएमच्या तुलनेत मतपत्रिका वापरल्यास मतदान प्रक्रिया अधिक सोपी वाटत असली तरी त्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ आणि नियोजनाची गरज भासणार आहे. ग्रामीण भागात काही ठिकाणी ईव्हीएमबाबत असलेली शंका कमी करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरू शकतो. ईव्हीएममुळे काही तासांत निकाल स्पष्ट होतात; मात्र मतपत्रिकेमुळे मतमोजणी प्रक्रिया दीर्घकाळ चालू शकते. निकाल जाहीर होण्यास उशीर होण्याची शक्यता असल्याने राजकीय वातावरण अधिक काळ तापलेले राहू शकते.मतपत्रिका प्रणालीमुळे मतदारांना मतदानाची प्रक्रिया अधिक दृश्यमान वाटते. त्यामुळे पारदर्शकतेबाबत विश्वास वाढू शकतो. दुसरीकडे, मतपत्रिकांची छपाई, वाहतूक, सुरक्षितता आणि साठवणूक यामुळे प्रशासनावर मोठा ताण येणार आहे. या बदलामुळे स्थानिक पातळीवरील निवडणुका अधिक स्पर्धात्मक आणि संवेदनशील होण्याची शक्यता आहे. निकाल उशिरा लागल्याने राजकीय समीकरणे बदलण्यासही वेळ मिळू शकतो. मतपत्रिकेचा वापर हा विश्वास वाढविण्याचा प्रयत्न असला तरी वेळ, खर्च आणि व्यवस्थापन ही मोठी आव्हाने ठरणार आहेत.

### चिकोडीत हनुमान जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

चिकोडी,ता.२८(प्रतिनिधी)-

**येथील हरी नगरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या प्रसन्न अंजनेय मंदिरात हनुमान जयंती उत्सवानिमित्त ३१ मार्च ते २ एप्रिलअखेर विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

उत्सवानिमित्त ३१ रोजी ४ वाजता आहार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. १ एप्रिल रोजी भक्ती गायन व भक्ती नृत्य कार्यक्रम होणार आहे. २ एप्रिल रोजी अभिषेक,हरी नगरातील प्रत्येक गल्लीतून पालखी मिरवणूक,भक्ती संगीत सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी महाप्रसाद वितरण करण्यात येणार आहे. सायंकाळी भक्ती संगीत सादरीकरण, त्यानंतर आध्यात्मिक चिंतन व प्रवचन होणार आहे. कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन प्रसन्न अंजनेय सेवा संघ व भाविकांतर्फे करण्यात आले आहे.

# कर्नाटकात पहिलीत प्रवेशासाठी वयोमर्यादेत सवलत

## यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी सरकारचा महत्त्वाचा निर्णय

बेंगळुरू,ता.२८(प्रतिनिधी)-

**सहा वर्षे पूर्ण न झालेल्या मुलांच्या पालकांना राज्य सरकारने दिलासा दिला आहे. पहिलीत प्रवेशासाठी सहा वर्षे पूर्ण असणे बंधनकारक केले होते. या नियमात यंदाच्या म्हणजे २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी सवलत देण्यात आली आहे. यासंदर्भात शिक्षणमंत्री मधु बंगारप्पा यांनी विधानसभेत घोषणा केली.**

मंत्र्यांनी सांगितले की, पहिलीत प्रवेशासाठी सहा वर्षे पूर्ण असणे आवश्यक असले तरी यावर्षीही या नियमात ६० दिवसांची (दोन महिन्यांची) सवलत देण्यात येणार आहे. त्यामुळे पाच वर्षे १० महिने वय असलेल्या मुलांनाही पहिलीत प्रवेश घेता येणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रवेश प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअरमध्ये आवश्यक बदल केले जाणार आहेत. तसेच एलकेजी आणि युकेजी वर्गांसाठी सध्या कोणतीही ठोस वयोमर्यादा नसल्यामुळे प्रवेश प्रक्रियेत अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या स्तरांवरही वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी स्वतंत्र कायदा आणण्याचा सरकारचा विचार आहे. विधानसभेत याबाबत चर्चा करताना आम.अरविंद बेल्लद यांनी हा प्रश्न दरवर्षी निर्माण होतो, त्यामुळे कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी केली. त्यावर मंत्री बंगारप्पा यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच कायदा करून ही प्रक्रिया नियमित केली जाईल, असे आश्वासन दिले.

**शिक्षण कायद्यात दुरुस्ती करणार**

दरम्यान, या बदलासाठी कर्नाटक शिक्षण कायद्यात दुरुस्ती करून पुढील अधिवेशनात विधेयक मांडले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.या निर्णयामुळे वयोमर्यादेमुळे आतापर्यंत प्रवेशापासून वंचित राहणाऱ्या मुलांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# कोगनोळीत पावसाचा आठवडा बाजारावर परिणाम

कोगनोळी,ता.२८(प्रतिनिधी)-

**शुक्रवार हा कोगनोळीचा मुख्य आठवडी बाजाराचा दिवस असल्याने परिसरात मोठी गर्दी होती. सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास अचानक आकाश ढगांनी व्यापून गेले आणि जोरदार वारे वाहू लागले. पावसाची शक्यता दिसताच बाजारात मालाची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांची आपल्या वस्तू सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी मोठी धावपळ उडाली. ताडपत्री आणि आडोशाच्या शोधात असलेल्या ग्राहकांमुळे बाजारपेठेत काही काळ गोंधळ उडाला.**

पाऊस जरी मध्यम स्वरुपाचा असला तरी सोसाट्याचा वारा आणि विजांचा झगमगाट यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. वाऱ्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला होता. धूळमिश्रित वारे आणि पावसाच्या शिरकावामुळे वाहनधारकांनाही कसरत करावी लागली. सायंकाळी ७ वाजेपर्यंत पाऊस सुरुच होता. एका



हातात पिशवी आणि एका हातात छत्री घेऊन नागरिक भाजीपाला खरेदी करताना दिसत होते.

पावसामुळे व्यापारावर परिणाम झाला. त्यामुळे ५० टक्के मालाची विक्री झाली नाही. भाजीपाला दर स्वस्त लावूनही अनेक ग्राहकांनी त्याकडे पाठ फिरवली. त्यामुळे ५० टक्के माल व्यापाऱ्यांना विक्रीविना परत न्यावा लागला. मध्यम स्वरुपाच्या पडलेल्या पावसानंतर काही काळ वातावरणात गारवा निर्माण झाला. अद्यापही या परिसरातील नागरिक मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

### अंतुर्लीत जनावरांसाठी वंध्यत्व तपासणी शिबीर संपन्न

गारगोटी,ता.२८(प्रतिनिधी)-

**जि.प.कोल्हापूर व पं.स. भुदरगड यांच्यावतीने अंतुर्ली (ता.भुदरगड) येथे पाळीव जनावरांसाठी वंध्यत्व तपासणी व उपचार शिबीर संपन्न झाले.**

शिबिरात जनावरांची वंध्यत्व तपासणी,जंत निर्मूलन,गोचीड निर्मूलन यावर मोफत उपचार मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती बाबा नांदेकर, पंचायत समिती सदस्य धनंजय लाड,सरपंच रामदास देसाई,माजी सरपंच नारायण भुतल गावातील प्रमुख पशुपालक व नागरिक उपस्थित होते.

# चिकोडीत ४ एप्रिलला 'करीअर मेळावा'

चिकोडी,ता.२८(प्रतिनिधी)-

**विद्यार्थ्यांच्या भविष्याची दिशा स्पष्ट करण्यासाठी आणि विविध व्यावसायिक पर्यायांची सखोल माहिती देण्यासाठी, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था (डाएट), चिकोडी यांच्यावतीने ता.४ एप्रिल २०२६ रोजी शहरात भव्य 'करीअर मेळावा' आयोजित करण्यात आला आहे.**

हा मेळावा विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरेल, अशी माहिती जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संजीव हुल्लोळी यांनी दिली.हुल्लोळी पुढे म्हणाले, डाएट चिकोडी येथे व्यावसायिक आणि करिअर मार्गदर्शन चे आयोजन केले असून या कार्यशाळेत इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवण्याच्या उद्देशाने हा मेळावा शहरातील जीटीटीसी कॉलेजमध्ये शनिवारी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे.मेळाव्यात दहावी व बारावी नंतर उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक पर्यायाची माहिती दिली जाईल.हा मेळावा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी व योग्य करिअरची निवड करण्यासाठी असून जास्तीत जास्त विद्यार्थी आणि पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य हुल्लोळी यांनी केले आहे.



# निपाणीत श्रीराम नवमीची पालखी सोहळ्याने उत्साहात सांगता

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)-

**गेल्या नऊ दिवसापासून चालू असलेल्या श्री रामनवमी उत्सवाची पालखी सोहळ्याने शुक्रवारी सकाळी सांगता करण्यात आली.यावेळी श्रीराम मंदिरात सकाळी आरती करण्यात आली.**

श्रीराम मंदिर येथून पालखी सोहळ्यास प्रारंभ झाला.येथून पालखी जुना पीबी रोड, मंगळवार पेठ, येथील हनुमान मंदिरात जाऊन थांबली.तेथे रामरक्षा स्तोत्र पठण सर्व भक्तांनी केल्यानंतर पुन्हा पालखी जुना पीबीरोडमार्गे श्रीराम मंदिर येथे येऊन विसावली.या पालखी सोहळा दरम्यान इस्कॉन भजनी मंडळांनी प्रामुख्याने सहभाग घेतला होता.या पालखी सोहळ्यास श्रीराममंदिर ट्रस्ट पदाधिकाऱ्यांसह रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरगूडमध्ये श्रीरामनवमी उत्साहात साजरी

मुरगूड,ता.२८(प्रतिनिधी)-

**येथील श्रीराम मंदिर येथे श्री रामनवमी भक्तीमय वातावरणात पार पडली. सकाळी महाअभिषेक होऊन महाआरती झाली. त्यानंतर ह भ प श्रीरंग पाटील महाराज (हळदी करवीर) यांचे कीर्तन पार पडले. यानंतर बारा वाजता जन्मकाळ सोहळा पार पडला.**

जन्मकाळ सोहळ्यात उपस्थित महिलांनी पाळणा गायिला. संध्याकाळी भजन सोहळा झाला. यावेळी सुंठवडा आणि लाडूचे वाटप करण्यात आले.शहरातील राम भक्त आणि मुरगुड उपखंडमधील सर्व भक्तांनी या सोहळ्याचे नियोजन केले होते.सकाळपासूनच प्रभू श्री रामचंद्रांच्या दर्शनासाठी भावीक भक्तांनी मोठी गर्दी केली होती.या सोहळ्याचे नियोजन मंदिराचे पुजारी अनुबोध गाडगीळ, तानाजी भराडे, प्रकाश परिशवड, शिवाजी चौगले, संकेत शहा, पृथ्वीराज कदम, प्रफुल्ल कांबळे, नामदेव भराडे, आनंदा मोरे, जगदीश गुरव, आनंदा रामाने,धनंजय सूर्यवंशी, अमोल मेटकर,विनायक मेटकर, अमर सुतार, रघुनाथ बोडके, सुभाष अनावकर, महेश कुलकर्णी यांनी केले होते.

# पाचगावात साईबाबांचा उत्सव सोहळा उत्साहात साजरा

पट्टणकोडोली,ता.२८(प्रतिनिधी)

**पाचगाव (ता. करवीर) येथील स्व.बंडोपंत सत्तू पाटील आणि स्व.विलास सत्तू पाटील यांच्या स्मरणार्थ ओम साई बिल्डर्स आणि डेव्हलपर्सचे गोपाळ सत्तू पाटील आणि पाचगाव शेतकरी विकास सेवा संस्थेचे संचालक पांडुरंग सत्तू पाटील यांच्या पुढाकारातून पंचशील कॉलनीमध्ये साई मंदिर बांधण्यात आले आहे.**

या मंदिरामध्ये श्री रामनवमीनिमित्त सत्य साईबाबांचा उत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.



त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दिवसभर मंदिरामध्ये भाविकांनी दर्शनासाठी हजेरी लावली होती.तत्पूर्वी सकाळी पाटील परिवारातर्फे साईबाबांच्या मूर्तीस विधीवत पूजन करण्यात आले. धार्मिक विधी व पौराहित्य मयुर कोकीळकर यांनी केले. जन्मोत्सव सोहळा झाल्यानंतर भाविकांतर्फे पुष्पवृष्टी करण्यात आली.यावेळी पाचगावच्या लोकनियुक्त सरपंच प्रियांका पाटील, उपसरपंच दिपाली गाडगीळ, मोरे शिवाली देसाई, सई निकम यांच्यासह महिला भगिनींनी पाळणा सादर केला. त्यानंतर सुंठवडा वाटप करण्यात आला. यावेळी हजारो भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. त्यानंतर संभाजीनगर येथील योगीराज समर्थ भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम पार पडला.याप्रसंगी विश्वनाथ पाटील, अमर पाटील, डॉ.शिल्पा हजारे यांच्यासह मान्यवरांनी सदिच्छा भेट देऊन श्रींचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.यावेळी संग्राम पाटील, दिलीप जाधव, नारायण गाडगीळ, संजय पाटील, प्रकाश गाडगीळ, वकील शिवाजी निकम, रविकिरण देसाई, वकील प्रशांत निकम, अमर मोरे, मयुर पाटील, शिवाजी माने, सारिका माने यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, सदस्या, विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमासाठी दिपक पाटील, योगेश पाटील, सुरेश पाटील, संतोष पाटील, शुभम पाटील, विनायक पाटील आदींनी परिश्रम घेतले.



# कारदगा शर्यतीत अजित गावडे यांची बैलगाडी प्रथम

बारवाड,ता.२८(वार्ताहर)-

**कारदगा ग्रामदैवत श्री बंगाली बाबा देवाच्या उरुसनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जनरल बैलगाडी शर्यतीत अजित गावडे-कारदगा यांच्या बैलगाडीने प्रथम क्रमांक पटकावून १५००१ रु.चे बक्षीस मिळविले. तर द्वितीय क्रमांकाचे १०००१ रु.चे बक्षीस राहुल यादव जांभळी व तृतीय क्रमांकाचे ७००१ रु.चे बक्षीस विकास कोरे यांच्या बैलगाडीने पटकावले.**

एकघोडा एकबैलगाडी शर्यतीत बंडू जाधव-बावडा प्रथम, सागर अवन्नावर-कारदगा द्वितीय व ऋषिकेश आरगे-शिवनाकवाडी तृतीय क्रमांक पटकावले.घोडागाडी शर्यतीत नितीन हुक्कीरे-कारदगा प्रथम, शरद खुबन्नावर कारदगा द्वितीय व बानू नयनाप्रेमी कारदगा तृतीय तर सुटा घोडा शर्यतीत शरद खुबन्नावर-कारदगा प्रथम, रेंदाळ मेजर रेंदाळ द्वितीय व गणेश चव्हाण मुडशिंगी यांनी तृतीय क्रमांक पटकावले.या शर्यतींचे उद्घाटन विलास खराडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.या शर्यती पाहण्यासाठी कारदगा व पंचक्रोशीतील शर्यती प्रेमींनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती.तर या शर्यतीतील यशस्वी स्पर्धकांना ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उरूस कमिटी अध्यक्ष,उपाध्यक्ष व सदस्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले तर या शर्यती यशस्वीपणे पार पडण्यासाठी बंगाली बाबा उरूस कमिटीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# शरीराच्या दुखण्यापेक्षा मनाचे दुखणे जास्त असते

## डॉ.शेखर जाधव

गारगोटी,ता.२८(प्रतिनिधी)-

**आयुष्यात शरीराचं दुखणं जितकं त्यांच्यापेक्षा मनाचं दुखणं अधिकपटीने जास्त असतं त्याला औषध दुकानात मिळत नाही, असे मत भुदरगडचे गटविकास अधिकारी डॉ.शेखर जाधव यांनी व्यक्त केले.**

कोरो इंडिया आयोजित कबड्डी स्पर्धेतील संवाद संस्था व शिवम समाजभान यांचेकडून सहभागी महिलांना प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. मडिलगे खुर्द (ता.भुदरगड) येथे हा कार्यक्रम




मडिलगे खुर्द येथे कार्यक्रमात बोलताना डॉ.शेखर जाधव.

झाला.अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या माजी सभापती आक्काताई नलवडे या होत्या. यावेळी राजश्री पाटकर यांनी योगासन आणि आरोग्य याबद्दल माहिती देऊन प्रात्यक्षिक दाखवले. कार्यक्रमास भुदरगडच्या सहाय्यक गटविकास अधिकारी सुप्रिया पाटील, रवी देसाई, मारुती केसरकर, वैशाली शेंडे, विजय पाटील, मंगल खापरे, रंजना शिंदे, सुप्रिया जाधव, आकाश पाटील उपस्थित होते.

# भीमापूरवाडीत श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)-

**भीमापुरवाडी गावातील मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम मंदिरामध्ये श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा झाला.याप्रसंगी भोजचे माजी जिल्हा पंचायत सदस्य व कर्नाटक राज्य ओसीसीआय संचालक राजेंद्र-पवार वडर यांच्या हस्ते श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन करून आरती करण्यात आली.**

दिवसभर भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.यावेळी गळतगा येथील दिवंगत रामाप्पा पवार-वडर यांच्या स्मरणार्थ राजेंद्र पवार-वडर यांच्याकडून मंदिरात पाण्याची टाकी बसवून भाविकांसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली.या सुविधाचे लोकार्पण राजेंद्र वडर आणि सुखदेव साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच राम नवमीनिमित्त आयोजित केलेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटनही वडर यांच्या हस्ते



झाले.यावेळी अलगोंडा पाटील, बाळासाहेब साळुंखे, महावीर घोसरवाडे, राजेंद्र कोंडेकर, सुखदेव साळुंखे, धीरज साळुंखे, उदय बेलेकर, उदय कोंडेकर, शामा कोंडेकर, संदीप कोंडेकर, पोपट साळुंखे, बाळू साळुंखे, रवी जगताप, मिलिंद कोंडेकर, अविनाश सुतार, अरुण भिलुगडे, शांतिनाथ भिलुगडे, निळू साळुंखे यांच्यासह भाविक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# चिकोडीच्या भाजी मार्केटमध्ये शेतकऱ्यांची लूट

## शेतकरी संघटना व हरित सेनेचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

चिकोडी,ता.२८(प्रतिनिधी)-

**येथील शहरातील गांधी मार्केटमध्ये शेतकऱ्यांकडून बाजार फी (जकात) वसूल करताना ठेकेदारांकडून मनमानी पद्धतीने वसुली केली जात असून, यामध्ये शेतकऱ्यांची मोठी फसवणूक होत आहे. या अन्यायाविरुद्ध शेतकरी संघटना आणि हरित सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी चिकोडी नगरसभेच्या मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन तीव्र संताप व्यक्त केला.**

शेतकऱ्यांनी मांडलेल्या तक्रारीनुसार, मार्केटमध्ये प्रत्येक डागामागे (पोत्यामागे) ४ रुपये वसुली केली जात आहे. मात्र, हाच माल खरेदी करणाऱ्या किरकोळ विक्रेत्यांकडून ठेकेदार ३०, ४० ते ५० रुपयांपर्यंत हवी तशी रक्कम वसूल करत आहेत. या प्रकारामुळे शेतकरी आणि



चिकोडी येथे भाजी मार्केटमध्ये शेतकऱ्यांची लूट थांबविण्याची मागणी करताना राज्य रयत संघटना तसेच हरित सेनेचे पदाधिकारी.

किरकोळ व्यापारी दोघांनाही आर्थिक फटका बसत असल्याची चर्चा पूरसभा अधिकाऱ्यांसमोर झाली. प्रत्येक डागामागे ४ रुपये घेण्याची ही जाचक पद्धत बंद करून शेतकऱ्यांची यातून मुक्तता करावी, अशी मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या या तक्रारीची दखल घेत पूरसभेचे मुख्याधिकारी जगदीश ईटी म्हणाले की, ''प्रशासन नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आम्ही आवश्यक ती पावले उचलणार आहोत. बाजार फीचा किमान दरपत्रक जाहीर करण्यात आले असून, त्याचे फलक लवकरच मार्केटमध्ये ठिकठिकाणी लावले जातील. ठेकेदाराला ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त पैसे देण्याची गरज नाही.जर कोणी जादा वसुली करण्याचा प्रयत्न केला, तर त्यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई केली जाईल.तसेच मार्केटमध्ये स्वच्छतेसाठी आणि सोयीसाठी स्वच्छतागृहे उभारण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

याप्रसंगी शेतकरी नेते लक्ष्मण शिरडोणी, पिंटू दिन्नीमणी, बसवंत मांजरे, कुमार मांजरे, रफिक पठाण, भीमसेन अरभांवी, मल्लाप्पा मांजरे, संजू नाईक,सचिन कुलकर्णी, मोहन पाटील, समाजसेवक चंद्रकांत हुक्केरी, संजू बडीगेर यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# कारदगा कुस्ती मैदानाचा पृथ्वीराज खरात मानकरी

बारवाड,ता.२८(वार्ताहर)-

**कारदगा ग्रामदैवत श्री.बंगालीबाबा देवाच्या उरुसानिमित्त भरविण्यात आलेल्या निकाली कुस्त्यांच्या जंगी मैदानात प्रथम क्रमांकाची कुस्ती पृथ्वीराज खरात तळंदगे विरुद्ध साहिल आर्मी हरियाणा यांच्यात जवळ जवळ १५ मिनिटे अटीतटीची होऊन अखेर पृथ्वीराज खरातने साहिल आर्मीवर घुटणा डावावर बाजी मारून कुस्ती प्रेमींच्या डोळ्यांचे पारणे फेडले.**

कुस्ती मैदानाचे उद्घाटन युवा नेते बसवप्रसाद जोल्ले यांनी केले.यावेळी बसवप्रसाद जोल्ले यांचा सत्कार बंगाली बाबा उरूस कमिटी अध्यक्ष अरविंद खराडे,उपाध्यक्ष लक्ष्मण पसारे व सदस्यांच्या हस्ते करण्यात आला.

दुसऱ्या क्रमांकाची कुस्ती ओंकार पाटील कोल्हापूर विरुद्ध निरंजन माळी कारदगा यांच्यात होऊन निरंजन माळीने गदालोट डावावर विजय मिळवून कारदगा गावचे नाव उज्वल केल. तृतीय क्रमांकाची कुस्ती हर्षद काटकर कोल्हापूर विरुद्ध विपुल हरियाणा यांच्यात होऊन हर्षद काटकरने कोल्हापुरी डावावर विजय मिळविला.त्याचबरोबर चार नंबरच्या कुस्तीत



कारदगा कुस्ती मैदानातील अटीतटीचा क्षण.

राजेश शिंगाडे हुपरी याने उमेश आयदुडी बेळगाव याच्यावर घिस्सा डावावर मात करून कुस्ती प्रेमीतून प्रतिसाद मिळविला.या कुस्त्यांबरोबर लहान,मध्यम व मोठ्या गटातील पैलवानांनी एकापेक्षा एक अशा कुस्त्या करून कुस्ती मैदानाला रंगत आणली.

कुस्ती मैदानात पंच म्हणून लक्ष्मण पसारे, उत्तम खराडे, देवाप देवकते, आप्पासो सावंत, चंद्रकांत बनकर आदींनी काम पाहिले.हे कुस्ती मैदान पाहण्यासाठी कुस्ती प्रेमींनी एकच गर्दी केली होती.या कुस्ती मैदानाचे निवेदन प्रकाश काशिद यांनी उत्कृष्ठ प्रकारे करून मैदानाची शोभा वाढवली.

## निधन वार्ता

### प्रकाश कांबळे

मिरज,ता.२८(प्रतिनिधी)-

सुभाषनगर (ता.मिरज) येथील प्रकाश शामराव कांबळे (वय



७२)यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, एक नात,नातू असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

### बाबासाहेब कांबळे

इचलकरंजी,ता.२८-

येथील बाबासाहेब पांडुरंग कांबळे (चोकाककर)(वय ६२)



यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार आहे.त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**दातार मळा** १ ली गल्ली छ. संभाजी महाराज चौक, डि मार्टजवळ, ६०० स्क्वेअर फुट (१५X४० फुट) जागेतील घर विकणे. मो. ९४२२६२९०००.

**घर विकणे आहे–** केटकाळेनगर इचलकरंजी सर्व सोयीनियुक्त संपर्क– ९९२२२३९५९०.

**प्लॉट विकणे–** ३८०० स्क्वे. फुटाचा एन.ए. संगमनगर, तारदाळ. संपर्क– ९०२१८०१११७.

**यड्राव येथे** ७ एकर शेत जमीन विकणे आहे. पाण्याची सोय आहे. संपर्क– ९३७३१८६६१२.

**बंगला व शेड विकणेचे** आहे. गुरूभेट कोल्हापूर रोड, व्यंकटेश्वरा शाळेमागे, पाटील मळा, कबनूर. इचलकरंजी. संपर्क– ९४२०४५४२२२

**९०० स्क्वे. फुट** कलेक्टर एन.ए. प्लॉट त्वरीत करणे आहे. डेक्कन आशोका हायस्कूलजवळ, इचलकरंजी. मो. ९४२२४२७९८८.

**कॉलनी किंवा** सोसायटीमध्ये २५०० ते ३००० स्क्वे. फुट प्लॉट/ तयार पॉश बंगलो विकत पाहिजे. संपर्क– ९९२१५४९६५९, इचलकरंजी.

**एनए प्लॉट विकणे–** कलेक्टर व तहसील कबनूरमध्ये गणेश मंदिरमागे, हॉटेल पॅराडाईजसमोर, शाहूनगरमध्ये सर्वसोयीसह. संपर्क– ८१४९९६५६९९, ९८९०२७४१७६

**इचलकरंजी** गावभाग गुजरीपेठ कॉर्नर येथे ९०० स्क्वे. फूट दुकानगाळा विकणे. (दवाखाना, गोडाऊन) अपेक्षित किंमत–४५ लाख/निगोशिबल)–९३२५१६९२३४

**LED TV** फ्रिज, कुलर, टेबल सिलींग फॅन, होमथिएटर स्वस्तात मिळतील. भारत इलेक्ट्रॉनिक्स, एसटी स्टँड, स्टेडियम, गाळा नं. ११, इचलकरंजी. ७५१७९६९६८०

**अर्जंट जुने कौलारू घर विकणे आहे.** १७०० स्क्वे. फूट साईनगर गल्ली. नं.१, महावीर सोसा. जवळ, कबनूर, इचलकरंजी. ८४२११७८८२५

**स्टिल बॉडी**/बॉटल कुलिंग २६० लिटर फ्रिज विकणे आहे. संपर्क– ९८२३१७५८०१

**जमीन विकणे आहे.** बोरगाव मेन रोडटच ८४ गुंठे शेतजमीन कुरूंदवाड–हुपरी रोड एक नंबर प्लॉट आहे. संपर्क–७५८८४८९८२१, ९५११९८६५९३

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ. तसेच फवारा कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क– ८३१७२९१००८

## * यात्रासहल *

**७ मे काशी आयोध्या,** प्रयागराज वैष्णोदेवी, नेपाळसह २२ दिवस बसने ११ मारूती–२ एप्रिल–१ दिवस कोजागिरी ट्रॅव्हेल्र्स– ९४२०५९२५२४, ९४०३९५३४१२

**ओम गणेश ट्रॅव्हलर्स**–चारधाम यात्रा नेपाळ, वैष्णोदेवी, अमृतसर ३० दिवस. ३०५००/– जेवण, प्रवास निवाससह. ५ मे ला निघणार. संपर्क–नंदकुमार शिंदे– ९८८१३४६६५४, मोठे तळे, इचलकरंजी.

## * व्यवसाय विषयक *

**पार्टटाईम/फूलटाईम–** व्यवसायासाठी सुवर्णसंधी! विद्यार्थी, महिला नोकरदार आणि उद्योजकांसाठी उत्तम संधी. ८६२३९५५३२७, ८३७८०८७२९५.

## शैक्षणिक विषयक

**शेअर मार्केट ट्रेडिंगचे प्रशिक्षण** आणि गुंतवणूकीचे विस्तृत ज्ञान मिळवा. तेही माफक फीमध्ये कॅपिटल अकॅडमी एएससी कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ७०२०६२३४२१

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**

## * नोकरी विषयक *

**नामवंत फर्निचर** शोरूममध्ये कायमस्वरूपी लेडीज व जेंटस् कामगार पाहिजेत. आकर्षक पगार. प्रत्यक्ष भेटा. स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ८६०३१५१५१५.

**पाहिजेत** – पॅकींगमधील लेडीज (५), हेल्पर (२), सकाळी १० ते १२ या वेळेत प्रत्यक्ष भेटा. अभय फूड प्रॉडक्टस्, सांगली रोड, चौगुले डेअरीसमोर, गुलमोहर कॉलनी, इचलकरंजी.

**खानावळीमध्ये** फुल टाईम/ पार्ट टाईम कामासाठी वेटर व चपाती/ भाकरी व भांडीसाठी लेडीज पाहिजेत. संपर्क– ९१३०१२००८०.

### पाहिजेत

१. क्वॉलिटी इनचार्ज (PDC) १ जागा

२. क्वॉलिटी इनचार्ज (MACHINING)–१ जागा

३. क्वॉलिटी इंजिनिअर्स ४ जागा

शैक्षणिक पात्रता : DME/BE

अनुभवींना प्राधान्य.

– पत्ता –

**डायनोस्टार्स सी.एन.सी.इंजिनीअर्स**

गुरुकुल अकॅडमी समोर, न्यू इंडस्ट्रियल इस्टेट, शाहू पुतळा ते जुने बस स्टॅन्ड रोड, इचलकरंजी – ४१६ ११५. जि. कोल्हापूर.

संपर्क : ९९७०२८२२२९ ८६००४९२९५०.

**इचलकरंजीतील** नामांकित हॉटेलसाठी लेडीज/जेन्टस्, रिसप्शनिस्ट, लॉजिंग सुपरवायझर (लेडीज/जेन्टस्) साऊथ इंडियन कुक, हाऊस किपिंग (लेडीज/ जेन्टस्) पाहिजेत. संपर्क – ९१४५६२९७९७, ९०११६६३३३८.

**सुर्यवंशी कार** अ‍ॅक्सेसरीज कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क – ७७६९८३८७०९.

**सेल्समन पाहिजे–** फरसणा आणि इतर प्रॉडक्टस् ऑर्डर घेणेसाठी. अनुभवी, प्रामाणिक गरजू टू व्हिलर असणे आवश्यक. ९५२७७६६११२, ९५२७७६४४६०.

**इचलकरंजी कापड** मार्केटमधील ऑफीससाठी अनुभवी पूर्णवेळ अकौंटंट हवा टॅली व अकौंटचा अनुभव आवश्यक. संपर्क – अंकित बाहेती, ९९७०३०३०६६.

**लेडीज/जेन्टस्** शिकाऊ/अनुभवी कामगार पाहिजेत. इंदू सीएनसी शॉप, दाते मळा, हॉटेल थाळीहाऊस मागे, इचलकरंजी. मो. ९३७०१४३०३५.

**रिकाम्या वेळेत** घरातून नवीन व्यवसाय सुरु करा. व एक्स्ट्रा इन्कम मिळवा. ऑनलाईन किंवा ऑफलाईन मार्गदर्शन. सुरेखा मॅडम, मो. ९५५२००८१५६.

**कामासाठी हेल्पर** ४ काम, ८ तास पगार, १० हजार ओव्हर टाईम १ तासाला दीडपट टेलीकॉलिंग विवाहीत महिला अर्जंट पाहिजेत. संपर्क – ९५०३२३३१००.

**नामवंत कंपन्यांच्या** इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या विक्रीसाठी अनुभवी सेल्समन पाहिजेत. मो. ९३२५४२३७४०.

**गांधीनगर येथे** इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या गोडावूनसाठी अकौंटींग + गोडावून किप्पर पाहिजे. मो. ९२२६८८१४७०.

**इलेक्ट्रॉनिक्स** शोरुममध्ये डाटा फिडींग, रिपोटिंग कॉलींगसाठी लेडीज पाहिजे. (कॉम्प्युटर नॉलेज आवश्यक) मो. ९५१८३६५३९२.

**लाईफ केअर मेडिकल,** गावभाग इचलकरंजीमध्ये पार्ट टाईम/फुल याईम लेडीज फार्मासिस्ट पाहिजे. त्वरीत भेटा. संपर्क – ८६००६५९६४९.

**पाहिजेत.** १) ड्रायव्हर–१ जागा. २) सेल्समन–१ जागा. ३) सेल्सगर्ल–१ जागा. महासत्ता चौक, इचलकरंजी. संपर्क–९८२२४७७६६९

**जीएसटी** व जमा खर्चाची माहिती असणारी लेडीज पाहिजे. आकर्षक पगार व इतर सुविधा मिळतील. इचलकरंजी. संपर्क – ९९४९७९९१०८, ९५२९९१६७२१.

**इचलकरंजी येथे** बियर बारमध्ये कामासाठी वेटर व हेल्पर पाहिजे. संपर्क – ८८३०९८३४०१.

**गरजू/हुशार** लेडीज स्टाफ पाहिजे. मगदूम आयुर्वेदिक क्लिनिक, गांधी पुतळा, इचलकरंजी. मो. ९७६६३५४४६७.

**प्रोसेसमध्ये** ८ तास कामासाठी कामगार पाहिजे. संपर्क – ८७९६५०९६३१.

**इंग्लिश स्पिकींग** कोर्ससाठी टिचर पाहिजेत. संपर्क – ९३७१५५९६९६, ७७२००६७७८९.

**सीएस** (कंपनी सेक्रेटरी) ऑफीसमध्ये स्टाफ पाहिजे. किमान पात्रता बी. कॉम. संपर्क – ७७२००६७७८९.

**परमिट रुम** बारसाठी अनुभवी वेटर व साफसफाईवाले पाहिजेत. समक्ष भेटा. ९७६७४९९५४०.

**पाणी बोटल** फॅक्टरीमध्ये कामगार पाहिजेत. आकर्षक पगार,पत्ता – विक्रमनगर, इचलकरंजी. ९०२८४४५५६०, ८६२३०६४४५५.

**कॅफेसाठी** संध्याकाळी ५ ते रात्री १० या वेळेत कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क – दि बेस्ट कॅफे, जवाहरनगर, मो. ७३८५२९१३९७, ७२१९४००२९५.

**शिक्षक पाहिजेत** – ५ वी ते १० वी अकॅडमीसाठी इंग्लिश/मॅथ्स्/ सायन्स/मराठी/हिंदी/इतिहास–भूगोल विषयासाठी शिक्षक पाहिजेत. संपर्क – ९६२३३१९९६६.

**पाहिजेत.** शिकाऊ/अनुभवी मुले व वायरमन, टॅली ईआरपी मध्ये काम करणेसाठी अनुभवी अकौटंट पाहिजे. MS-Office ज्ञान आवश्यक. संपर्क–सोसायटी इलेक्ट्रीक–९४२११००५५५, ९९२२९४२४२४

**ट्रक सर्व्हिसिंग** आणि ग्रिसींगसाठी शिकाऊ आणि अनुभवी कामगार पाहिजे. संपर्क – ९९२२४९९२३२.

**हमाली कामासाठी** हेल्पर – पगार १८००० व वेल्डर मिस्त्री पगार २१००० पाहिजेत. शिवमल्हार ट्रेडर्स, खंडोबावाठी, यड्राव. मो. ९०२८९२२२८९, ९८२२४५५६०४.

**व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत.** संपर्क– ११/२४२, भारत पेट्रोलियम समोर, बस स्टँडजवळ, स्टेशन रोड, इचलकरंजी. ९८२२७६६७६२, ९८२३२१६०००

**लेथ मशिनसाठी** प्रोडक्शन व डेव्हलपमेंट कामासाठी फोरमन व टर्नर पाहिजेत. (साप्ताहिक पगार) संपर्क–८६००९९४८६९

**टाटा पंच** इलेक्ट्रीक कारसाठी ड्रायव्हर पाहिजे. पगार–१६०००/– संपर्क–८६५७७५३३३३

**कामगार पाहिजे.** हार्डवेअर दुकानात अनुभवी व शिकाऊ कामगार पाहिजे. आकर्षक पगार, संपर्क– उमिया हार्डवेअर मार्ट, वखारभाग, इचलकरंजी. मो. ८४११०३५४११

**सीए ऑफिसमध्ये** ऑफिसबॉय व ऑडीट असिस्टंट पाहिजे. पात्रता किमान बी.कॉम, अनुभवींना प्राधान्य. संपर्क–९०११११९८७७१

**टेली कॉलिंगसाठी** मुली हव्या आहेत. आकर्षक पगार, ऑफिसमधून काम, शिक्षण १० वी पुढे श्री महालक्ष्मी वधू–वर, मो. ८८३०२४०४२६.

**पाहिजेत.** पार्वती इंडस्ट्रिज, यड्राव. (GMTCPL कंपनी) मध्ये CNC, VTL & HMC विभागासाठी १) प्रोडक्शन इन्चार्ज–३ ते ४ वर्षांचा अनुभव. DME/BE. 2) प्रोडक्शन सुपरवायझर आणि प्रोग्रॅमर–२ ते ३ वर्षांचा अनुभव. ITI/DME/BE. ३) मशिन ऑपरेटर– १० वी / १२ वी/ आयटीआय फ्रेशर व अनुभवी. संपर्क–९९२२९३१०८२, ९७६४७८०१०१

**पाहिजेत.** नामांकित केक आणि बेकरी ब्रँडसाठी १) मार्केटिंग DBM/ Graduate २) सुपरवायझर Graduate+Computer Knowledge. संपर्क– ८५५२०३४००९

**कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे.** इंग्रजी व कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क–श्रीकृष्ण इंटरनेट केंद्र, गोविंदराव हायस्कूलजवळ, मेनरोड, इचलकरंजी. ७०५७१०९१८७

**फूलटाईम/पार्टटाईम** ऑफिसबॉय टॅलीसाठी लेडीज पाहिजे. जुना बसस्टँड चौक, भोनेमाळ. संपर्क– ९३७२१४३३१३

**हातकणंगले येथील** नामांकित इंटरनॅशनल स्कूलमध्ये त्वरीत सिक्युरिटी गार्ड नेमणे आहे. आकर्षक पगार, जेवण, निवासाची सोय. संपर्क–८००३०९३७७१, ८४८३०४७६०३

**DSK Auto Fbike Show-room** मध्ये अनुभवी मेकॅनिक पाहिजे आहे. भेटण्याची वेळ सकाळी १० ते ११. संपर्क– ८८८८५१५३८२

### पाहिजेत

▮ कॉम्प्युटर ऑपरेटर- Busy Accounting Knowledge असल्यास प्राधान्य.

▮ कोरूगेटेड बॉक्स तयार करणाऱ्या कंपनीत शिकाऊ कामगार पाहिजेत. अर्जासह समक्ष भेटा.

**अरूंधती कलर कार्टन्स**

पार्वती इंड. इस्टेट, यड्राव

**9595845774, 7745005830**

**पाहिजेत.** इचलकरंजीस्थित नामांकित बेकरीत केक मेकिंग आणि पॅकिंगसाठी १) हेल्पर (महिला/पुरूष) १० वी/१२ वी पास/नापास. २) सफाई कामगार (महिला/पुरूष) आकर्षक पगार व इतर लाभ. संपर्क–८५५२०३४००९

**कॅफेकरिता** हॉटेल मॅनेजमेंट केलेला किंवा अनुभवी मुले, मुली पाहिजे. संपर्क–७७७६८६४२४२

**अकौंटंट आणि साईट** सुपरवायझर पाहिजे. टॅलीचे ज्ञान आवश्यक. अनुभवी/ शिकाऊ जयसिंगपूर व हातकणंगले विभाग. संपर्क– आर.पी. के. कन्स्ट्रक्शन. मो. ७४९९४०६०६५.

**इचलकरंजी येथील** प्रसिध्द चायनीज कॅफेसाठी हेल्पर तसेच सँडविच व कोल्डकॉफी बनवणारे कुक हवे आहे. संपर्क– ७०२८८८८१९६

**चहा दुकानसाठी** अनुभवी कामगार पाहिजे. पंचगंगा साखर कारखाना गेटसमोर, इचलकरंजी. संपर्क– ७७९६१७४३४२

**सिक्युरिटी गार्ड पाहिजे.** आकर्षक पगारासह पार्वती इंडस्ट्रिज, गणेशनगर, शाहू पुतळ्याजवळ व इचलकरंजी परिसरामध्ये. संपर्क– ९३२६६३३४४५, ९०२१३१२५२४

**सोलर पॅनल** ऑफिससाठी लेडीज स्टाफ पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक व इलेक्ट्रीशियन जेंटस शिकाऊ/अनुभवी. संपर्क– ७७६९०५५८९९, स्नेह एंटरप्राईजेस, षटकोन चौक, इचलकरंजी.

**Tally Erp** झालेले लेडीज अकौंटंट पाहिजे. अनुभव १ वर्षे. ९३२६००८२९५

**कामगार पाहिजे.** रेफ्रिजरेशन कंपनीसाठी १) इलेक्ट्रीकल आयटीआय–२ जागा. २) वेल्डर/ फिटर–२ जागा. ३) रेफ्रिजरेशन मेकॅनिक–१ जागा. अनुभव (०–२ वर्षे) संपर्क–९६७३०२१७३२, इचलकरंजी.

**दिवाणजी कामासाठी** जेंटस पाहिजे. संपर्क–९३२६००८२९५

**प्रोसेसचा टेंपो** अशोक लेलॅन्ड दोस्त व छोटा हत्ती गाडीवर ड्रायव्हर कम हमाल व हमाल पाहिजेत. संपर्क– ९६८९८९५०४०, ८८८८६३५०४०

**पाहिजे**–ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे. १२ वी/ बी.कॉम. संपर्क– थोरात चौक, इचलकरंजी. मो. ८२६५०२६७५७.

**Urgent Hiring-** 1) Development Incharge-1. 2) CNC/ VMC Shift Supervisor-4. 3) Operator-10 (Fresher also apply) 4) Quality Inspector-4. 5) Molder-5. 6) Driver-1. Ph. 9022761277

**इचलकरंजी कबनूर येथे** नामांकित शोरूममध्ये हाऊस किपींग अनुभवी सुपरवायझर पाहिजेत. मो. ८४२१०३८५५८, ९३०९९५४५६५

**अर्जंट सिक्युरिटी भरती–** इचलकरंजी, पार्वती, कोंडीग्रे, जांभळी, दानोळी, यड्राव, नांदणी, खोतवाडी. आकर्षक पगार. संपर्क– ७०२०१९७९८०, ८२०८५१९९८८

**ऑफिसच्या दैनंदिन** कामासाठी ऑफिसबॉय पाहिजे. मोहन आर्केड, इचलकरंजी. फोन–९९२३६७६७७७

**ऑफिस कामासाठी** गरजू महिला/ पुरूष पाहिजे. कॉम्प्युटर (एक्सेल) ज्ञान आवश्यक. पगार–४ ते ५ हजार. संपर्क–९१७२१५६१३७, ९०२१०५८८१२

**चारचाकी गाडीवर** लायसनधारक हुशार, विश्वासू, निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क–९८२३०६४६६५

**मॅनेजर पाहिजे.** हॉटेल लॉजिंगसाठी, तसेच साफसफाईसाठी पुरूष/महिला पाहिजेत. ९८२२०५६५०१, ९४०३१३६६६९

**जेंटस कामगार पाहिजेत.** टू व्हीलर आवश्यक. पगार–१२ हजार पासून. संपर्क–९६३१३१६०३०

**Urgent Hiring-** Chief Marketing Head-MBA-Exp. 8 to 10 years. (Software Industry Experience) Business Development Executive-MBA/B.Com. Exp. 0 to 3 years. Support Executive- B.Com/Any Graduate, Tally basic Exp. 0-3 years. Odoo Funcitial Consultant-Exp. 5-7years. Work from Office, Office Boy-10th. Contact- 7774838855

**दोन साईट इंजिनिअर पाहिजेत.** ३–४ वर्षे अनुभवी. D.C.E./B.E. संपर्क–९८२३०७७४३४, ९६०७१०३६७९

**पाहिजेत.** टर्नर व ग्रायडिंग ऑपरेटर पाहिजेत. केदार प्रेसिजन कॉम्पोनन्टस्. २२१/१६, न्यू इंड. इस्टेट, आंबेडकर पुतळ्याजवळ, इचलकरंजी. मो. ९४२२४२८१९६, ९११२२७३१७१

**त्वरीत सुरक्षा रक्षक** भरती चालू. आकर्षक पगार. प्रॉव्हीडंड फंड व ईएसआयसीची सुविधा. ड्युटी ८ तास/ १२ तास. ठिकाण– तारदाळ, बिरदेववाडी, इचलकरंजी, पार्वती इंडस्ट्रीज, प्राईड इंडिया. मो. ७७०९३९२०११, ९९२२६३४५२९.

**भक्ती लेडीज टेलर–** ब्लाऊज व ड्रेस शिकवणेकरिता अनुभवी कारागीर पाहिजेत. तसेच ब्लाऊजचे शिवणक्लास घेतले जातील. पत्ता– जनता बँक, शिवाजी उद्यानलगत, इचलकरंजी. ९६३७९२७४३३

**सॉक्स कंपनीमध्ये** कामगार पाहिजे. ऑफिसबॉय–पुरूष–२ जागा, शिक्षण–१० वी, आकर्षक पगार, संपर्क– मॉन्टक लाईफ स्टाईल, पार्वती इंडस्ट्रियल इस्टेट, अरूंधती कार्टनशेजारी, इचलकरंजी. संपर्क वेळ– १० ते सायं. ५. फोन– ९७६६४०७११९

**रेडिमेड कापड दुकानासाठी** अनुभवी सेल्समन पाहिजे. आकर्षक पगार+कमिशन संपर्क– हत्ती चौक, इचलकरंजी. ९८५०८५८६०२, ७६२०३५८४०८

**Require-** Ladies Staff for Sales Managment Weekly 3 Days Work From Office. Weekly 3 Day's Work from Home. Weekly Holiday. Sunday Education-Graduate only whatsapp- 9209444622.

**Required-** Gents Sales Executive Qualification Diploma Civil Engineer 3 years. Experience Good Salary with ESIC, PF Facility, Whatsapp your Resume- 9209444622.

**पाहिजेत.** ऑफिस क्लिरिकल कामासाठी टेक्स्टाईल फर्ममध्ये जागा भरणे आहे. बी.कॉम/ग्रॅज्युएट अनुभवी लेडीजना प्राधान्य. संपर्क– ८३२९०४८७०३

**नामवंत फर्निचर शोरूममध्ये** कायमस्वरूपी लेडीज व जेंटस कामगार पाहिजेत. आकर्षक पगार, प्रत्यक्ष भेटा, स्टेशन रोड, इचलकरंजी. संपर्क– ८६०३१५१५१५

**समर्थ इंडस्ट्रिज–** टाकवडे येथे शिका आणि कमवा. आमच्या इंडस्ट्रिजमध्ये शिकाऊ मुलांची आवश्यकता आहे. काम स्टेनलेस स्टिल रेलिंग व मॉड्युलर किचन संबंधित. सुविधा– इएसआयसी/ पीएफ, उत्तम प्रशिक्षण व भविष्याची संधी. संपर्क–९३७१५९५६६६

**अर्जंट सिक्युरिटी गार्डस् पाहिजेत.** इचलकरंजी शहराकरिता ड्युटी ८ व १२ तास, आकर्षक पगार. मो. ८८५७०४९५९०, ९५२९५४५४६८

**Vacancy-** 1) Textile Fabric Dispatch Department-1 Post. (Exp. 2 years) 2) Sizing and Yarn Department Work. 1 Post. (Exp. 5-6 Years) Ichalkaranji. 9922281099 (Send Resume on this No.)

**पाहिजेत**– The Salon 21, इचलकरंजी येथे अनुभवी जेंटस बार्बर–२ जागा, टेलिकॉलर–१ जागा, चांगला पगार+इन्सेटीव्ह. संपर्क–८०८७९९५५८१

**नामांकित सायझिंग युनिटमध्ये** बॅकसायझर व हेल्पर जागा भरणे आहे. पत्ता– गणेश नगर, ६ वी गल्ली, इचलकरंजी. फोन– ९६०४००२०७४

**आर्किटेक्ट ऑफिससाठी** बीई सिव्हील इंजिनिअर पाहिजे. किमान ५ वर्षे अनुभव आवश्यक. संपर्क– ९८२२१८७१९९.

**औषध दुकानामध्ये** अनुभवी फार्मासिस्ट सेल्समन पाहिजेत. संपर्क ९९७५१५०४६८.

**इचलकरंजी येथे** इंग्रजी माध्यमासाठी बी.ए. बी.एस.सी., बी.कॉम, डी.एड्, बी.एड् नवीन किंवा अनुभवी पाहिजेत. संपर्क– ८६५५१३७१७१, ८६८६१३७१७१.

**कामगार पाहिजेत–** सीएनसी मशिन ऑपरेटर व लेथ मशिनवर टर्नर, हेल्पर पाहिजेत. संपर्क– ८८८८९९७७०५, ९२२५८०६१६४.

**आयटीआय टर्नर व** फिटर पाहिजेत. संपर्क एकलव्य टेक्नो सोल्युशन तारदाळ नाका, शहापूर. मो. ७८२०८०६३१६, ८५३०४३६२३५.

**फ्लिपकार्टमध्ये** इचलकरंजी आणि जवळपास भागात पार्सल डिलिव्हरीसाठी मुले/मुली पाहिजेत. संपर्क– सुनिल खोंद्रे– मो. ९९६०४९१५८७.

**सिक्युरिटी गार्ड पाहिजे–** इचलकरंजी थोरात चौक शांतीनगर, जमजम हॉटेल शेजारी, हातकणंगले लक्ष्मी इंडस्ट्रीज, आकर्षक पगार. ड्युटी १२ तास. संपर्क– ८३२९४७६००५.

**४०७ टाटा,** पिकअप बोलेरो गाडीवर ड्रायव्हर + हमाल पाहिजे. पगार ३० हजार व गोडाऊनसाठी हमाल पाहिजे. पगार आठवड्याला ४ हजार. संपर्क – जयकिसान पशुखाद्य, ९४२२०४४२९२

**हार व बुके** दुकानात कामगार पाहिजे. श्री शोनक फ्लॉवर्स, इचलकरंजी. राहूल माने – ८८८८२३१७३५, ९१२०९१७१७७.

**त्वरीत सुरक्षा रक्षक** भरती सुरू आहे. ड्युटी ८ तास– पगार १५,५००/–, १२ तास– पगार– १३,५००/–, प्रॉव्हीडंड फंड, ईएसआयसी ची सुविधा. ठिकाण– आवाडे पार्क, तारदाळ, बिरदेववाडी, लक्ष्मीवाडी. संपर्क– ८६६९९५९९६४, ७७०९३९२०११.

**नामवंत ॲडव्हर्टायझिंग** कंपनीसाठी अकौंटंट पाहिजे. २ ते ३ वर्ष अनुभव आवश्यक. संपर्क– ८६५७७९८१८१९. ९८२२६६९५४८.

## * भाड्याने देणे/घेणे *

**१ बीएचके** फ्लॅट आरसीसी सर्वसोयीनियुक्त पहिल्या मजल्यावर भाड्याने देणे आहे. आशिर्वाद निवास, तिरंगा कॉलनी, गल्ली नं.१, कबनूर. संपर्क–७६६६७६८०३४, ९८८१६९६५४९.

**भाड्याने देणे–** मंगळवार पेठ, गांधी पुतळा परिसरामध्ये सर्व सोयीनियुक्त २ रूम भाड्याने देणे. संपर्क– ९९२१२९९१५०, ९८८१८१४२८७.

**२ बीएचके रो बंगलो** भाड्याने देणे भाडे–१२ हजार डिपॉझिट ३० हजार शांतीदत्त अपार्टमेंट पाठीमागे, सोलगे मळा, इचलकरंजी. मो. ९८२२३२३०५३.

**१ बीएचके रूम्स्** भाड्याने देणे. सर्व सोयीनियुक्त स्वामी मळा, गुजराथी भवनजवळ, इचलकरंजी. मो. ९१७५९८३७४८.

**२ बीएचके भाड्याने देणे–** सर्व सोयीनियुक्त शिवाजी चौक, विठ्ठल मंदिर, तारदाळ. मो. ९६३७०८७३१५, ९९२२१८६३२८.

**१ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे– थोरात चौक शांतीनगर, डॉ. भंडारे हॉस्पिटलशेजारी, इचलकरंजी. मो. ८४२१८५५५७३.

**१ बीएचके सेमी फर्निश्ड** फ्लॅट छोट्या कुटुंबासाठी (२४ तास पाणी) भाड्याने देणे. गांधी कॅम्प चौक, इचलकरंजी. मो. ९९७०६६१५२५.

**जनता बँकेपासून जवळच** आरसीसी २०० स्क्वे. फूट दुकानगाळा, ऑफिस किंवा व्यवसायासाठी भाड्याने देणे. सर्व सोयीनियुक्त. आर.पी. रोड, पद्मा लॉंड्री, बिरदेव बँकेजवळ, इचलकरंजी. ७२४९४९०९६२

**१ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. सर्व सोयीनियुक्त ॲकॅडमीची मुले, पालकांसाठी इचलकरंजी शहराच्या मध्यवस्तीत. मो. ७०२०१८२३३१, ८०१०१८६३२३.

**भाड्याने देणे–** १५०० स्क्वे. फुटाचे गोडावून २ व चालू स्थितीतील हॉल भाड्याने देणे. सांगली– कोल्हापूर हायवे हातकणंगले येथे. संपर्क– ९३७३१८६६१२, ८३०८९५७९७९.

**सांगली–कोल्हापूर** रोडवरील मनाली गार्डन जयसिंगपूर येथे अंदाजे ५०X२० गोडावून व खुली जागा. हॉटेल, ऑफिसकरीता भाड्याने देणे आहे. संपर्क– ९५२७००३४७३.

**हॉटेल भाड्याने** देणे आहे– श्री निवास, पेट्रोल पंपजवळ, कुरूंदवाड, हेरवाड–तेरवाड रोड, कुरूंदवाड. मो. ९३७११७१०६९

**भाड्याने देणे–**१ आर.के. सर्व सोयीनियुक्त छोट्या फॅमिलीकरीता राणी बागेसमोर, आयसीआयसीआय बँके मागे, इचलकरंजी. मो. ९०२८५१३०७४.

**जनता बँकेजवळ** २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. विद्यार्थी/ फॅमिलीसाठी. संपर्क– ९०२८७०५८५९, ७३०४२११९००.

**तांबे माळ**, लिंबू चौकजवळ २ बीएचके ग्राऊंड फ्लोअर आरसीसी फ्लॅट भाड्याने देणे. संपर्क– ७८८७७७७७३१,७४४७३७११११

**शेड भाड्याने देणे** आहे– १९ एच.पी. लाईट व मजल्यावरील मजल्यावर २ बीएचके सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. (फक्त शाकाहारीसाठी) पत्ता– जुने बस स्टॅण्ड चौक, इचलकरंजी. मो. ९६६५०३८६७७.

**दुकानगाळा भाड्याने देणे.** १०X २७= दोन शटर पूर्व उत्तर दिशा, निरामय हॉस्पिटलजवळ. लॉजिंग हॉटेल भाड्याने देणे. ६ रूम लॉजिंग १२ टेबल डायनिंग हॉटेल स्वतंत्र किचन, राजस्थानी गोशाळाजवळ, सांगली रोड, इचलकरंजी. ७०२०६३१६७, ८७६७३८३४३८

**भाड्याने देणे.** आरसीसी रूम सिंगल/डबल सर्व सोयीनियुक्त छोट्या कुटूंबासाठी पहिला मजला गुरूकृपा रेडिमेडस् नदी रोड, इचलकरंजी. भोसले–९५१८५४३६९५

**भाड्याने देणे–** वन रूम किचन (लहान कुटुंबासाठी) सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. चिंतामणी कॉलनी, गल्ली नं. ११, कोरोची. मो.नं. ९८३४३४१०३४.

**दुकान गाळा भाड्याने** देणे आहे. अंदाजे ३०० स्क्वे. फुट किंवा राहण्याची सोय आहे. स्वतंत्र संडास बाथरूम २४ तास पाण्याची सोय. निकम मेडिकल शेजारी, भोने माळ (शाहूनगर). मो. ९०२८८३७८९१.

**महासत्ता रिंग रोडवरील** पूर्ण झालेल्या इनसाईट स्क्वेअर प्रकल्पातील शिल्लक दुकान गाळे ऑफिसेस ३ बीएचके फ्लॅटस् विक्रीस उपलब्ध. १) ग्राऊंड मजला शॉप–५, २) पहिला मजला ऑफिस– ३, ३) दुसरा मजला ऑफिस– ४, ४) पाचवा मजला फ्लॅटस्–१,५) सहावा मजला फ्लॅटस्–२, ६) बेसमेंट एरिया ४००० स्क्वे. फुट भाड्याने उपलब्ध. बुकींगसाठी संपर्क– ९१३०८२८१०८.

**भाड्याने देणे–**१ बीएचके पहिला मजला,लोकल मार्ट समोर, जवाहरनगर, इचलकरंजी खुली जागा १२ हजार चौ. फुट, ६ हजार चौ. फुट. संपर्क– ९८९००३३५००, ८२३७७७९०३४.

**१ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. सर्वसोयीनियुक्त थोरात चौक, भंडारे हॉस्पिटल, चर्चच्यामागे, संपर्क– ७३५००००३०

**मथुरा हायस्कूलसमोर,** लिंबू चौक सर्वसोयीनियुक्त हॉल व किचन भाड्याने देणे आहे. संपर्क– ७३५००८१५४६

**१८ गारमेंटचे मशिन शेडसह** भाड्याने देणे आहे. शहापूर, विनायक हायस्कूलमागे, संपर्क– ९७६५९३८६६३

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**

**१ बीएचके** सर्वसोयीनियुक्त खोली भाड्याने देणे आहे. साखरपे हॉस्पिटलमागे, पल्लवी हॉटेल रोड, संपर्क–९०२१३२१३३३, जनता चौक.

**४५० स्क्वे.** फूटाचे घर गहाणवट देणे आहे. गर्ल्स हायस्कूलसमोर, बावणे गल्ली, इचलकरंजी. फोन– ९५२९३६७२८४

**सर्व सोयीनियुक्त** १ आरके खोल्या, छोट्या शाकाहारी परिवाराकरिता भाड्याने देणे. अयोध्या कॉलनी, कुरूंदवाडे मळा, पंचवटी मागे, इचलकरंजी. ९४२११०७८७२, ८१४९७३१९८१

**४ रूम आरसीसी** भाड्याने देणेचे आहे. लायकर टॉकीजमागे, पारीक कॉलनी, इचलकरंजी. मो. ७०२००१८१४५

**अंदाजे १५०० स्क्वे. फूट** फूल्ल फर्निश्ड कमर्शियल, पतसंस्था, पॅथॉलॉजी लॅब, ऑफिस क्लासेससाठी, क्लिनिकसाठी उपयुक्त भाड्याने देणे. शाहू पुतळा, कन्या कॉलेज रोड, संपर्क– ९५११९१२४५८, इचलकरंजी.

**दुकानगाळा भाड्याने देणे.** लायकर गल्ली, नुतन बँकेजवळ, ४५० स्क्वे. फूट, १५ हजार भाडे व सुंदरबाग येथे २५० स्क्वे. फूट ८५०० भाडे. संपर्क–९८५०९०९००७

**इचलकरंजी हार्डवेअरसमोर** २५० स्क्वे. फूट बेसमेंट गाळा ग्राऊंड फ्लोअरला लेडीज कॉस्मेटिक अथवा इमिटेशन कापड शोरूम व खाद्यविक्रीसाठी, ज्वेलरीसाठी भाड्याने देणे. मो. ९०३९६९३०६९

**१ आरके सर्वसोयीनियुक्त** २ ब्लॉक भाड्याने देणे आहे. मुरदंडे मळा, गल्ली नं.३, अलायन्स रोड, संपर्क– ९४२२०४३५६२, ८३२९५२९९४८

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. सांगली नाक्याजवळ, एसआयटी, शरद कॉलेजमागे, इचलकरंजी. फोन–९८८१७७५२४२

**२ बीएचके घर** भाड्याने देणे आहे. खोत बिल्डींग, संग्राम चौक, डि–मार्टजवळ, इचलकरंजी. फोन– ९८५०३९६६७७, ८३७८०३३०६८

**१ बीएचके** भाड्याने देणे आहे. जाधव पेट्रोल पंपसमोर, एस.टी. आगारजवळ, शहापूर. संपर्क– ९०२२०५८८१२, ९६७३१५९०७८

**भाड्याने देणे–** २ बीएचके सर्व सोयीनियुक्त पहिला मजला, आर.के. नगर, शहापूर, हरेकृष्ण इस्कॉन मंदिरसमोर. फोन–७३८५७९३७६५, ७३८७७८७४१३

**भाड्याने देणे.** मेन रोड राजारामबापू सहकारी बँक ऑफिस, शोरूम, दवाखाना, नाष्टा सेंटर, रहाणेसाठी, फ्लॅट, खोल्या तसेच विवेकानंद कॉलेजमागे, ऑफिस गोडाऊन, कारखाना पॉवर कनेक्शन, दोन हजार स्क्वे. फूट अध्यावत शेड भाड्याने देणे. व्यवसायाचे मार्गदर्शन मिळेल. संपर्क–९८२२३०१७०७, ९३२६४२५२१२

**कॉट बेसिसवर** रूम भाड्याने देणे. (फक्त शाकाहारी) विद्यार्थीनींना. पत्ता–राजवाडा चौक, तलाठी ऑफिसशेजारी. फोन– ९९२१०१७४२५

**१ बीएचके** फ्लॅट छोट्या कुटूंबासाठी किंवा विद्यार्थीनींसाठी भाड्याने देणे. संपर्क– सांगली रोड, इचलकरंजी. फोन–९०२८८७८०२०, ८४२१७४५९३४

**१२०० स्क्वे. फूट** आरसीसी गोडाऊन (नवीनच) भाड्याने देणे. टाकवडे रोड, पी.बा. पाटील मळा, इचलकरंजी. भाऊसो कागवाडे– संपर्क–९०११०३३६८९

**उत्तम–प्रकाश थिएटरजवळ** माळकर बिल्डींग पहिला मजला १५०० स्क्वे. फूट /७५० स्क्वे. फूट+७५० स्क्वे. फूट हॉल भाड्याने देणे. संपर्क–९७६६७०४८०४, ९७६३७५५४४३

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी–विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे–घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

# इस्त्रायलकडून ५० लढाऊ विमानांनी इराणवर हल्ले

तेल अवीव/तेहरान,ता.२८–

**इस्त्रायलने इराणच्या हद्दीत शिरून ५० लढाऊ विमानांच्या साहाय्याने भीषण हल्ला केला. इस्त्रायली सैन्याने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री इराणमधील तीन भागांतील शस्त्रनिर्मिती कारखाने आणि अणू कार्यक्रमाशी संबंधित तळांना लक्ष्य करण्यात आले.**

हे हल्ले गुप्तचर माहितीच्या आधारावर करण्यात आले असून, ते अनेक तास सुरू होते. या हल्ल्यांमध्ये अराक आणि यज्द सारख्या महत्त्वाच्या भागांचा समावेश होता. ज्या ठिकाणांवर हल्ले झाले, त्यात लष्करी शस्त्रास्त्र उद्योग आणि बॅलिस्टिकसह अँटी–एअरक्राफ्ट क्षेपणास्त्रांचे सुटे भाग बनवणाऱ्या कारखान्यांचा समावेश आहे. अराकमधील हेवी वॉटर प्लांटवरही हल्ला करण्यात आला. इस्त्रायलच्या मते, हा प्रकल्प अण्वस्त्रांसाठी प्लुटोनियम तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. यज्दमधील त्या प्लांटलाही लक्ष्य करण्यात आले, जिथे युरेनियम संवर्धनासाठी आवश्यक स्फोटक सामग्री तयार केली जाते.

# हरवलेले १०० मोबाईल काढले शोधून

## हुपरी पोलिसांची कामगिरी;सर्व मोबाईल मूळ मालकांना दिले परत

हुपरी,ता.२८(वार्ताहर)-

**हुपरी पोलिसांनी एक अत्यंत कौतुकास्पद कामगिरी करत नागरिकांचे हरवलेले तब्बल २९ लाख ५० हजार रुपये किमतीचे १०० मोबाईल संच शोधून काढले आहेत. ता.२६ मार्च रोजी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून हे सर्व मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना सुपूर्द करण्यात आले. हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.**



हुपरी पोलीस ठाण्याच्यावतीने हरवलेले मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करताना उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक एन.आर.चौखंडे व इतर.

हुपरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांत मोबाईल हरवल्याच्या अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या. या वाढत्या तक्रारींची गंभीर दखल घेत पोलिसांनी सर्व हरवलेल्या मोबाईलचे आयएमईआय क्रमांक एकत्रित केले. यानंतर सायबर पोलीस ठाण्याची मदत घेत आणि शासनाच्या सीईआयआर पोर्टलचा प्रभावी वापर करून विविध मोबाईल कंपन्यांशी संपर्क साधण्यात आला. मागील काही दिवसांपासून पोलिसांनी अत्यंत बारकाईने तांत्रिक तपास करून महाराष्ट्र तसेच इतर राज्यांतून हे तब्बल १०० मोबाईल संच हस्तगत करण्यात मोठे यश मिळवले.

सदरची उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, अप्पर पोलीस अधीक्षक आण्णासाहेब जाधव आणि इचलकरंजी विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक एन. आर. चौखंडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही शोधमोहीम यशस्वीपणे राबवली. या संपूर्ण कारवाईत पोलीस कॉन्स्टेबल दर्शन धुळे यांची कामगिरी अत्यंत लक्षवेधी आणि मोलाची ठरली. तांत्रिक तपासातील त्यांची हातोटी, सीईआयआर पोर्टलचा त्यांनी केलेला अचूक वापर आणि राज्याच्या विविध भागांतून तांत्रिक माहिती संकलित करण्यासाठी त्यांनी घेतलेले विशेष परिश्रम व सततचा पाठपुरावा यामुळेच हे १०० मोबाईल शोधणे शक्य झाले. त्यांच्या या चिकाटी आणि उत्कृष्ट कामगिरीचे पोलीस दलासह सर्वसामान्यांमधूनही मोठे कौतुक होत आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांच्या हस्ते आवश्यक त्या कागदपत्रांची पडताळणी करून सर्व नागरिकांना त्यांचे हरवलेले मोबाईल परत देण्यात आले. आपला हरवलेला मोबाईल पुन्हा मिळण्याची आशा सोडून दिलेल्या नागरिकांना जेव्हा त्यांचा मोबाईल प्रत्यक्ष हातात मिळाला, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद गगनात मावेनासा होता.या अनपेक्षित सुखद धक्क्यामुळे सर्वच मोबाईल मालकांनी हुपरी पोलिसांचे विशेष आभार मानले असून पोलिसांच्या या तत्पर व प्रभावी कामगिरीची संपूर्ण शहरात चर्चा सुरू आहे.

# जोतिबा यात्रेसाठी १३५ जादा बसेस सोडणार

## -अभय देशमुख यांची माहिती

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

**श्री क्षेत्र जोतिबा देवाची चैत्र पौर्णिमा यात्रा दिनांक ३० मार्च ते २ एप्रिल २०२६ अखेर संपन्न होत आहे. श्री जोतिबा चैत्र यात्रेनिमित्त राज्य तसेच अन्य राज्यातून येणाऱ्या भाविकांसाठी कोल्हापूर एसटीच्यावतीने १३५ जादा बसेस सोडण्यात येणार असून आवश्यकतेनुसार आणखीन जादा गाड्या सोडण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती विभाग नियंत्रक अभय देशमुख यांनी दिली.**



जोतिबा यात्रेसाठी मध्यवर्ती बसस्थानक कोल्हापूर, जोतिबा डोंगर व पंचगंगा घाट या ठिकाणी प्रवाशांच्या सोयीसाठी तात्पुरत्या स्वरुपाचे यात्रा शेड उभारण्यात आले आहेत. प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून बसस्थानकावर क्यु रेलींग उभारण्यात आलेली आहेत. तसेच भाविक प्रवाशांच्या सोईसाठी जोतिबा बसस्थानक आणि पंचगंगा बसस्थानकावर पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. याशिवाय बस मार्गस्थ बिघाड झाल्यास तात्काळ दुरुस्त करण्यासाठी यांत्रिक कर्मचारी, ब्रेक डाऊन अटेंड वाहने (दुरुस्तीसाठीच्या अत्यावश्यक साहित्यासह) उपलब्ध केली आहेत.

पंचगंगा घाट बसस्थानक व जोतिबा बसस्थानक जोतिबा डोंगर येथून दर पाच मिनीटाला एसटी बस फेरीचे नियोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेशासह इतर राज्यातील भाविकांचे कुलदैवत असलेल्या श्री ज्योर्तिलिंग देवाची यात्रा, जोतिबा डोंगर (वाडीरत्नागिरी) येथे चैत्र पौर्णिमेनिमित्त संपन्न होत असून, यात्रेचा कालावधी दिनांक १ व २ एप्रिल २०२६ असा आहे.या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सोयीसाठी राज्य मार्ग परिवहन कोल्हापूर विभागाने मध्यवर्ती बसस्थानक, पंचगंगा घाट तसेच जोतिबा डोंगर येथे एसटीची खास व्यवस्था केली आहे त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन एसटीचे विभाग नियंत्रक अभय देशमुख यांनी यांनी केले आहे.



ज्येष्ठ कलाकार मिलिंद ओक आणि आकाराम पाटील यांचा सत्कार करताना डॉ.गुरुदत्त म्हाडगुत,डॉ.रवींद्र मोरे व इतर मान्यवर.

# रंगभूमीच्या संवर्धनासाठी नाट्य रसिकांच्या पाठबळाची गरज-ओक

इचलकरंजी,ता.२८-

**रंगभूमीच्या संवर्धनासाठी व विकासासाठी नाट्य रसिकांच्या पाठबळाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कलाकार मिलिंद ओक यांनी केले.**

कोल्हापूर येथील शाश्वत प्रतिष्ठान आणि अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्यावतीने जागतिक रंगभूमी दिनाच्या निमित्ताने ज्येष्ठ कलाकार मिलिंद ओक आणि आकाराम पाटील यांचा सत्कार शाश्वत प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.गुरुदत्त म्हाडगुत व रेशन महासंघाचे जिल्हाध्यक्ष डॉ.रवींद्र मोरे यांच्या हस्ते शाल,श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष शामराव जोशी हे होते.यावेळी जनता बाजारचे चेअरमन नाना उलपे, अनंत जोशी,गुरुप्रसाद कुलकर्णी,विकास कोल्हापुरे, प्रतिष्ठानचे संचालक संतोष परब,करण शिंदे, अविनाश टकळे, धवल पोवार,भगवानराव पोवार,हिदायत मणेर, प्रशांत कुलकर्णी,अमोल पानारी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



नायब तहसीलदार पुजारी यांना निवेदन देताना अतुल मंडपे,वृत्तपत्र विक्रेते.

# वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ कार्यान्वित करण्याची मागणी

हातकणंगले,ता.२८(प्रतिनिधी)-

**वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ कार्यान्वित करावे यासह इतर मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटने अंतर्गत हातकणंगले तालुका वृत्तपत्र विक्रेता व एजंट्स संघटना, हातकणंगले यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले. याबाबतचे निवेदन निवडणूक नायब तहसीलदार संजय पुजारी यांना देण्यात आले.**

निवेदनांत म्हंटले आहे की ,दहा ऑक्टोंबर २०२४ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.या संघटनेच्या माध्यमातून गेल्या पंधरा वर्षापासून वरील विषयी पाठपुरावा करत आहोत. यामुळेच माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दहा ऑक्टोंबर २०२४ च्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता दिली गेली आहे.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाबाबत शासन आदेश, शासन निर्णय लवकरात लवकर काढून वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळ कार्यरत करावे. आपण वृत्तपत्र क्षेत्रातील आम्हा सामान्य कष्टकरी घटकांचे स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळ योग्य ती कार्यवाही पूर्ण करुन कार्यान्वीत करावे, अशी विनंती आहे.निवेदनावर सर्वश्री अतुल मंडपे , सुनिल पाटील,कुबेर हंकारे,संतोष डुणूंग,अमोल शिंदे यांच्यासह तालुक्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांच्या सह्या आहेत.

# शाहूवाडी तालुक्यात कृषी मार्गदर्शन मेळावा उत्साहात

सरूड,ता.२८(प्रतिनिधी)-

**भारत हा कृषीप्रधान देश असून शेतकरी हा देशाचा कणा आहे. अनेक संकटांना सामोरे जात शेतकरी खंबीरपणे उभा राहत असतो. त्यामुळे शासनाच्या सर्व योजना शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य अमरसिंह पाटील यांनी केले.**



कृषी मेळाव्याच्यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा परिषदेचे सदस्य अमरसिंह पाटील, समवेत उपस्थित मान्यवर व अधिकारी वर्ग.

पंचायत समिती शाहूवाडी कृषी विभागाच्या वतीने आयोजित शेती व शेतीपूरक उद्योग व्यवसाय मार्गदर्शन मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सभापती प्रियंका भोसले होत्या.यावेळी सर्जेराव पाटील म्हणाले की, शासनाच्या विविध योजनांमुळे शेतकऱ्यांना बळकटी मिळणार असून त्यांच्या आर्थिक व सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. उपसभापती अमर खोत व गटविकास अधिकारी मंगेश कुचेवार यांनीही मनोगते व्यक्त केली. मेळाव्यात बांबू रिसर्च फाउंडेशनचे पाटलोबा पाटील यांनी बांबू लागवडीविषयी मार्गदर्शन केले, तर निवृत्त पशुधन विकास अधिकारी श्रीकृष्ण भट यांनी आधुनिक कुक्कुटपालनाविषयी सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाला जि. प. सदस्य स्नेहल वेल्हाळ, पंचायत समिती सदस्य अमरसिंह चौगुले, डॉ. धनश्री जाधव, लक्ष्मी पाटील, माधुरी पाटील, सुरेश पवार, तालुका कृषी अधिकारी नीलम चाकणे, कृषी अधिकारी अंकुश गोरे, शिवाजी काशीद, पर्यवेक्षक संदीप शेळके, विस्तार अधिकारी बाजीराव गायकवाड, अंकुश शेलार यांच्यासह शेतकरी व महिला उपस्थित होत्या. यावेळी कृषी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# सांगलीत शरद अकॅडमीमार्फत बुधवारी ओरिएंटेशन सेमीनार

सांगली,ता.२८-

**दहावीची परीक्षा दिलेल्या आणि अकरावी सायन्समध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी करिअरचा भक्कम पाया घालणारे विशेष ओरिएंटेशन सेमिनार शरद आयआयटी व मेडिकल अकॅडमी आणि श्री चैतन्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे. बुधवार, ता.१ एप्रिल रोजी सकाळी साडेदहा वाजता सांगली येथील राजमती भवन, नेमिनाथ नगर येथे हा उपयुक्त मार्गदर्शन कार्यक्रम पार पडणार आहे.**

या सेमिनारमध्ये विद्यार्थ्यांना आयआयटी-जेईइ,एनईईटी आणि एमएचटी-सीईटी या महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षांची सखोल माहिती देण्यात येणार असून, अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रातील करिअरच्या संधी, ११ वी - १२ वीतील अभ्यासाची योग्य दिशा तसेच यशस्वी तयारीचा रोडमॅप याविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.दहावीनंतरच्या टप्प्यावर योग्य मार्गदर्शन मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने विद्यार्थी आणि पालकांनी या ओरिएंटेशन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून भविष्यातील करिअरविषयी योग्य दिशा मिळवावी, असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

# श्रीराम दूध संस्थेच्यावतीने श्रीखंड वाटप

रुई,ता.२८(वार्ताहर)-

**गोकुळ संघाच्या रुई (ता. हातकणंगले) येथील श्री राम दूध संस्थेच्या वतीने श्रीराम नवमीनिमित्त दूध उत्पादक शेतकऱ्यांना भेट म्हणून गोकुळचे श्रीखंड देण्याचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दूध देखील मोफत वाटप करण्यात आले.**



संस्थेच्या दूध उत्पादकांना श्रीखंड वाटप करताना डॉ.मिणचेकर.

सकाळी प्रभू श्री राम यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे चेअरमन राजाराम झपाटे यांच्या हस्ते व गोकुळ दूध संघाचे विस्तार अधिकारी विक्रम पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.तर सायंकाळी डॉ.सुजित मिणचेकर यांच्या हस्ते संस्थेच्या ग्राहकांना मोफत दूध वाटप करण्यात आले. त्यानंतर नियमित दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना भेट म्हणून गोकुळचे श्रीखंड देण्यात आले.

यावेळी जयसिंग शिंदे, भाऊसाहेब फास्के, दगडू सुर्वे, अभय काश्मिरे,अवधूत कुलकर्णी, अरुण झपाटे, राजू बेनाडे, नंदकुमार साठे,अमोल आवटे, अनिल जाधव,चंद्रकांत झपाटे, विशाल कराळे,शीतल पुजारी, शास्त्री सकटे,सुशांत पाटणकर, नितीन झपाटे, राकेश खाडे,अविनाश शिंदे व गणेश शिंदे यांच्यासह दूध उत्पादक शेतकरी तसेच नागरिक उपस्थित होते.

# निरोगी पिढीसाठी स्तनपान काळाची गरज

## - जिल्हाधिकारी अमोल येडगे

कोल्हापूर,ता.२८ (प्रतिनिधी)

**निरोगी, सक्षम आणि बुद्धिमान पिढी घडवण्यासाठी आईचे स्तनपान अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले आहे. आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर येथे स्तनपान व शिशुपोषण या विषयावर आयोजित विशेष ॲडव्होकेसी बैठकीत ते बोलत होते.**

राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य विभागातील प्रशिक्षणाचे महत्त्व जाणून घेऊन बी.पी.एन.आय. या संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे. याच अनुषंगाने ब्रेस्टफीडिंग प्रमोशन नेटवर्क ऑफ इंडिया आणि सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीला जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस.आणि कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती के. मंजुलक्ष्मी यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरुवातीला आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. योगेश साळे यांनी विषयाची प्रस्तावना करताना स्तनपानाचे महत्त्व अधोरेखित केले. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी स्तनपानाचे महत्त्व सांगितले.

श्रीहरी
शुक्रवार, ता. २७/०३/२०२६ पासून
दुपारी १ वाजता
ओरिजीनल हिन्दी इचलकरंजीत प्रथमच
अधुरी इच्छा
प्रौढांसाठी ४ व ७ वा.
A हवस की रात A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. २७ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
A टाईम ट्रॅव्हलर A
फक्त प्रौढांसाठी

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 गर्दीचा २ रा आठवडा
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 7 वाजल्यापासून सुरू राहील
book my show
पंचवटी वॉटसअॅप ग्रुप
संपर्क : 9623150103
रोज ३ खेळ
* दुपारी १२ व ४ आणि रात्री ९ वा.





५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गुरुवार ता. १९पासून रोज ३ खेळ
११.१५ - ३.१५ - ७.१५ वा.




कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत गुरुवार ता.१९ पा
१२ वा., दुपारी ४ वा, रात्री ९ वा,
सुपरहिट फुल्ल ॲक्शन चित्रपट




गुरु बुधवार ता.१८ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
रोज ३ खेळ १२*४*९ वा.




RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 book my show




" धुरंधर 2 : द रिव्हेंज " - हिंदी ( A )
08:30 AM, 09:45 AM, 12:00 PM
01:00 PM, 02:00 PM, 04:15 PM
05:30 PM, 06:15 PM, 08:30 PM
10:00 PM, 10:30 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11




धुरंधर २ (HIN) (A)
09.15, 10.30am,
12.30, 01.30,
03.00, 05.00,
06.00, 07.30,
09.30, 10.30 pm
आता पहा मॉर्निंग शो फक्त 100 पासून पुढे

# पाटण शहरातील रस्त्याचे काम दोन महिन्यात पूर्ण करा

## मंत्री शंभूराज देसाईंचे निर्देश; जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक

सातारा,ता.२८(प्रतिनिधी)-

**कराड- चिपळूण महामार्गावरील पाटण शहरांतर्गत रस्त्याचे काम खूप दिवसांपासून रखडलेले आहे. तसेच हा रस्ता खूप खराब झाल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, तरी रस्ते विकास महामंडळाने पाटण शहरातील अंतर्गत रस्ता व जुना धांडे पूल पाडून नवा पुलसह रस्ते काम येत्या दोन महिन्यात पूर्ण करावे, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.**



सातारा जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीत बोलताना पालकमंत्री शंभूराज देसाई, समवेत जिल्हाधिकारी पाटील व इतर.

जिल्हाधिकारी कार्यालयात पाटण विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांचा आढावा पालकमंत्री श्री. देसाई यांनी घेतला. या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील,पोलीस अधीक्षक तुषार दोशी, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, उपजिल्हाधिकारी महसूल विक्रांत चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, रस्ते विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंता श्रुती नाईक यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पाटण शहरातील अंतर्गत रस्त्याच्या कामामुळे वाहन धारकांना पर्यायी रस्ते दिले आहेत. हे रस्ते गावागावातून जात असल्याने या रस्त्यांवरुन अवजड वाहने जाणार नाहीत याची पोलीस विभागाने खबरदारी घ्यावी, असे निर्देश देऊन पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, जड वाहने ही आंबा घाट मार्गे सोडावीत. पाटण एसटी डेपो परिसरातील अतिक्रमणाबाबत न्यायालयाचा लवकर निकाल येईल, येणाऱ्या निकालाप्रमाणे राज्य परिवहन विभागाने कारवाई करावी, असे निर्देशही पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिले.पाटण तालुक्यातील अभयचीवाडीसह काही गावांत शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्य प्राणी मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहे. यामुळे येथील शेतकरी हतबल झाले आहेत. यावर उपाय म्हणून शेतीभवती सौर कुंपण अथवा चर यापैकी जो पर्याय प्रभावी आहे तो करावा. यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल,अशी ग्वाहीही पालकमंत्री श्री. देसाई यांनी बैठकीत दिली.

नाव गावातील ग्रामस्थ पिढ्यानं पिढ्या वन विभागाची जमीन कसत असून त्यांची उपजिविका त्यावर अवलंबून आहे. ही जमीन वन विभागाने ताब्यात घेतली आहे. कसणाऱ्या शेतकऱ्यांना ही जमीन मिळावी यासाठीचा प्रस्ताव आयुक्तांमार्फत शासनाला सादर करा. याबाबत महसूल व वन यांची मंत्रालयात संयुक्त बैठक घेण्यात येईल व सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे पालकमंत्री श्री. देसाई यांनी बैठकीत सांगितले.

## जिल्ह्यात गॅससह पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा

सातारा,ता.२८(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ग्राहकांना मुदतीत गॅस मिळेल. लोकांना पॅनिक होऊन गॅस एजन्सीसमोर नाहक रांगा लावू नयेत तसेच पेट्रोल डिझेलचाही पुरेसा साठा उपलब्ध आहे. भारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम व इंडियन ऑइल या कंपन्यांनी जिल्ह्यातील वितरकांना एक दिवसाचे क्रेडीट देऊन पुरवठा करण्याचे ठरविले आहे. जिल्ह्यात कुठेही टंचाई नाही, याबाबत लोकांनी आश्वस्त रहावे. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत राहील,अशी ग्वाही पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.**

जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीत जिल्ह्यातील पेट्रोल,एलपीजी तसेच इतर अत्यावश्यक सेवांच्या पुरवठ्या संदर्भात पालकमंत्री श्री. देसाई यांनी माहिती घेतली.यावेळी अपर जिल्हाधिकारी मल्लीकार्जुन माने, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने यांच्यासह पुरवठाधारक कंपन्यांचे प्रतिनिधी, सर्व प्रांताधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री शंभूराज देसाई म्हणाले, पेट्रोल, एलपीजी, गॅस या सर्वांचा साठा जिल्ह्यात पूरेसा असून रिफिलींगची व्यवस्थाही अत्यंत चांगली आहे. त्यामुळे जिल्ह्यात या जीवनावश्यक वस्तुंची टंचाई नाही, लोकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये,पेट्रोल पंप, गॅस एजन्सी यांच्यासमोर अकारण रांगा लावू नयेत. वाहनांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त इंधन भरू नये. किंवा त्याचा घरात कॅनमध्ये साठा करुन आपला जीव धोक्यात घालू नये, सर्वत्र परिस्थिती नियंत्रणात आहे. साठा करण्याची गरज नाही.



आष्टा : दिव्यांग बांधवांना धनादेशाचे वाटप करताना नगराध्यक्ष विशाल शिंदे, मुख्याधिकारी अवधूत कुंभार,रघुनाथ मोहिते आदी.

## दिव्यांग कल्याण भवन उभारण्यासाठी प्रयत्नशील-शिंदे

आष्टा,ता२८(प्रतिनिधी)-

**दिव्यांग व्यक्तींचा सन्मान व स्वावलंबनासाठी आष्टा नगरपालिका कायम कटिबद्ध असेल.लवकरच दिव्यांग बांधवांसाठी नगरपालिकेच्या माध्यमातून दिव्यांग कल्याण भवन उभारण्यासाठी प्रयत्नशील आहोत,असे प्रतिपादन नगराध्यक्ष विशाल शिंदे यांनी केले.**

आष्टा नगरपरिषदेच्या वतीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील ५ टक्के दिव्यांग निधीअंतर्गत पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना आर्थिक मदत देण्यात आली. यावर्षी आष्टा नगरपरिषदेचा दिव्यांग कल्याणासाठी एकूण रुपये ६ लाख ९९ हजार ९१८ इतका निधी खर्च करावयाचा होता. त्यानुसार आष्टा नगरपरिषदेच्यामार्फत १५९ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी ४ हजार रुपये निर्वाह भत्ता धनादेशाच्या स्वरूपात देण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी अवधूत कुंभार, प्रशासकीय अधिकारी रघुनाथ मोहिते हे प्रमुख तसेच शहरातील दिव्यांग बांधव, त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



थोर शास्त्रज्ञ डॉ.वसंत गोवारीकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजनप्रसंगी श्रीरंग काटेकर, घनश्याम चव्हाण, नितीन शिवथरे व शिक्षक वर्ग.

## डॉ.गोवारीकरांचे वैज्ञानिक संशोधन क्षेत्रात मोलाचे योगदान-काटेकर

सातारा,ता.२८(प्रतिनिधी)-

**भारत भूमीचे सुपुत्र थोर वैज्ञानिक व आत्मनिर्भरतेचा ध्यास घेऊन वाटचाल करणारे थोर शास्त्रज्ञ डॉ.वसंत गोवारीकर यांनी भारतीय वैज्ञानिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे, असे मत गौरीशंकरचे जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर यांनी व्यक्त केले.**

लिंब (जि.सातारा) येथील गौरीशंकरचे डॉ.पी.व्ही.सुखात्मे इंग्लिश मिडियम स्कूल लिंब येथे शास्त्रज्ञ डॉ.वसंत गोवारीकर यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी स्कूलचे प्रभारी प्राचार्य घनश्याम चव्हाण, नितीन शिवथरे, राकेश खोपडे व शिक्षक वर्ग आदी प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी थोर शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक व आभार नितीन शिवथरे यांनी केले.

## कराड येथे बारा तासांची सिग्नल यंत्रणा सुरू

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

**शहरात वाहतुकीचे तीनतेरा वाजले असून, अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे. त्याचा विचार करून आता शहरातील मुख्य चौकातील सिग्नल यंत्रणा सकाळी आठ ते रात्री आठ असे सलग १२ तास सुरू ठेवण्याचा प्रायोगिक तत्त्वावर निर्णय झाला आहे. त्यास सुरूवातही झाली.**

शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी शहर वाहतूक पोलिसांनी हा प्रयोग राबवला आहे. आठवडाभर प्रायोगिक तत्त्वावर याचा काय परिणाम होतो, हे पाहून सलग बारा तास सिग्नल यंत्रणा सुरू ठेवण्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप सूर्यवंशी यांनी सांगितले.

# मणदूर परिसरातील आंदोलकांच्या प्रश्नांवर कोल्हापुरात बैठक

चांदोली,ता.२८(वार्ताहर)-

**मणदूर, उखळू व परिसरातील वाड्यावस्त्यांच्या ग्रामस्थांनी ९ मार्चपासून वारणावती (ता. शिराळा) येथील वन्यजीव कार्यालयावर सुरू केलेले आंदोलन कायम असून, सर्व प्रश्न मार्गी लागल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा ठाम निर्धार आंदोलकांनी केला आहे.**



कोल्हापूर येथे आयोजित बैठकीवेळी डॉ.भारत पाटणकर, अधिकारी व आंदोलक उपस्थित होते.

दरम्यान, या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर येथे पाटबंधारे विभाग व वन विभागाच्या स्वतंत्र बैठका पार पडल्या. पाटबंधारे विभागाची बैठक अधीक्षक अभियंता अभिजित म्हेत्रे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी डॉ. भारत पाटणकर यांच्यासह कार्यकारी अभियंता श्री. पोतदार, उपअभियंता प्रकाश बंडगर आणि आंदोलनकर्त्यांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

बैठकीत वारणावती वसाहती मधील अतिक्रमणबाबत संबंधितांना कायद्याच्या आधारे नोटिसा पाठवून पुढील कार्यवाही केली जाईल, महावितरणच्या वास्तव्याबाबत पाटबंधारे विभागाशी करार झाल्याने त्याची पडताळणी करून पुढील निर्णय घेतला जाईल,असे ठरले. स्थानिक ग्रामस्थांना अतिक्रमण प्रक्रियेतून वगळण्याबाबत निवेदन सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच शाळेची माहिती घेऊनच नोटिसा देण्यात येतील, असेही स्पष्ट करण्यात आले. वसाहतीतील रस्त्यांवर पथदिवे बसवण्यासाठी ग्रामपंचायतीने सविस्तर मागणी करावी, असेही सांगण्यात आले.

दरम्यान, वन विभागाच्या कार्यालयात मुख्य वनसंरक्षक श्री लक्ष्मी, क्षेत्र संचालक तुषार चव्हाण, उपसंचालक स्नेहलता पाटील, वनक्षेत्रपाल ऋषिकेश पाटील यांच्यासह अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली यामध्ये प्रामुख्याने वन्यप्राणी उपद्रव कमी करण्यासाठी जंगलामध्ये फळझाडांची लागवड, पाणवठ्यांचे व्यवस्थापन आणि गवत कुरण विकास यांसारख्या उपाययोजनांवर भर देण्यात आला. यासाठी स्थानिक तज्ञ, ग्रामस्थ व जैवविविधता तज्ञांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच १७ एप्रिल रोजी प्रत्यक्ष जंगलात पाहणी बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले. या बैठकीत विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करून संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीचे आदेश देण्यात आले.

या बैठकी डॉ. भारत पाटणकर यांच्या उपस्थितीत पार पडल्या. या बैठकीस सखाराम पाटील, शिवाजी पाटील, प्रकाश पाटील, अमोल कांबळे, नथुराम माने, विजय माने, राम माने, जिजाबाई पाटील, येसूबाई पाटील, अंकुश कदम, राजू वडाम, सावळा पाटील, वसंत पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# बिबट्याचा वनविभागाला चकवा



शिद्रुकवाडी येथे बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने लावलेला पिंजरा.

### पिंजऱ्यातून कोंबडा गायब, तरीही बिबट्या जेरबंद होईना

ढेबेवाडी,ता.२८(प्रतिनिधी)-

**शिद्रुकवाडी (काढणे ता.पाटण) येथे गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. काही दिवसांपूर्वीच एका मुलीसमोर अचानक बिबट्या आल्याने तिची मोठी घाबरगुंडी उडाली होती. या घटनेचे गांभीर्य ओळखून वनविभागाने तत्काळ पावले उचलत परिसरात ट्रॅप कॅमेरे बसवले असून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजराही लावला आहे. मात्र, हा बिबट्या वनविभागाच्या पथकाला चकवा देत असल्याचे समोर आले आहे.**

बिबट्याला पिंजऱ्याकडे आकर्षित करण्यासाठी वनविभागाने सुरुवातीला पिंजऱ्यात शिकारीसाठी कोंबडा ठेवला होता. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी वनविभागाचे कर्मचारी आणि ग्रामस्थ पिंजऱ्यापाशी गेले असता,त्यांना धक्काच बसला. पिंजऱ्यात बिबट्या तर अडकला नव्हताच, उलट शिकारीसाठी ठेवलेला कोंबडाही तिथून गायब झाला होता. त्यामुळे तो कोंबडा नेमका कोणी नेला? बिबट्याने पिंजऱ्यात न अडकता शिकारीवर डल्ला मारला की अन्य काही प्रकार घडला,याबाबत परिसरात मोठी चर्चा सुरू आहे.

कोंबडा गायब झाल्याच्या प्रकारानंतर आता वनविभागाने आपली रणनीती बदलली आहे. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी आता पिंजऱ्यात कुत्रा ठेवण्यात आला आहे, असे असूनही बिबट्या पिंजऱ्याच्या परिसरात न फिरकता दुसऱ्याच बाजूला वावरत असल्याचे दिसून येत आहे. बिबट्याच्या या लपाछपीमुळे वनविभागासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. बिबट्या वारंवार हुलकावणी देत असल्याने परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीती कायम असून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

# डार्क स्पॉटवर पोलिस गस्त वाढवा

### मंत्री चंद्रकांत पाटील

सांगली,ता.२८(प्रतिनिधी)-

**गुन्हेगारीचे प्रमाण वाढते आहे. गुन्हेगारांमध्ये पोलिसांची दहशत निर्माण करून कायद्याचा धाक निर्माण केला पाहिजे. त्यासाठी विशेष मोहिम हाती घेतली पाहिजे. दिसेल त्याठिकाणी टवाळखोरांना पोलिसी खाक्या दाखवला पाहिजे, डार्क स्पॉटच्या परिसरात पोलिसांची गस्त ठेवण्याबरोबरच सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर असावी, अशा सूचना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पोलिसांना दिल्या.**



सांगली जिल्हा पोलिस दलाकडील विविध विकासकामांचे भूमिपूजनप्रसंगी पालकमंत्री चंद्रकांत पाटील व इतर प्रमुख मान्यवर.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ च्या निधीतून सांगली जिल्हा पोलिस दलाकडील विविध विकासकामाचे भूमिपूजन पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले.यावेळी ते बोलत होते. यावेळी आम.सुधीर गाडगीळ, आम. सुरेश खाडे, जिल्हाधिकारी अशोक काकडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, महापालिकेचे आयुक्त सत्यम गांधी, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता क्रांतीकुमार मिरजकर,पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर हा कार्यक्रम झाला. स्वागत आणि प्रास्ताविक जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी केले.

पालकमंत्री पाटील पुढे म्हणाले, सांगली जिल्ह्यातही डार्क स्पॉटस्च्या ठिकाणी वीजव्यवस्था, सीसीटीव्ही व्यवस्था, अतिक्रमण हटाव यासाठी महानगरपालिका व जिल्हा वार्षिक योजनेच्या एकत्रित निधीतून कार्यवाही करावी. पोलिस विभागाने गस्त वाढवावी.

## कराडात सोमवारपासून अतिक्रमणे हटवणार-नगराध्यक्ष यादव

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

**शहरातील मुख्य रस्त्यांसह पेठांमध्ये झालेली अतिक्रमणे हटविण्याची मोहीम सोमवार (ता.३०) पासून पालिका हाती घेत आहे. त्यासाठी पोलिस बंदोबस्तही मागविला आहे. सर्वप्रकारची अतिक्रमणे त्यात हटवली जातील, अशी माहिती नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी दिली.**

नगराध्यक्ष यादव म्हणाले, शहरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढली आहेत. त्याचा विळखा शहराला पडला आहे. मात्र, त्यातून अनेक समस्या निर्माण होत आहेत.तो विळखा कायमचा सुटण्यासाठी पालिकेने व्यापक अतिक्रमण हटाव मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारपासून बांधकामासह कच्च्या आणि पक्क्या अतिक्रमणावर हातोडा टाकण्यात येणार आहे.त्यासाठी पोलिस बंदोबस्त मागवला आहे. पोलिस-पालिका मिळून अतिक्रमणे काढतील. वाहतुकीला अडथळा ठरणारी खोकी, हातगाड्यांसह रस्त्यालगतच्या गटारांवर बांधलेल्या पायऱ्या कट्टेही हटविले जातील. काही महिन्यांपासून दत्त चौक,चावडी चौक आणि कोल्हापूर नाका परिसरात पदपथांवर अतिक्रमण झाल्याच्या तक्रारी प्राप्त आहेत.त्यामुळे त्या फेरीवाल्यांवर कारवाई होईल. पादचाऱ्यांसाठी पदपथ मोकळा करण्याचा पालिकेचा हेतू आहे. शहरातील अनेक भागात गटार आणि सार्वजनिक जागांवर रक्कम बांधकामे असून, अशी अतिक्रमणेही हटवली जातील.

# विद्यार्थ्यांच्या कार्यक्षमतेवर देशाचा विकास अवलंबून

### डॉ.वेंकटेश्वरा शर्मा

ईश्वरपूर,ता.२८(प्रतिनिधी)-

**उरूण ईश्वरपूर येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या एम्पॉवर्ड ऍटोनॉमस महाविद्यालयात 'ससटेनबल मॅनेजमेंट अँड ऍडव्हान्सड रिसर्च टेक्नॉलॉजी' या विषयावरती आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन इसरो बंगलोरचे डायरेक्टर डॉ.वेंकटेश्वरा शर्मा यांच्या हस्ते आणि अतिथी भारतातील तैवान दूतावासाचे प्रमुख डॉ.लंग हेन यांग, आम.जयंत पाटील आणि आरआयटीच्या नियामक मंडळाचे सदस्य राजवर्धन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.**




राजारामबापू इन्स्टिट्यूटमधील आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना डॉ.वेंकटेश्वरा शर्मा, व्यासपीठावर अन्य प्रमुख मान्यवर.

यावेळी डॉ.वेंकटेश्वरा शर्मा यांनी सांगितले कि, देशाचा विकास हा विद्यार्थ्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना संरचनात्मक अंमलबजावणीसाठी तयार करा आणि अशी कार्यप्रणाली तयार करा ज्यामुळे देशाच्या लौकिकात भर पडेल. आपल्याला चांगल्या नागरिकांची गरज आहे. जे शिस्तबद्ध आणि क्रियाशील असतील. इसरो हि जागतिक पातळीवर अवकाश संशोधनातील नावाजलेली संस्था असून देशांतील लोकांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडवण्याचे सामर्थ्य तिच्यामध्ये आहे.

यावेळी अतिथी डॉ.लंग हेन यांग संशोधकांना म्हणाले कि, भारतातील तरुण पिढी हेच तुमचे सामर्थ्य आहे. आज तैवान देश भारतापेक्षा लहान असून अतिशय कमी लोकसंख्येचा देश आहे. आमच्याकडे आज तरुण लोकांची कमतरता आहे. तसेच शाश्वत तंत्रज्ञानाचा अंगीकार आणि विकास आज कोणत्याही देशाला पुढे नेऊ शकतो.

जयंत पाटील म्हणाले की, देशाची प्रगती मोजण्यासाठी आता त्या देशाचा किती विकास झाला हे पाहण्यापेक्षा तो विकास किती शाश्वत आहे हे पाहणे महत्वाचे. तसेच शिक्षण, उद्योग, समाज आणी शासन या चार घटकांच्या समन्वयावर शाश्वत विकास अवलंबून आहे. इको व्हिलेज, सोलर एनर्जी आणि बायो एनर्जी यासारखे शाश्वत स्तोत्रच हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत करतील.

आरआयटी महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.पी. व्ही.कडोले यांनीही मार्गदर्शन केले. याप्रसंगी कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव आर. डी. सावंत आणि आरआयटीच्या नियामक मंडळाचे सदस्य शामराव पाटील उपस्थित होते. स्वागत आणि प्रास्ताविक आंतराष्ट्रीय परिषदेचे कन्व्हेनर डॉ. व्ही. एच. कलमानी यांनी आणि आभार डॉ.आर.जी.देसावळे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.प्रियांका जाधव, डॉ.योगिनी कुलकर्णी आणि प्रा.गौतमी शिंगण यांनी केले.

# फार्मसीमध्ये संशोधन व सराव यांचा समन्वय आवश्यक

## डॉ.महादेव राव; कृष्णा विद्यापीठात राष्ट्रीय विद्यार्थी परिषद उत्साहात

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

**फार्मसी क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी केवळ सैद्धांतिक ज्ञान पुरेसे नसून संशोधन आणि प्रत्यक्ष सराव यांचा प्रभावी समन्वय आवश्यक आहे, असे प्रतिपादन 'ग्लोबल कॅन्सर कन्सोर्टियम'चे सहसंस्थापक प्रा. डॉ. महादेव राव यांनी केले.**



कराड : कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीत राष्ट्रीय विद्यार्थी परिषदेचे उद्घाटन करताना प्रा.डॉ.महादेव राव, सोबत उपस्थित मान्यवर.

कृष्णा विश्व विद्यापीठात आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय विद्यार्थी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी (कराड), गुलबर्गा विद्यापीठ (कर्नाटक) आणि असोसिएशन ऑफ फार्मास्युटिकल टीचर्स ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'अचूक औषधोपचार, उपचारात्मक औषध निरीक्षण आणि पदार्थ निगराणीच्या माध्यमातून रुग्ण सुरक्षितता' या विषयावर ही परिषद पार पडली. उद्घाटन सोहळा दीपप्रज्वलनाने झाला. व्यासपीठावर डॉ. प्रवीण शिणगारे, डॉ.एम. व्ही. घोरपडे, डॉ. जी.हिमाश्री, डॉ. विजय कणसे, डॉ.डी.के. अगरवाल आणि डॉ. एन.आर.जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. डॉ. राव यांनी, आपल्या भाषणात कर्करोग उपचारांच्या वाढत्या खर्चाकडे लक्ष वेधले. सर्वसामान्य रुग्णांना परवडणारे उपचार विकसित करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. 'गो ग्लोबल'पेक्षा 'गो लोकल' या संकल्पनेला प्राधान्य देत भारतीय रुग्णांच्या गरजांनुसार संशोधन व्हावे. डॉक्टर, संशोधक आणि वैज्ञानिक यांच्या समन्वयातूनच आरोग्यसेवेत गुणवत्तापूर्ण बदल शक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ.प्रवीण शिणगारे यांनी, औषधे व सौंदर्यप्रसाधन कायद्यातील बदलांचा आढावा घेताना २००५ नंतर वैद्यकीय उपकरणांचाही समावेश करून नियंत्रण यंत्रणा अधिक सक्षम करण्यात आल्याचे सांगितले. कृष्णा विद्यापीठाचे कुलपती डॉ.सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित ही परिषद संशोधन व आरोग्य क्षेत्रातील नव्या संधी निर्माण करणारी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविकात डॉ. एन. आर. जाधव यांनी भारत 'फार्मसी ऑफ द वर्ल्ड' म्हणून उदयास येत असल्याचे नमूद केले. परिषदेत विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

ट्रम्प यांनी आपल्या खास शैलीत पाच दिवसांच्या विश्रांतीची (पॉज) घोषणा केली, ती दहा दिवसांपर्यंत वाढवल्याने हा जगभरात तीव्र चर्चेचा विषय बनला आहे. हा राजनैतिक मार्ग पुन्हा मोकळा करण्याचा एक सदिच्छा संकेत होता की संघर्षाच्या अधिक निर्णायक टप्प्यासाठी केलेली लष्करी पुनर्रचना? राजकारणात बचावात्मक पवित्रा घेणे ही काही नवीन गोष्ट नाही. व्लादिमीर लेनिन यांनी म्हटले होते की, कधीकधी एक पाऊल मागे घेतल्याने भविष्यात मोठी झेप घेणे शक्य होते. ट्रम्प यांची ही विश्रांती कदाचित त्याच धोरणाचा भाग असावी: दबावाच्या मोठ्या रणनीतीमधील हा एक विचारपूर्वक घेतलेला विरोध असू शकतो. तथापि, या अनिश्चिततेमुळे मित्रराष्ट्र आणि शत्रू दोघेही अमेरिकेचा नेमका हेतू काय आहे, हे समजून घेण्यास धडपडत आहेत.

# अमेरिकन धोरणांची कोलांटीउडी आणि विल्सनचा वारसा

● जागतिक घडोमोडी



१९१७ मध्ये, परकीय संघर्षांपासून दूर राहू पाहणारे विद्वान राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन अखेर अशा एका युद्धात ओढले गेले, जे त्यांना टाळायचे होते. एका शतकानंतर, 'कधीही न संपणारी युद्धे' संपवण्याचे आश्वासन देऊन सत्तेवर आलेले डोनाल्ड ट्रम्प हेदेखील आज तशाच पेचात अडकल्याचे दिसत आहेत. ट्रम्प यांचे मध्यपूर्वेतील धोरण जितके लहरी आहे तितकेच ते बरेच काही सांगून जाणारे आहे; शांततेच्या आश्वासनांकडून ते संघर्षाच्या टोकापर्यंत आणि वाटाघाटींकडून युद्धाच्या भीषणतेपर्यंत झुकलेले दिसते.

सुरुवातीपासूनच ट्रम्प यांची वृत्ती स्वतःला एक उत्तम 'डिलमेकर' (करार करणारा मध्यस्थ) म्हणून प्रस्थापित करण्याची होती. रशिया आणि युक्रेनमधील वाद मिटवणे, इस्रायल आणि इराणमधील तणाव कमी करणे आणि अमेरिकेची जागतिक भूमिका अशा प्रकारे मांडणे की, ज्यामुळे महागड्या युद्धांशिवाय ठोस परिणाम मिळतील, अशी त्यांची मोठी महत्त्वाकांक्षा होती.मात्र, भूराजकीय वास्तव हे करारांच्या भाषेपेक्षा अधिक कठीण असल्याचे सिद्ध झाले आहे. फेब्रुवारीच्या अखेरीस, अमेरिकेची आक्रमक मोहीम आणि त्यासोबतच समांतर चाललेली इस्रायलची लष्करी कारवाई यामुळे जग हादरले. या घटनांनी संयम नव्हे, तर लष्करी शक्तीचे पुनरुत्थानच सूचित केले.

**गूढ विश्रांती**

ट्रम्प यांनी आपल्या खास शैलीत पाच दिवसांच्या विश्रांतीची (पॉज) घोषणा केली, जी आता तीव्र चर्चेचा विषय बनली आहे. हा राजनैतिक मार्ग पुन्हा मोकळा करण्याचा एक सदिच्छा संकेत होता की संघर्षाच्या अधिक निर्णायक टप्प्यासाठी केलेली लष्करी पुनर्रचना? राजकारणात बचावात्मक पवित्रा घेणे ही काही नवीन गोष्ट नाही. व्लादिमीर लेनिन यांनी म्हटले होते की, कधीकधी एक पाऊल मागे घेतल्याने भविष्यात मोठी झेप घेणे शक्य होते. ट्रम्प यांची ही विश्रांती कदाचित त्याच धोरणाचा भाग असावी: दबावाच्या मोठ्या रणनीतीमधील हा एक विचारपूर्वक घेतलेला विरोध असू शकतो. तथापि, या अनिश्चिततेमुळे मित्रराष्ट्र आणि शत्रू दोघेही अमेरिकेचा नेमका हेतू काय आहे, हे समजून घेण्यास धडपडत आहेत. मध्यपूर्वेसारख्या स्फोटक प्रदेशात गोंधळ हा संघर्षांइतकाच धोकादायक ठरू शकतो.

हे सर्व होर्मुझच्या सामुद्रधुनीतील संकटात स्पष्टपणे दिसून आले. जगातील तेलाच्या वाहतुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या या अरुंद मार्गावर इराणने अडथळे निर्माण केले, ज्याचा जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. क्षेपणास्त्रे किंवा ड्रोनपेक्षा होर्मुझची नाकेबंदी जागतिक अर्थव्यवस्थेच्या धमन्यांवर थेट प्रहार करते. यामुळे तेलाचे दर कडाडले, बाजारपेठा डळमळीत झाल्या आणि ऊर्जा आयात करणाऱ्या देशांची धावपळ उडाली. यामुळे वॉशिंग्टनवर परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी प्रचंड दबाव निर्माण झाला.

ट्रम्प यांचा प्रतिसाद नेहमीच्या पद्धतीचाच राहिला आहे: टोकाची आक्रमकता आणि त्यानंतर केलेली तडजोड. इराणला होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यासाठी दिलेली ४८ तासांची मुदत नंतर पाच दिवसांनी वाढवण्यात आली. त्यासोबतच सकारात्मक चर्चा सुरू असल्याचे दावे आणि संभाव्य कराराचे संकेतही देण्यात आले. या संकेतांमुळे शेअर बाजारात तात्पुरती सुधारणा झाली असली तरी, पडद्यामागे संशयाचे वातावरण कायम आहे. ट्रम्प प्रशासनाच्या शब्दांत आणि वास्तवात असलेली दरी हेच त्यांच्या धोरणाचे प्रमुख वैशिष्ट्य बनले आहे.

वाटाघाटींच्या चर्चा सुरू असतानाच, या प्रदेशातील अमेरिकेचे लष्करी अस्तित्व लक्षणीयरीत्या वाढले आहे. अतिरिक्त नौदल ताफा, उभयचर युद्धनौका आणि हवाई दलासह हजारो सैनिकांची तैनाती करण्यात आली आहे. भाषेचा सूरही कडक झाला आहे. इराणवर हल्ला करण्याची ही शेवटची उत्तम संधी असल्याचा उल्लेख निर्णायक बळाच्या वापरावर असलेला विश्वास दर्शवतो. मात्र, इतिहासाने नेहमीच सावध केले आहे. मध्यपूर्वेचा इतिहास अशा लष्करी हस्तक्षेपांनी भरलेला आहे ज्यांनी सुरुवातीला झटपट विजयाचे आश्वासन दिले,पण शेवटी दीर्घकाळ अस्थिरता निर्माण केली.

**विस्तारत जाणारा संघर्ष**

हा संघर्ष आता व्यापक होताना दिसत आहे. इस्रायलने तेहरान आणि त्यापुढील इराणी तळांवर हल्ले सुरूच ठेवले आहेत, तर इराणने आखातातील ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले करून प्रत्युत्तर दिले आहे. अमेरिकन तळ असलेल्या देशांमधील सुविधाही यातून सुटलेल्या नाहीत, ज्यामुळे संपूर्ण प्रदेश युद्धाच्या खाईत लोटला जाण्याची भीती निर्माण झाली आहे. दोन देशांमधील हा संघर्ष आता बहुआयामी जागतिक संकट बनण्याचा धोका निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर, ट्रम्प यांनी भविष्यासाठी एक विसंगत स्वप्न मांडले आहे: गाझा पट्टीचे रूपांतर गगनचुंबी इमारती, रिसॉर्ट्स आणि ब्रँडेड प्रकल्पांच्या एका झगमगत्या आर्थिक केंद्रात करणे. एआय-जनरेटेड प्रतिमांद्वारे या योजनेचा प्रचार करण्यात आला. मात्र, जमिनीवरील विनाश आणि कल्पनेतील ऐश्वर्य यातील दरी अफाट आहे. राजकीय तोडग्याशिवाय अशा आर्थिक योजना केवळ स्वप्नवत वाटतात.

ट्रम्प यांच्या धोरणात जर काही तर्क असेल, तर तो म्हणजे 'दबावामुळे तडजोड होते' हा विश्वास. मात्र, इराणने आपल्या स्वतःच्या अटी मांडल्या आहेत: निर्बंधांतून सवलत, भविष्यातील हल्ल्यांपासून संरक्षण आणि अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याचे आश्वासन. इराणने आपली गोठवलेली मालमत्ता मुक्त करण्याची आणि सुरक्षाविषयक चिंता मान्य करण्याची मागणीही केली आहे. या मागण्या जुन्या असल्या तरी, सध्याच्या वातावरणात तडजोड करणे अधिक कठीण झाले आहे.अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांनीही यावर नाराजी व्यक्त केली आहे. होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय आघाडी उभारण्याच्या आवाहनाला थंड प्रतिसाद मिळाला आहे. पारंपारिक भागीदारही आपली नौदलाची संसाधने देण्यास कचरत आहेत, कारण त्यांना अशा संघर्षात ओढले जाण्याची भीती आहे ज्याचे उद्दिष्ट अस्पष्ट आहे. अमेरिकेच्या रणनीतीत सुसंगततेचा अभाव असल्याचेच हे निदर्शक आहे.

दुसरीकडे, भारताने विस्कळीतपणाऐवजी सातत्यावर भर दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संवाद आणि मुत्सद्देगिरीचे महत्त्व अधोरेखित करत भारताला शांततेचा पुरस्कर्ता म्हणून मांडले आहे. भारतासाठी याचे महत्त्व मोठे आहे. लाखो भारतीय नागरिक आखाती देशांत राहतात आणि त्यांची सुरक्षा या प्रदेशाच्या स्थिरतेवर अवलंबून आहे.

**सावध सहभाग**

भारताची भूमिका ही त्याच्या दीर्घकालीन सावधगिरीच्या परंपरेचे प्रतिबिंब आहे. पश्चिम आशियातील भूतकाळातील संकटांपासून ते आजपर्यंत, भारताने नेहमीच स्वतःचे हित जपताना कोणत्याही संघर्षात थेट गुंतणे टाळले आहे. वॉशिंग्टन, तेहरान आणि जेरुसलेम यांच्यातील दुवा बनून मध्यस्थी करण्याची भारताची इच्छा स्पष्ट आहे, परंतु त्याच्या मर्यादाही आहेत. भूराजकारणात प्रभाव हा सत्ता आणि भौगोलिक सान्निध्यातून येतो; भारताकडे सान्निध्य काही प्रमाणात आहे आणि सत्ता निवडक क्षेत्रांतच आहे.

एकूणच चित्र वाढत्या अस्थिरतेचे आहे. ७ ऑक्टोबर २०२३ च्या हल्ल्यांनंतर मध्यपूर्व हिंसाचाराच्या चक्रात अडकले आहे. या संघर्षाचे पर्यावरणीय आणि मानवतावादी परिणाम लष्करी रणनीतीमध्ये अनेकदा दुर्लक्षित केले जातात, परंतु ते युद्धापेक्षाही जास्त काळ टिकणारे ठरतील.

अशा परिस्थितीत 'निर्णायक विजय' ही संकल्पना मृगजळ ठरत आहे. ट्रम्प यांची धोरणे अचानक होणारे बदल आणि धाडसी घोषणांनी भरलेली आहेत. मात्र, कोणत्याही ठोस उद्दिष्टाशिवाय केलेला विस्कळीतपणा तीच जुनी अस्थिरता अधिक घट्ट करू शकतो. वाटाघाटींपासून संघर्षापर्यंतच्या या कोलांटीउडीने स्पष्टतेऐवजी केवळ अनिश्चितता निर्माण केली आहे.

इतिहास आपल्याला गांभीर्याने विचार करायला लावतो. विल्सन यांच्या अनिच्छेने केलेल्या जागतिक युद्धातील प्रवेशाने त्यांना अपेक्षित असलेली शाश्वत शांतता मिळाली नाही. आदर्शवादाच्या मर्यादा आणि चुकीच्या अंदाजांचे धोके याबद्दलचे त्या काळातील धडे आजही तितकेच लागू होतात. तरीही, परिस्थिती सुधारण्यासाठी अजूनही एक छोटी संधी आहे. सध्याची विश्रांती, कितीही नाजूक असली तरी, मार्ग बदलण्याची संधी देते. खऱ्या अर्थाने तणाव कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, विश्वासार्ह वचनबद्धता आणि एकमेकांच्या हिताचा आदर करणे आवश्यक आहे. हेदेखील मान्य करावे लागेल की, मध्यपूर्वेतील स्थिरता बाहेरून लादली जाऊ शकत नाही; ती तिथे राहणाऱ्या लोकांमध्ये चर्चेतूनच निर्माण व्हावी लागेल.

अमेरिकेसाठी आव्हान केवळ विशिष्ट संघर्ष सोडवण्याचे नसून आपली भूमिका पुन्हा परिभाषित करण्याचे आहे. एकेकाळी अफाट लष्करी बळाद्वारे गाजवलेले वर्चस्व आता बहुध्रुवीय जगात कमी प्रभावी ठरत आहे. नेतृत्व हे केवळ शक्ती प्रदर्शनात नसून, सर्वांना एकत्र आणण्यात, मध्यस्थी करण्यात आणि प्रसंगी स्वतःवर ताबा मिळवण्यात असते.

इतिहासकार अरनॉल्ड जे. टॉयनबी यांनी म्हटल्याप्रमाणे, जग अनेकदा विनाश आणि निर्मितीच्या मार्गांमध्ये उभे असते. आजची मध्यपूर्वेची स्थिती हेच द्वंद्व दर्शवते. अमेरिकन धोरणांच्या या कोलांटीउडीने या दोन्ही शक्यता समोर आणल्या आहेत. यातून हेच शाश्वत सत्य समोर येते की, इतिहासाचे ओझे वाहणाऱ्या या प्रदेशात स्थिरतेसाठी कोणताही शॉर्टकट नाही केवळ मुत्सद्देगिरीचा दीर्घ आणि खडतर रस्ताच शिल्लक आहे.

–प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर

● वास्तव

## शिक्षणाच्या वाटेतील अडथळा

भारताने जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न उराशी बाळगले असून, तंत्रज्ञान आणि विकासाच्या क्षेत्रात आपण उत्तुंग भरारी घेत आहोत. मात्र, विकासाच्या या लखलखत्या चित्राच्या दुसऱ्या बाजूला एक विदारक वास्तव आजही कायम आहे. शाळांमध्ये साध्या आणि मूलभूत मानल्या जाणाऱ्या स्वच्छतागृहांच्या अभावामुळे आजही अनेक मुलींना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागत आहे. ही बाब आपल्या सामाजिक आणि प्रशासकीय मानसिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. स्वच्छ भारत आणि स्वच्छ विद्यालय यांसारख्या महत्त्वाकांक्षी मोहिमा राबवूनही जर जमिनीवरची परिस्थिती बदलत नसेल, तर या मोहिमांच्या यशाबद्दल साशंकता निर्माण होणे स्वाभाविक आहे.

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालातील आकडेवारी धक्कादायक आहे. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत २०२२-२३ या वर्षात मुलींसाठीच्या स्वतंत्र स्वच्छतागृहांच्या सुविधेत घट झाल्याचे समोर आले आहे. एकीकडे आपण 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'चा नारा देतो आणि दुसरीकडे शाळांमध्ये त्यांच्यासाठी किमान सुविधा उपलब्ध करून देऊ शकत नाही, हा विरोधाभास अस्वस्थ करणारा आहे. सरकारी कागदपत्रांवर शाळांमध्ये स्वच्छतागृहे बांधल्याची नोंद असेलही, पण प्रत्यक्ष पाहणी केल्यास यातील बहुतांश स्वच्छतागृहे वापरायोग्य नाहीत. अनेक ठिकाणी पाण्याची सोय नाही, तर कुठे स्वच्छतेचा पत्ता नाही. अशा अस्वच्छ आणि असुरक्षित वातावरणात मुलींनी शिक्षण कसे घ्यावे, हा मूळ प्रश्न आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला सर्वोच्च न्यायालयानेही या विषयाची गंभीर दखल घेतली होती. केंद्र आणि सर्व राज्य सरकारांना शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधण्याचे आणि तिथे पाणी व साबणाची उपलब्धता सुनिश्चित करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. न्यायालयाला अशा मूलभूत



गोष्टींसाठी हस्तक्षेप करावा लागतो, यातच प्रशासकीय यंत्रणेचे अपयश अधोरेखित होते. अहवालानुसार, गेल्या तीन वर्षांत या सुविधांमध्ये केवळ ०.३ टक्क्यांची वाढ झाली आहे. ही संथ गती प्रशासकीय अनास्था आणि सुस्तीचेच प्रतीक आहे. जर शौचालय नसल्यामुळे किंवा ते गलिच्छ असल्यामुळे मुलींच्या आरोग्यावर परिणाम होत असेल आणि पर्यायाने त्यांना शाळा सोडावी लागत असेल, तर हे शैक्षणिक प्रगतीमधील सर्वात मोठे अपयश मानले पाहिजे.

पाण्याचा अभाव आणि अस्वच्छतेमुळे संसर्ग होण्याचा धोका वाढतो, ज्यामुळे मुलींच्या उपस्थितीवर परिणाम होतो. या परिस्थितीला सर्वस्वी शाळेच्या देखरेखीची जबाबदारी असलेले अधिकारी आणि स्थानिक प्रशासन जबाबदार आहे. जोपर्यंत या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जात नाही, तोपर्यंत आकडेवारीतील ही घट थांबणार नाही.


● यशस्वीनी

## कॉर्पोरेटविश्वातून स्टार्टअपकडे...

कोलकाता येथील श्रुती कुंदन यांनी 'जेनपॅक्ट', 'टीसीएस' आणि 'ॲक्सेंटर' सारख्या नामांकित कंपन्यांमध्ये फायनान्स ॲनालिस्ट म्हणून काम केले. पण त्यांच्या मनात नेहमी एकच विचार असायचा, की सुट्टीसाठी मॅनेजरची परवानगी न घेता जगता येईल असा दिवस कधी येईल? अखेर २०२३ मध्ये त्यांनी या प्रश्नाचे उत्तर शोधले आणि 'बोहोलेट' या आपल्या स्टार्टअपची मुहूर्तमेढ रोवली.

सप्टेंबर २०२३ मध्ये श्रुती यांनी अवघ्या ११,००० रुपयांच्या भांडवलावर आपल्या घराच्या स्वयंपाकघरातून मेणबत्त्या बनवण्यास सुरुवात केली. त्यांनी बनवलेल्या 'लाडू'च्या आकाराच्या मेणबत्त्यांना महाराष्ट्रातील गणेशोत्सवा दरम्यान मोठी मागणी मिळाली आणि पहिल्या १०० मेणबत्त्या हातोहात विकल्या गेल्या. या यशाने त्यांचा आत्मविश्वास वाढला.

ऑक्टोबर २०२३ मध्ये त्यांना दुबईतून ७०० लाडू मेणबत्त्यांची ऑर्डर मिळाली. त्यावेळी त्यांच्याकडे केवळ १० साचे होते. ही ऑर्डर वेळेत पूर्ण करण्यासाठी त्यांनी दिवसरात्र कष्ट उपसले. ९,००० रुपयांच्या गुंतवणुकीतून त्यांना २०,००० रुपयांची कमाई झाली, ज्यामुळे त्यांच्या व्यवसायाला खऱ्या अर्थाने गती मिळाली. मेणबत्त्यांच्या व्यवसायात त्यांना एक मोठी अडचण जाणवली, ती म्हणजे चांगल्या दर्जाच्या पॅकेजिंग बॉक्सेसची उपलब्धता. मोठे पुरवठादार किमान २,००० बॉक्सेसची ऑर्डर मागत असत, जे छोट्या उद्योजकांसाठी कठीण होते. श्रुती यांनी हीच संधी ओळखली आणि कमी प्रमाणात



(किमान २० नग) पॅकेजिंग बॉक्सेस पुरवण्यास सुरुवात केली. आज त्यांच्या एकूण व्यवसायापैकी ८० टक्के महसूल याच पॅकेजिंग विभागातून येतो.

उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी त्यांनी ६.५ लाख रुपयांचे सेमी-ऑटोमॅटिक मशीन बसवले असून, त्याद्वारे दररोज २०,००० युनिट्स तयार केले जाऊ शकतात. आज त्यांच्या व्यवसायाची उलाढाल ५० लाख रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

● विशेष

## भूमिका घेणारे इतिहासकार!

मराठा इतिहास लेखनासाठी संपूर्ण जीवन समर्पित करणारे डॉ.जयसिंगराव पवार यांचे दुःखद निधन हे संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि इतिहास संशोधन क्षेत्रासाठी धक्कादायक आहे कारण ते आयुष्याच्या या टप्प्यावर शिवचरित्र लेखन करत होते. त्या चरित्राचा कांही भाग लिहिला आहे. त्यांची इतिहास संशोधन क्षेत्रातील प्रदीर्घ तपश्चर्या पाहता एक महत्त्वपूर्ण शिवचरित्र मिळणार होते अशा टप्प्यावर त्यांचे निधन हे फारच वेदनादायी आहे.

तडसर सारख्या दुष्काळी गावात त्यांचा जन्म झाला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी उच्च शिक्षण घेतले. सरकारी नोकरीचा त्याग करून शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ.आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी मराठा इतिहास संशोधनासाठी झोकून दिले. कुलगुरूसारखे पद सहज मिळत असताना त्याची अभिलाषा न बाळगता मराठा इतिहास संशोधन आणि लेखनाचे काम त्यांनी आयुष्यभर केले.

मराठा इतिहासातील अनेक क्लिष्ट विषयांवर त्यांनी भाष्य केले. इतिहास संशोधक म्हणून अनेक वादग्रस्त बाबींवर त्यांनी भूमिका घेतली पण याप्रसंगी त्यांनी संयमी आणि विवेकी भाषा वापरली. मतभेदापलीकडे त्यांनी मैत्री जपली. कोणाबद्दलही आकस ठेवला नाही. वैचारिक क्षेत्रातील आपले विरोधक आपले दुश्मन नसतात ही त्यांची भूमिका होती. कोणत्याही पुरस्काराची अभिलाषा न बाळगता त्यांनी संशोधन आणि लेखनाचे काम केले.

डॉ.जयसिंगराव पवार मोठ्या मनाचे



अभ्यासक होते. नवीन संदर्भ हाती आल्यानंतर आपल्या जुन्या मताचे खंडन करून इतिहासाची पुनर्मांडणी करण्यासाठी प्रामाणिकपणा, हिंमत आणि जिज्ञासू वृत्ती असावी लागते ती त्यांच्याकडे होती. त्यामुळेच त्यांनी दादोजी कोंडदेव आणि रामदास हे शिवाजी महाराजांचे गुरू नव्हते असे ठामपणे संदर्भासह मांडले. गेली चाळीस वर्षे महाराष्ट्रात इयत्ता चौथीला शिकविले जाणारे शिवचरित्र याचे पुनर्लेखन डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले. ते भूमिका घेणारे इतिहासकार होते.

महाराष्ट्राच्या जनमानसावर इतिहासाबाबत कथा, कादंबरी, नाटक, चित्रपट आणि कविकल्पनांचे मोठे गारुड होते. अशा पार्श्वभूमीवर डॉ.जयसिंगराव पवार यांनी कागदपत्रांच्या आधारे निःपक्षपातीपणे इतिहासाची मांडणी केली. छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाचे पुनर्लेखन करणारा महाग्रंथ त्यांनी संपादित केला. त्यामध्ये त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्रावर भाष्य लिहिले. प्रवाहपतीत न होता त्यांनी इतिहासाची मांडणी केली. कठीण काळात छत्रपती राजाराम महाराज यांनी स्वराज्य रक्षणाचे केलेले कार्य यावर त्यांनी महाग्रंथ लिहिला.


वा.सी.बेंद्रे,ग.ह.खरे, सेतुमाधव पगडी, डॉ. आप्पासाहेब पवार यांच्याप्रती सतत कृतज्ञता बाळगत त्यांनी इतिहास संशोधनाचे काम पुढे नेले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा सत्य इतिहास पुढे आणण्याचे कार्य डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले. सुमारे तीस वर्षांपूर्वी शाहू महाराजांच्या बद्दल अपप्रचार खूप झाला होता. त्याचे खंडन करून त्यांनी राजर्षी शाहू महाराजांचे चरित्र गावोगावी पोहोचवले. विशेषतः जगातील महत्त्वाच्या भाषांत त्यांच्या शाहू चरित्राचा अनुवाद झालेला आहे.

डॉ. जयसिंगराव पवार हे प्रागतिक विचारांचे होते. ते पक्षपाती नव्हते. त्यांनी कोणत्याही इजमसाठी काम केले नाही. इजमसाठी लिहिलेला इतिहास हा सार्वकालिक नसतो असे ते नेहमी म्हणत. महाराणी ताराराणीचे चरित्र गावोगावी जाऊन प्रत्येक घरातील मुलगी निर्भीड आणि कणखर झाली पाहिजे असे ते म्हणत असत. त्यांचे प्रदीर्घ मार्गदर्शन नव्या पिढीला लाभले. त्यांना आपल्या विद्वतेचा, अफाट कार्याचा यत्किंचितही अहंकार नव्हता. अतिव कर्तुत्वातून येणारा हटवाद त्यांच्याकडे नव्हता. डावा-उजवा असा भेदभाव त्यांनी कधी केला नाही. त्यामुळे त्यांनी सर्व गटातील लोकांना मोठ्या मनाने मार्गदर्शन केले.मी सरांना म्हणालो होतो की सर तुमचा शंभरावा वाढदिवस साजरा करायचा आहे तेंव्हा सर म्हणाले,शिवचरित्र लिहिण्यापुरते आयुष्य मिळावे एवढीच इच्छा आहे. डॉ.पवार सर इतिहासासाठी लढले आणि इतिहास लेखनासाठी जगले.

– डॉ. श्रीमंत कोकाटे,
इतिहास अभ्यासक

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**रविवार,ता.२९.३.२०२६** विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवहन शके १९४८, परामव नामसंवत्सरे,उत्तरायणे, वसंत ऋतो, चैत्र मासे, शुक्ल पक्षे, एकादशी तिथी,७.४७ नंतर द्वादशी तिथी, आश्लेषा नक्षत्र, १४.३९ नंतर मघा नक्षत्र, कर्क रास,१४.३९ नंतर सिंह रास,धृति योग, विष्ठी करण ७.४७ नंतर, बव करण १९.२६ पर्यंत,दिनमान १२.०८, सुर्योदय ६.३४, सुर्यास्त १८.४२(कोल्हापूरचे) राहू काळ सायं ४.३० ते ६,कामदा एकादशी, श्रीकृष्ण दोलोत्सव, श्री शंभू महादेव यात्रा शिंगणापूर, दुपारी २.३० नंतर फक्त विवाहास.

**–ज्यो:केशव पेटकर महाराज–९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**–तुमच्या अविचारी वागणुकीमुळे तुमच्या एखाद्या मित्राला तुम्ही अडचणीत टाकाल. गुंतवणूक करणे बऱ्याच वेळा तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल.

**वृषभ**–नातेवाईकांबरोबरील हास्यविनोदाने तुमच्या मनावरील दडपण हलके होईल.कोणतेही काम करण्याआधीच चांगल्या आणि वाईट परिणामांचा विचार करू नका.

**मिथून**– अडचणीवर मात कराल. तुमच्या कार्यक्षमतेने आणि चिकाटीने महत्वाची कामे पूर्ण होतील. तुमचे कौतुक करणारे अनेकजण असतील.

**कर्क**–कामानिमित्त खाजगी कार्यक्रमांना जाण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.तुमच्या बोलण्याच्या कौशल्यामुळे इतरांना सहजपणे आकर्षित करून घ्याल.

**सिंह**–तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. तुमच्या अडचणीच्या वेळी मित्र मदतीला धावून येतील. तुमच्या नात्यातल्या सगळ्या तक्रारी आज निघून जातील.

**कन्या**–महत्वाच्या कामात वडिधाऱ्यांचा सल्ला घ्या. कुणी नातेवाईकाच्या येण्याने घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल. कलात्मक गुणांना वाव मिळेल.

**तुळ**–तुमचे ज्ञान आणि विनोदबुद्धी यामुळे तुमच्या अवतीभवतीचे लोक प्रभावित होतील.कामानिमित्त प्रवास घडेल त्यामुळे नवीन महत्त्वाचे संबंध प्रस्थापित होतील.

**वृश्चिक**–अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित कामे पूर्ण होतील. वरिष्ठांकडून कौतुकाची थाप मिळेल ज्याची तुम्ही आतुरतेने वाट पाहत होतात.

**धनु**–आज तुम्हाला कुणी अज्ञात स्रोताने पैसा प्राप्त होऊ शकतो ज्यामुळे तुमच्या बऱ्याच आर्थिक समस्या दूर होतील. खाजगी आणि गोपनीय माहिती अजिबात उघड करू नका.

**मकर**–कलात्मक काम तुम्हाला आराम मिळवून देईल. जुन्या गुंतवणुकीतून आज तुम्हाला उत्तम नफा होऊ शकतो. कुटूंबात खेळीमेळीचे वातावरण राहील.

**कुंभ**–तुमच्या संकल्पना अपयशी ठरणार नाहीत.धनाचे आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते. आरोग्य चांगले राहील.

**मीन**–आज तुम्ही सहभागी झालेल्या कार्यक्रमात तुम्ही आकर्षणबिंदू ठराल. रिकाम्या वेळात आज काही रचनात्मक कार्य करू शकतात.आर्थिक जीवनात आज आनंद राहील.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप-पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.



## नाम. हसन मुश्रीफ यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्री वृद्धाश्रमात फळे वाटप

भोगावती,ता.२८(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री नामदार हसन मुश्रीफ यांच्या वाढदिवसानिमित्त कोल्हापुरातील मातोश्री वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांना अभिषेक डोंगळे युवाशक्तीच्या वतीने फळे वाटप करण्यात आली. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अभिषेक डोंगळे आणि जिल्हा परिषद सदस्य अमृता डोंगळे यांनी या समाजोपयोगी उपक्रमासाठी पुढाकार घेऊन आयोजन केले होते.**

मंत्री मुश्रीफ यांचा वाढदिवस साधेपणाने आणि समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. यानुसार, डोंगळेनी वृद्धाश्रमातील आजी–आजोबांना फळे वाटप केली आणि काही वेळ त्यांच्यासोबत व्यतीत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. युवाशक्तीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम नेहमीच राबविण्यात येत असून अशा उपक्रमात युवापिढीने सक्रिय सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी अभिषेक डोंगळे यांनी केले. यावेळी अभिषेक डोंगळे, अमृता डोंगळे,राणी पाटोळे, राजेंद्र मालवेकर, युवाशक्तीचे अध्यक्ष सुहास डोंगळे, उपाध्यक्ष पवन गुरव, अभिषेक पाटील, संग्राम डोंगळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## कांडगावात दोन शेजाऱ्यांमध्ये जुंपली परस्पर विरोधात करवीरमध्ये तक्रारी

कोल्हापूर ता.२८ (प्रतिनिधी)–

**आमच्या घरासमोर लावली गाडी काढा, गवताची व्हळी दुसरीकडे घाला असे सांगताना दोघा शेजाऱ्यांमध्ये चांगलीच जुंपली. एकमेकांना शिवीगाळ व काठीने बेदम मारहाण केली. गवताच्या व्हळीत घालून पेटवण्याची धमकीही यावेळी दिली. दोन्ही बाजूने परस्पर विरोधात तक्रारी दाखल झाल्या आहेत.**

या मारहाणीत सविता मारुती संकपाळ (वय ४५ रा. कांडगाव) व त्याचे पती मारुती संकपाळ (वय ४८) हे दोघे जखमी झाले. सविता यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, २७ मार्च रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास माझे पती मारुती हे शेजाऱ्यांकडे गेले,त्यांनी शरद शिंदे यांना गवताची व्हळी व गाडी दारातून बाजला लावा असे सांगितले. तेव्हा सहा जणांनी त्यांना शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी व काठीने बेदम मारहाण केली. शरद याने तर तुला गवताच्या व्हळीत घालून पेटवतो अशी धमकी दिली. या प्रकरणी शरद भिकाजी शिंदे, विजय भिकाजी शिंदे, भिकाजी शिंदे, पवन शरद शिंदे, शिवानंद विजय शिंदे, सोलानी विजय शिंदे (रा. सर्व कांडगाव ता.करवीर) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

विजयकुमार भिकाजी शिंदे (वय ४२) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, संशयीत मारुती धोंडीराम संकपाळ व सविता संकपाळ या दोघांनी पत्नी सोनाली हिस शिवीगाळ केली.तसेच लोखंडी रॉडने डोक्यात,हातावर मारून जखमी केले. पोलीस निरीक्षक किशोर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पोलीस हेड कॉन्स्टेबल वायदंडे व कांबळे तपास करीत आहेत.



## सिलेंडर तुटवडा सुरळीत करा

### अन्यथा पालकमंत्र्यांच्या समोर आंदोलन

सांगली, ता. २८(प्रतिनिधी)–

**सांगली जिल्ह्यात गॅस सिलेंडर च्या विरोधात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि जनवादी महिला संघटनेच्या वतीने रिकामी सिलेंडर घेवुन शनिवारी स्टेशन चौकात जोरदार निदर्शने करण्यात आली.**

केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे आणि राज्य सरकारच्या दुर्लक्षतेमुळे संपुर्ण देशात, राज्यात सिलेंडरचा तुटवडा जाणवत आहे. हॉटेल व्यावसायिक संकटात सापडलेला आहे. यामुळे जनतेच्या दैनंदीन जीवनावर परिणाम होताना दिसत आहे. प्रशासन एका बाजुस सांगत आहे की, सिलेंडरची कमतरता नाही, पण दुसऱ्या बाजुस वस्तुस्थिती वेगळी दिसत आहे. गॅस एजन्सीजच्या दारात लांबच लांब रांगा आहेत.सत्ताधारी पक्षातील एक महिला आमदार मिडीया समोर चक्क खोट बोलताना दिसत आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सिलेंडर बुक केल्यानंतर पंचवीस दिवसानी मिळतो. नियमाविषयी त्या पुर्ण अनभिज्ञ आहेत.

प्रशासन आणी शासन यांनी यावर ताबडतोबीने यावर तोडगा काढावा. जनतेची फरफट थांबवावी, अन्यथा पालकमंत्र्यांसमोर रिकामी सिलेंडर्स घेऊन बसावे लागेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व उमेश देशमुख, रेहाना शेख, कोल्हे, रियाज जमादार, रवी खोत, उज्वला वाघमारे, लतीफा पेटकर, उत्तम जाधव यांनी केले.या आंदोलनात मोठ्या संख्येने महिला, पुरुष सहभागी झाले होते.





शिरोली औद्योगिक वसाहतीमधील येथील मेनन पिस्टन लि. या कंपनीत संरक्षण भिंत व झाड पार्किंग शेडवर कोसळून नुकसान झाले.

## शिरोली परिसराला वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने झोडपले

टोप,ता.२८(प्रतिनिधी)–

**शिरोली परिसराला शनिवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने झोडपून काढले. या नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका शिरोली औद्योगिक वसाहतीमधील येथील मेनन पिस्टन लिमिटेड या कंपनीत संरक्षण भिंत व झाड पार्किंग शेडवर कोसळून २५ लाखाचे नुकसान झाले.**

### झाड पार्किंग शेडवर कोसळून २५ लाखाचे नुकसान

शनिवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होऊन जोरदार वादळी वारे वाहू लागले. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, काही वेळातच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. या वादळाचा तडाखा मेनन पिस्टन कंपनीत कामगार व कंपनी स्टाफच्या दुचाकी गाड्यांवर संरक्षण भिंतीस मोठे झाड शेडवर कोसळ्याने यामुळे शेडखाली उभ्या असलेल्या अनेक कामगारांच्या दुचाकी गाड्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही गाड्यांचा चक्काचूर झाला असून कामगारांना मोठ्या आर्थिक फटका बसला आहे. घटना घडली तेव्हा पार्किंग परिसरात वर्दळ कमी होती, तसेच झाड पडल्याची चाहूल लागताच अनेकांनी सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. त्यामुळे या भीषण घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर दुखापत झाली नसल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, कंपनीचे पायाभूत नुकसान आणि कामगारांच्या वाहनांचे नुकसान पाहता, या आपत्तीचा मोठा आर्थिक फटका बसला आहे.

## शिरोळ : ९५ कि.मी.च्या ग्रामीण रस्त्यांना 'इतर जिल्हा मार्गाचा' दर्जा

### आम. राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या पाठपुराव्याला यश

जयसिंगपूर, ता. २७(प्रतिनिधी)–

**शिरोळ तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांना 'इतर जिल्हा मार्ग' म्हणून दर्जोनोती मिळाल्याने तालुक्याच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे. आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या माध्यमातून ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयाद्वारे संबंधित रस्त्यांच्या दर्जात बदल करण्यात आला आहे.**

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडून काढण्यात आलेल्या आदेशानुसार शिरोळ तालुक्यातील विविध ग्रामीण मार्गांचा 'इतर जिल्हा मार्ग' म्हणून समावेश करण्यात आला आहे. या निर्णयामुळे संबंधित रस्त्यांच्या दुरुस्ती, मजबुतीकरण आणि विकासकामांसाठी अधिक निधी उपलब्ध होणार असून वाहतुकीची सुविधा सुधारण्यास मदत होणार आहे.

या ग्रामीण रस्त्यांसाठी अगोदर राज्य शासनाचा निधी मिळत नसल्याने रस्त्यांचा विकास होत नव्हता मात्र, आता या ९ रस्त्यांना दर्जोन्नती मिळाल्याने राज्य शासनाचा थेट निधी या रस्त्यांना मिळणार असून शिरोळ तालुक्यातील रस्ते मजबूत होणार आहेत. त्यामुळे तालुक्यातील पर्यटन विकासाला चालना, शेतकरी, उद्योग व्यवसाय आणि नागरिकांना मोठा या रस्त्यांचा लाभ होणार आहे.

शिरोळ – घालवाड ते प्रमुख जिल्हा मार्गाला जोडणारा रस्ता, प्रमुख जिल्हा मार्ग ते हसूर, बनवाडी, कनवाड ते म्हैशाळ धरणाकडे जाणारा रस्ता, दत्तवाड पिरकुरण टाकळीवाडी ते हेरवाड श्री संतुबाई नदी पाणवठा रस्ता, राज्य मार्ग १४२ ते आगर – शिरोळ – घालवाड एमएससीबी शिरटी ते नृसिंहवाडी रस्ता, हेरवाड, लाटवाडी ते आयको सूतगिरणी रस्ता, टाकवडे इतर जिल्हा मार्ग ४४ ते इतर जिल्हा मार्ग ४३ दत्त सोयाबीन प्रकल्प ते हरोली प्रमुख जिल्हा मार्ग ३१ ला मिळणारा रस्ता, दत्तवाड हद्द दड्डी जुने दानवाड, नवे दानवाड, टाकळीवाडी, मजरेवाडी प्रमुख जिल्हा मार्ग १०२ ला मिळणारा रस्ता, दानोळी धनवडे वसाहत, उमळवाड, उदगाव ते दत्त साखर कारखाना रस्ता एकूण ९५.१५ किलोमीटरच्या रस्त्यांना इतर जिल्हा मार्गाचा दर्जा मिळाला आहे.

या निर्णयामुळे पावसाळ्यात होणारी गैरसोय कमी होऊन ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुकर होणार आहे.

आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी सांगितले की, शिरोळ तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांची अवस्था सुधारण्यासाठी आम्ही सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा केला. या रस्त्यांना 'इतर जिल्हा मार्ग' दर्जा मिळाल्याने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होऊन दर्जेदार रस्ते उभारता येतील. तसेच ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटीबद्ध असल्याचे सांगितले. इतर जिल्हा मार्ग म्हणून दर्जा मिळालेल्या या रस्त्यांपैकी काही रस्ते प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जा मिळावा यासाठी ही प्रयत्न करणार आहे .जेणेकरून राज्य शासनाकडून या रस्त्यांना आणखी जास्त निधी आणण्यासाठी सोयीचे होईल.दरम्यान येणाऱ्या काळात या रस्त्यांच्या प्रत्यक्ष कामांना गती मिळून तालुक्याचा विकास अधिक वेगाने होईल.

## युडीआयडी कार्ड नसल्यास अनुदान धोक्यात येणार

शिराळा,ता.२८(प्रतिनिधी)–

**सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या शासन निर्णयानुसार विशेष सहाय योजनांतील लाभार्थ्यांना आधार कार्ड संबंधित योजनेशी तीन महिन्यांच्या आत संलग्न करणे बंधनकारक करण्यात आले आहे.लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन तहसिलदार शामला खोत–पाटील यांनी स्पष्ट केले आहे.**

त्यांनी सांगितले की, १५ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार विशेष सहाय योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांना मिळणारे मासिक अर्थसहाय १५००/– रुपयांवरून २५००/– रुपये करण्यात आले आहे हे अर्थसहाय डीबीटी पोर्टलद्वारे थेट लाभार्थ्यांच्या आधार सलग्न बँक खात्यात जमा केले जाते. दिव्यांगासाठी असलेल्या विविध योजना, सवलती व शासकीय लाभांचा फायदा घेण्यासाठी सर्व दिव्यांगाना वैश्विक ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे.

शिराळा तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थी यांनी सदर योजनेच्या लाभार्थी यांनी त्यांचे युडीआयडी कार्ड आधार कार्डशी संलग्न करून आवश्यक कागदपत्रे ग्राम महसुल अधिकारी यांचेकडे जमा करावीत.

निर्धारित मुदतीत यूडीआयडी कार्ड व आधार कार्ड जमा न केल्यास पात्र लाभार्थ्यांचे अनुदान बंद होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. तालुक्यातील संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन तहसिलदार शामला खोत–पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

## वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात बालकांचे बळी; उच्च न्यायालयाचा संताप

### जबाबदार अधिकाऱ्याला हजर राहण्याचे निर्देश

चरण,ता.२८(वार्ताहर)–

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील चांदोली राष्ट्रीय उद्यानच्या बफर झोनमध्ये, विशेषतः शाहूवाडी आणि शिराळा तालुक्यातील गावांमध्ये वन्यप्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे निष्पाप बालकांचा बळी जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर उखळू येथील हरीश भीमराव कांबळे यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर शनिवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठ येथे महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने प्रशासनाच्या निष्काळजीपणावर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत कडक भूमिका घेतली.**

शनिवारी सकाळी साडेदहा वाजता याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, याचिका दाखल झाल्यानंतरही वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांत आणखी काही बालकांचा मृत्यू झाला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने हे प्रकरण नियमित कामकाजातून बाजूला काढत दुपारी अडीच वाजता 'आऊट ऑफ टर्न' स्वरूपात तातडीची सुनावणी घेतली.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती जामदार आणि न्यायमूर्ती पाटील यांच्या द्विसदस्यीय खंडपीठाने सरकारी यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त केला. ''स्वतःला त्या पीडित कुटुंबांच्या जागी ठेवून बघा. केवळ कागदी घोडे नाचवून चालणार नाही, तर लोकांचे जीव वाचवण्यासाठी प्रत्यक्षात कोणत्या ठोस आणि तातडीच्या उपाययोजना केल्या आहेत?'' असा थेट सवाल न्यायालयाने उपस्थित केला. या कठोर निरीक्षणामुळे प्रशासनावर तातडीने कृती करण्याचा दबाव वाढला आहे.

न्यायालयाने पुढील सुनावणी २ एप्रिल रोजी निश्चित करत सरकारी पक्षाला येत्या पाच दिवसांत सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच केवळ कागदोपत्री अहवाल न देता प्रत्यक्ष कृती आराखडा स्पष्ट करण्यासाठी संबंधित जबाबदार वरिष्ठ वनअधिकाऱ्याने न्यायालयात वैयक्तिकरित्या हजर राहण्याचे तोंडी निर्देश देण्यात आले आहेत.

या प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. रविराज बिर्जे, ॲड. योगेश सावंत, ॲड. सिद्धी दिवाण आणि ॲड. कार्तिक पाटील यांनी प्रभावी बाजू मांडली. वाढत्या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आता संपूर्ण लक्ष २ एप्रिल रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे लागले आहे.

## कर्नाटकात १५३ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी मुख्यमंत्री पदक जाहीर

### निपाणीत सेवा बजाविलेल्या सत्यनायक,हाडकरांचा समावेश

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

**कर्नाटक पोलीस दलात असाधारण सेवा आणि कार्यक्षमता दाखवणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी २०२५ सालचे मुख्यमंत्री पदक जाहीर करण्यात आले आहे.**



संतोष सत्यनायक



कुमार हाडकर

जन्मठेपेची शिक्षा झालेल्या माजी खासदार प्रज्वल रेवण्णा यांच्यावरील बलात्कार प्रकरणाच्या तपासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महिला आयपीएस अधिकारी सुमन डी. पन्नेकर यांच्यासह सहा आयपीएस अधिकाऱ्यांसह १५३ पोलीस अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये निपाणी येथे फौजदार व पोलीस निरीक्षक म्हणून काम केलेले व सध्या मार्केट विभाग बेळगांवचे एएसपी संतोष सत्यनायक, व निपाणीत फौजदार म्हणून काम केलेले कुमार हाडकर यांचा समावेश आहे.

राज्य सरकारने शुक्रवारी पोलीस दलाने पाठवलेल्या पात्र पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. आदेशात म्हटले आहे की, पदक प्रदान सोहळा २ ऑगस्ट रोजी बंगळूरु येथे आयोजित केला जाईल.पदक प्रदान करण्यात आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या पदक प्रदान सोहळ्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे: बेल्लारीचे एसपी डॉ. सुमन डी. पन्नेकर, उडुपीचे एसपी डॉ. के. अरुण, यादगीरचे एसपी पृथ्वी शंकर, बंगळूरु वाहतूक दक्षिणचे डीसीपी डॉ. गोपाल एम. बायकोडा, हसनचे एएसपी–१ एम. के. थम्मैया, शिवमोग्गाचे एएसपी–२ एस. रमेश कुमार आणि एकूण १२ डीवायएसपी. मुख्यमंत्री पदकासाठी १५३ पोलीस अधिकारी पात्र आहेत.

प्रज्वल रेवण्णा यांच्यावरील बलात्कार प्रकरणी सरकारने सीआयडीचे एडीजीपी बी. के. सिंग यांच्या नेतृत्वाखाली एक एसआयटी टीम स्थापन केली होती. या टीममध्ये आयपीएस अधिकारी सुमन डी. पन्नेकर आणि सीमा लाटकर यांचाही समावेश होता. या प्रकरणात न्यायालयाने प्रज्वल रेवण्णा यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.त्यानंतर महिला अधिकाऱ्यांच्या तपासाचे कौतुक झाले होते. आता, एसआयटी टीमचा भाग असलेल्या सुमन पन्नेकर यांना मुख्यमंत्री पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.

## जिल्हा कारागृहात दोघांना टोळक्याची मारहाण; १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

सांगली, ता. २८(प्रतिनिधी )–

**शहरातील जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध गुन्हेगार पवन धर्मेंद्र साळुंखे (वय २८) आणि त्याचा साथीदार मेघशाम उर्फ मोठ्या अशोक जाधव (वय ३०) या दोघांना कारागृहातील १६ जणांच्या टोळक्याने पाठलाग करून विटा फेकून मारहाण केली. शुक्रवारी सकाळी कारागृहातील मोकळ्या मैदानात हा प्रकार घडला. त्यामुळे कारागृहातील कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली. याबाबत जखमी पवन साळुंखे याने १६ जणांविरुद्ध सांगली शहर पोलिसात फिर्याद दिली आहे.**

### कारागृह पोलिसांची धावपळ उडाली

दोघांना मारताना झालेली शिवीगाळ आणि आरडाओरड पाहून कारागृहातील पोलिसांनी शिट्ट्या वाजवून इतरांना मदतीसाठी बोलवले. तत्काळ पोलिसांनी घटनास्थळी येऊन जखमी आणि संशयितांना बाजूला केले. सर्वांना तातडीने बराकीत बंद केले. जखमी पवन याच्यावर उपचार करण्यात आले. उपचारानंतर रात्री त्याने शहर पोलिसात फिर्याद दिली.

पोलिसांनी संशयित संजय ईश्वर गडदे, आदित्य धनराज पवार, करण महादेव गायकवाड, नितिन वसंत दुधाळ, प्रशांत पंकज भगत, गणेशनिहाल आसिफ बावा, विनायक उत्तम सूर्यवंशी, अथर्व किशोर शिंदे, अनामी अविनाश कांबळे, तुषार संजय जीजरुडे, तेजस संजयसिंह राजपूत, निखिल अनिल यादव, तन्वीर हारुण जमादार, श्रीकांत दुर्योधन ढगे, रमेश मुकेश जाधव आणि राहुल विठ्ठल चव्हाण (सध्या सर्व रा.सांगली जिल्हा कारागृह) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी पवन साळुंखे हा पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. जिल्हाधिकारी यांनी त्याला एमपीडीए कायद्यांतर्गत एक वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे, तसेच त्याचा साथीदार मेघशाम उर्फ मोठ्या जाधव हाही कारागृहात आहे. या दोघांना सुरक्षेच्या कारणास्तव स्वतंत्र बराकीत ठेवण्यात आले आहे. संशयित १६ जण वेगवेगळ्या गुन्ह्यातील संशयित आहेत. ते वेगळ्या बराकीत आहेत. शुक्रवारी सकाळच्या सुमारास कारागृहातील मोकळ्या जागी सर्वांना आणले होते. त्यावेळी संशयितांनी पवन साळुंखे आणि मेघशाम जाधव यांना उद्देशून, 'तुम्हा दोघांना मस्ती आली आहे. विभक्त कोठडीत असल्याने स्वत:ला शहाणे समजता काय,' असे म्हणून शिवीगाळ केली. त्यावरून त्यांच्यात खटका उडाला. दोन्हीकडून एकमेकांना शिवीगाळ सुरू असताना संशयित आदित्य पवार याने साथीदारांना ओरडून दोघांना मारा, असे सांगितले. त्यामुळे इतर संशयित दोघांच्या अंगावर धावून गेले. दोघांना लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली.

हल्ल्यात जखमी झालेले दोघे जण पळून जाऊ लागले, तेव्हा संशयित आदित्य पवार, करण गायकवाड, नितीन दुधाळ यांनी हातातील विटा फेकून मारल्याने पवन याच्या डोक्यात, हातावर, पायावर लागून तो गंभीर जखमी झाला.

## पोहायला गेलेल्या युवकाचा बुडून मृत्यू

कराड,ता.२८(प्रतिनिधी)–

**आगाशिवनगर (मलकापूर) ता. कराड परिसरात कोयना नदीपात्रात पोहायला गेलेल्या मुलाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. निलेश रोहित काटवटे (वय १६) असे नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे. याबाबत कराड शहर पोलीस ठाण्यात खबर देण्यात आली आहे.**

निलेश काटवटे हा मित्रांसोबत आगाशिवनगर येथे कोयना नदीत जॅकवेल शेजारी पोहण्यासाठी गेला होता. तो अचानक खोल पाण्यात जाऊन बुडाला. ही बाब लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी शोधमोहीम राबवली. दुपारी दिड वाजण्याच्या सुमारास त्याला पाण्यातून बाहेर काढण्यात यश आले. त्याला कराड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

## मिरज मतदारसंघासाठी १६२ कोटींचा भरीव निधी मंजूर

### आ. डॉ. सुरेशभाऊ खाडे

मिरज,ता.२८ (प्रतिनिधी)–

**मिरज विधानसभा मतदारसंघातील विकास कामासाठी १६२.४८ कोटींचा भरीव४ निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार डॉ. सुरेशभाऊ खाडे यांनी दिली. महाराष्ट्र राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर मिरज येथील जनसंपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी हा तपशील जाहीर केला.**

मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी हा निधी मंजूर करण्यात आला असून रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण तसेच शहरी भागातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

या निधीतून राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्यांचे रुंदीकरण व सुधारणा यासाठी २५ कोटी, मौजे लिंगनूर येथील श्री यल्लमा देवी मंदिर परिसर विकासासाठी (भक्तनिवास, सभामंडप, पेव्हिंग ब्लॉक, रस्ते, रोषणाई) २ कोटी ९५ लाख २५ हजार ४०७, मिरज शहरातील किसान चौक येथे १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालय उभारणीसाठी ४६ कोटी ७३ लाख ७६ हजार ६३१ (कामास लवकरच सुरुवात), कृष्णा–कोयना उपसा सिंचन (म्हैसाळ योजना) वंचित क्षेत्रासाठी ४७ कोटी ४१ लाख ४२ हजार, बनेवाडीभोसे पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा योजनेसाठी १३ कोटी ९३ लाख ८७ हजार, मालगाव, टाकळी, बोलवाड, बेडग, नरवाड, म्हैसाळ व वड्डी या सात गावांच्या सर्व्हेसाठी ८४ लाख ३१ हजार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथे नर्सिंग महाविद्यालय व वसतिगृहासाठी २३ कोटी ६० लाख १५ हजार, तसेच नागरी दलितेतर योजनेअंतर्गत रस्ते विकास कामांसाठी १ कोटी ९९ लाख इतका निधी खर्च केला जाणार आहे.

या सर्व विकासकामांमुळे मिरज मतदारसंघातील मूलभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा होणार असून नागरिकांना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध होणार असल्याचा विश्वास आमदार डॉ. सुरेशभाऊ खाडे यांनी व्यक्त केला.

कोट्यवधी रुपयाचा विकास निधी मिरज मतदार संघासाठी मिळाला आहे, त्यामुळे ज्यांना कुणाला याबाबत शंका वाटते त्यांनी याची खात्र जमा करावी.

सर्व मंजूर निधी बाबतचा जीआर आपल्याकडे उपलब्ध आहे, असेही आमदार सुरेश भाऊ खाडे यांनी यावेळी सांगितले.मिरज पंचायत समितीमध्ये भाजपचे संख्याबळ असताना सुद्धा चुकीच्या पद्धतीने निवड झाली. याबाबत खेद व्यक्त केला.

याबाबत संबंधित विभागामार्फत चौकशी सुरू आहे. मिरज पंचायत समितीमध्ये भाजपचा सभापती होईल, असा दावाही आमदार सुरेश भाऊ खाडे यांनी केला आहे.

## कारगाडीतून रोकड लंपास

सांगोला,ता.२८(प्रतिनिधी)–

**बिस्कीट विक्रीसाठी आलेल्या व्यापाऱ्याच्या कारगाडीतुन सुमारे ४८ हजार ५०० रुपये असलेली बॅग अज्ञात चोरट्याने लंपास केली असल्याची घटना जुनोनी (ता. सांगोला) येथे घडली आहे.**

याप्रकरणी तेजस चंद्रकांत यवगे यांनी सांगोला पोलीसात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्याकडे बिस्कीट एजन्सी असून ब्रिजा गाडीतून आसपासच्या गावात फिरून बिस्कीट विक्री करतात.फिर्यादी हे करगणी गावातुन कारमध्ये वेगवेगळी बिस्कीटे करगणी, कोळा, जुनोनी येथील किराणा दुकान तसेच बेकरी दुकानात विक्रीसाठी निघाले होते. करगणी, कोळा येथे बिस्कीट विक्री करून सुमारे ४८ हजार ५०० रुपये जमा झाले होते. सदरचे पैसे कारगाडीत पाठीमागील बाजुस एका बॅगमध्ये ठेवले होते.

# आरसीबीचा 'विराट' शो! हैदराबादवर विक्रमी विजय

**बेंगळुरु,ता.२८–**

**आयपीएलचा पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि सनरायझर्स हैदराबादमध्ये सुरु आहे. या सामन्याचे नाणेफेक हे बेंगळुरुने जिंकले आणि प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादची सुरुवात चांगली झालेली दिसली नाही. फक्त एकटा इशान किशन लढला. इशानच्या ८० धावाच्या खेळीच्या जोरावर हैदराबादने २०१ धावा केल्या आणि बेंगळुरुला २०२ धावांचे लक्ष्य दिले.**



आरसीबी लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीने २६ चेंडू शिल्लक असताना ६ विकेट्सने सामना जिंकला. सनरायझर्स हैदराबादने नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ९ गडी गमावून २०१ धावा केल्या. कर्णधार इशान किशनने ३८ चेंडूंमध्ये ८ चौकार आणि ५ षटकारांसह ८० धावांची स्फोटक खेळी केली. अनिकेत वर्माने १८ चेंडूंमध्ये ४३ धावा केल्या, तर हेनरिक क्लासेनने ३१ धावा केल्या. दरम्यान, आरसीबीसाठी जेकब डफीची गोलंदाजी प्रभावी ठरली, त्याने ४ षटकांत केवळ २२ धावा देऊन ३ बळी घेतले. रोमेरो शेफर्डनेही ३ बळी घेतले. जयदेव उनाडकट आणि हर्ष दुबे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

प्रत्युत्तरात, आरसीबीची सुरुवात डळमळीत झाली, परंतु देवदत्त पडिक्कलला इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळवण्याचा निर्णय योग्य ठरला. जेकब डफीच्या जागी आलेल्या पडिक्कलने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करत शानदार कामगिरी केली. त्याने अवघ्या २६ चेंडूंमध्ये ७ चौकार आणि ४ षटकारांसह ६१ धावा केल्या.

विराट कोहलीने ५ चौकार आणि ५ षटकारांसह ३८ चेंडूंमध्ये नाबाद ६९ धावा केल्या. कर्णधार रजत पाटीदारनेही १२ चेंडूंमध्ये ३१ धावांची आक्रमक खेळी केली. परिणामी, आरसीबीने अवघ्या १५.४ षटकांत ४ गडी गमावून २०३ धावा करत ६ गडी राखून लक्ष्य गाठले. हा विजय विशेष होता कारण आरसीबीने आयपीएलमध्ये पहिल्यांदाच एसआरएचविरुद्ध १९०+ धावांचे लक्ष्य यशस्वीपणे पार केले.

विराटने आजच्या सामन्यात हैदराबादच्या अनिकेत वर्माचा कॅच आधी सोडला पण नंतर मात्र त्याचाच कॅच घेण्यात त्याला यश मिळाले.




### विराट कोहली आशियाचा नवा सम्राट!

किंग कोहली आता सम्राट बनला आहे. सनरायझर्स हैदराबाद सामन्यात शानदार नवा विक्रम आपल्या भारताचा आणि

आशियाचा नवा आरसीबी आणि यांच्यातील फटकेबाजी करत नावे केला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा किंग कोहली आता आशियाचा सम्राट बनला आहे. विराट कोहलीने आयपीएल २०२६ मधील पहिल्याच सामन्यात २९ धावांचा पल्ला गाठत नवा विक्रम आपल्या नावे केला आहे. आरसीबीने सामन्याची नाणेफेक जिंकत हैदराबादला फलंदाजीसाठी पाचारण केलं. हैदराबादने संघाला २०२ धावांचे लक्ष्य दिले, पण देवदत्त पडिक्कल आणि विराटने वादळी फटकेबाजी केली आणि यादरम्यानच विराटने नव्या विक्रमाला गवसणी घातली.



# धोनी पहिल्या दोन आठवड्यांसाठी संघाबाहेर

**चेन्नई,ता.२८ –**

**महेंद्रसिंग धोनी आयपीएल २०२६ च्या पहिल्या दोन आठवड्यांसाठी संघाबाहेर राहणार आहे. चेन्नई सुपर किंग्सने लीगच्या उद्घाटन दिनी, शनिवारी ही घोषणा केली. फ्रँचायझीने म्हटले आहे की, दुखापतीमुळे धोनी पहिल्या दोन आठवड्यांसाठी संघाबाहेर राहू शकतो. फ्रँचायझीने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यात म्हटले आहे की, धोनी पोटरीच्या स्नायूच्या ताणावर उपचार घेत आहे, ज्यामुळे तो आयपीएल २०२६ च्या पहिल्या दोन आठवड्यांत खेळण्याची शक्यता नाही.**

पाच वेळचा चॅम्पियन चेन्नई आपला पहिला सामना ३० मार्च रोजी गुवाहाटी येथे राजस्थान रॉयल्सविरुद्ध खेळणार आहे. यावर्षी ४५ वर्षांचा होणारा धोनी, सीएसके संघातील चार यष्टीरक्षकांपैकी एक आहे. त्याच्यासोबत संजू सॅमसन, कार्तिक शर्मा आणि उर्विल पटेल आहेत, ज्यांना राजस्थान रॉयल्सकडून संघात घेण्यात आले आहे. ऋतुराज गायकवाडने काही काळासाठी कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारल्याने, सीएसकेने संजू सॅमसनला संघात घेऊन आणि नवोदित यष्टीरक्षक-फलंदाज कार्तिक शर्मावर १४.२० कोटी रुपये खर्च करून आपले यष्टीरक्षणाचे पर्यायही मजबूत केले आहेत.

धोनी गेल्या काही वर्षांपासून गुडघ्याच्या दुखापतीशी झुंज देत आहे. असे असूनही, तो सीएसके संघात कायम राहिला आहे आणि २०२३ मध्ये संघाला पाचवे आयपीएल विजेतेपद मिळवून दिले आहे. चेपॉकमधील एका अलीकडील फॅन इव्हेंटमध्ये, धोनीने आपली ढासळती तंदुरुस्ती मान्य केली आणि ती आता खालावत असल्याचे सांगितले. धोनीने २७८ सामन्यांमध्ये २४२ डावांत ३८.३० च्या सरासरीने आणि १३७.४५ च्या स्ट्राइक रेटने ५,४३९ धावा केल्या आहेत. २४ अर्धशतकांचा यामध्ये समावेश आहे. तो या स्पर्धेच्या इतिहासातील सहावा सर्वाधिक धावा करणारा क्रिकेटपटू आहे. २७८ सामन्यांसह धोनी आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक सामने खेळणारा क्रिकेटपटू आहे.

पहिल्या दोन आठवड्यांत, चेन्नई आपला हंगामातील पहिला सामना राजस्थान रॉयल्सविरुद्ध खेळेल. तसेच, त्यांचा सामना पंजाब किंग्स (घरच्या मैदानावर), रॉयल चॅलेंजर्स बंगलोर (परदेशात) आणि दिल्ली कॅपिटल्स (घरच्या मैदानावर) यांच्याशीही होईल.

# मुंबई इंडियन्सला केकेआरचे आव्हान

**मुंबई,ता.२८–**

**क्रिकेटपटूंच्या दुखापतींमुळे संघर्ष करत असलेला कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) संघ रविवारी आयपीएल २०२६ मध्ये मुंबई इंडियन्सचा सामना करणार आहे. कागदावर आणि आकडेवारीनुसार मुंबईचा संघ मजबूत दिसत असला तरी, टी –२०हा असा खेळ आहे की कोणत्याही एका संघाला स्पष्ट दावेदार ठरवणे महागात पडू शकते. मुंबई आणि कोलकाता दोन्ही संघ गेल्या अनेक दिवसांपासून आयपीएलच्या १९व्या हंगामाची तयारी करत आहेत आणि वानखेडे स्टेडियमवर कोणता संघ आपल्या मोहिमेची सुरुवात विजयाने करतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.**

मुंबई इंडियन्सने २०१३ ते २०२० दरम्यान पाच वेळा विजेतेपद पटकावले होते. पण गेल्या काही वर्षांपासून त्यांना विजेतेपद मिळालेले नाही. यावेळी, ते आपले सहावे विजेतेपद जिंकण्याचे लक्ष्य ठेवतील आणि दमदार सुरुवात करण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाहीत. गेल्या वर्षी, हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील संघ क्वालिफायर २ मध्ये पंजाब किंग्सकडून पराभूत झाल्यानंतर तिसऱ्या स्थानावर राहिला होता. पण यावेळी मुंबई इंडियन्स पूर्णपणे तयार आहे.

रोहित शर्मा फॉर्ममध्ये परतण्यासाठी उत्सुक असेल. रोहित व्यतिरिक्त, त्याच्या संघात भारताचा टी-२० विश्वचषक विजेता कर्णधार सूर्यकुमार यादव, पांड्या, तिलक वर्मा आणि जसप्रीत बुमराह यांच्यासह अनेक स्टार क्रिकेटपटू आहेत. मुंबई इंडियन्सच्या संघात रायन रिकल्टन, शेर्फेन रूदरफोर्ड, कॉर्बिन बॉश, न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनर, विल जॅक्स, ए.एम. गझनफर आणि ट्रेंट बोल्ट यांच्यासह अनेक प्रभावी परदेशी क्रिकेटपटूही आहेत.बुमराह आणि बोल्ट यांची जोडी धोकादायक ठरू शकते. शार्दुल ठाकूर आणि दीपक चहर यांच्या रूपाने मुंबई इंडियन्सकडे दोन अनुभवी भारतीय गोलंदाज आहेत, तर नमन धीर पुन्हा एकदा फिनिशरची भूमिका बजावण्याचा प्रयत्न करेल, जी भूमिका त्याने गेल्या वर्षी पूर्णपणे सार्थ ठरवली होती.

मुंबईसमोरील सर्वात मोठे आव्हान प्लेइंग इलेव्हनमध्ये योग्य संयोजन शोधणे हे असेल. संघ सुरुवातीचे काही सामने जिंकण्यासाठी कटिबद्ध असेल, कारण अनेकदा मिळालेल्या चांगल्या सुरुवातीनंतर त्यांना आपली लय कायम ठेवण्यात अपयश आले आहे. मुंबईत खेळणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्स संघात कर्णधार अजिंक्य रहाणे आणि युवा अंगक्रिश रघुवंशी यांसारखे काही स्थानिक क्रिकेटपटू असतील पण त्यांचा गोलंदाजीचा मारा कमकुवत दिसत आहे, आणि मुंबई इंडियन्स याच संधीचा फायदा घेण्याचा प्रयत्न करेल.लिलावात केकेआरचा गोलंदाजीचा मारा आश्वासक वाटत होता, परंतु भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) निर्देशांनुसार, फ्रँचायझीने बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला संघातून वगळले. आकाश दीप आणि हर्षित राणा हे दोन भारतीय वेगवान गोलंदाज दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर झाले आहेत. झिम्बाब्वेचा वेगवान गोलंदाज ब्लेसिंग मुझारबानी प्रतिभावान आहे, परंतु तो दबावाखाली असू शकतो. परिणामी, टी-२० विश्वचषकात निराशाजनक कामगिरी करणाऱ्या वरुण चक्रवर्तीवर गोलंदाजी विभागाची मोठी जबाबदारी असेल. केकेआर संघात सीएसकेचे दोन माजी क्रिकेटपटू, रचिन रवींद्र आणि मथिशा पाथिराना यांचाही समावेश आहे. यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून टिम सायफर्ट हा एकमेव सलामीचा पर्याय आहे, तर त्यांच्याकडे कॅमेरॉन ग्रीन आणि सुनील नरेन यांच्या रूपात दोन उत्कृष्ट अष्टपैलू क्रिकेटपटूही आहेत. त्याचबरोबर, संघात फिन ॲलनच्या रूपात एक चांगला फलंदाजही आहे.पाच वेळचे चॅम्पियन मुंबई इंडियन्स आणि केकेआर यांच्यात आतापर्यंत ३५ सामने झाले असून, त्यात मुंबई इंडियन्सचे पारडे जड राहिले आहे. मुंबईने या संघाविरुद्ध २४ सामने जिंकले, तर केकेआरने केवळ ११ सामने जिंकले.



# बांगलादेशने आयपीएल प्रसारणावरील बंदी उठवली

**ढाका,ता.२८–**

**बांगलादेशने आयपीएल २०२६ च्या प्रसारणासाठी दार उघडले आहे. नवीन सरकारने अलीकडेच मुस्तफिजुर रहमान वादामुळे लादलेली आयपीएल प्रसारणावरील बंदी मागे घेतली आहे. नवनियुक्त माहिती आणि प्रसारण मंत्री झहिरुद्दीन स्वपन यांनी सांगितले की, बांगलादेशमध्ये आगामी आयपीएलच्या प्रसारणावर कोणतीही बंदी नाही. वास्तविक पाहता, बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला कोलकाता नाईट रायडर्स संघातून मुक्त करण्याच्या निर्णयामुळे सुमारे तीन महिन्यांपूर्वी बांगलादेश सरकारने देशात आयपीएलच्या प्रसारण आणि प्रसिद्धीवर अनिश्चित काळासाठी बंदी घातली होती.**

झहीर उद्दीन स्वपन म्हणाले, ''आयपीएलच्या प्रसारणासाठी आमच्याकडे कोणीही अर्ज केलेला नाही. आम्हाला राजकारण आणि खेळ यांची सरमिसळ करायची नाही. आम्ही याकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहू. जर कोणत्याही वाहिनीने आयपीएल प्रसारित करण्यासाठी अर्ज केला, तर आम्ही त्यावर सकारात्मक विचार करू.'' यापूर्वी, युवा आणि क्रीडा राज्यमंत्री अमीनुल हक यांनी सांगितले होते की, मागील अंतरिम सरकारने घातलेल्या बंदीनंतर ते आयपीएल प्रसारणासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी बोलतील.

स्वपन यांनी म्हटले की, ''आम्ही कोणालाही प्रसारण करण्यापासून थांबवणार नाही. जर स्टार स्पोर्ट्सला प्रसारण करायचे असेल, तर ते करू शकतात. जर आमच्या कोणत्याही चॅनलला प्रसारण करायचे असेल, तर आम्ही ते सकारात्मकतेने घेऊ, पण आम्ही कोणावरही सक्ती करणार नाही.'' बांगलादेश केबल ऑपरेटर्स असोसिएशनचे कार्यालयीन सचिव रेझाउल करीम लब्लू म्हणाले की, ते स्टार स्पोर्ट्सला आयपीएलचे प्रसारण करण्यापासून थांबवणार नाहीत, कारण त्यांना या संदर्भात कोणतेही सरकारी निर्देश मिळालेले नाहीत.

# गोल्फचा दिग्गज टायगर वूड्सला अटक



**फ्लोरिडा,ता.२८–**

**एका निवासी रस्त्यावर ''अति वेगाने'' जात असताना टायगर वूड्सच्या लँड रोव्हरची एका ट्रकशी टक्कर होऊन ती एका बाजूला उलटल्यानंतर, मद्यपान करून गाडी चालवल्याच्या संशयावरून त्यांना अटक करण्यात आली.**

मार्टिन काउंटीचे शेरीफ जॉन बडेनसिक यांनी सांगितले की, वूड्स गाडीतून रांगत बाहेर पडण्यात यशस्वी झाला आणि त्याला कोणतीही इजा झाली नाही. ''त्याच्यामध्ये नशेत असल्याची स्पष्ट चिन्हे दिसत होती,'' असे शेरीफ जॉन बडेनसिक म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की, तपासकर्त्यांचा असा विश्वास आहे की तो कोणत्यातरी ड्रग किंवा पदार्थाच्या प्रभावाखाली होता. त्यांनी पुढे सांगितले की, वूड्स ब्रेथलायझर चाचणीसाठी तयार झाला, ज्यात अल्कोहोलची कोणतीही चिन्हे दिसली नाहीत, पण त्याने युरिन चाचणीस नकार दिला, ज्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या घटनेवर प्रतिक्रिया देताना म्हटले, ''मला त्याच्याबद्दल खूप वाईट वाटते... तो माझा जवळचा मित्र आणि एक चांगला माणूस आहे, पण तो सध्या एका कठीण काळातून जात आहे.'' ट्रम्प यांनी गोल्फ जगताबाबत एक मोठी बातमी दिली. त्यांनी दावा केला की टायगर वूड्स पुढील महिन्याच्या मास्टर्स स्पर्धेत खेळणार नाही.

# मियामी ओपन २०२६ : यानिक सिनरचा अंतिम फेरीत प्रवेश

**मियामी, ता.२८ –**

**इटलीच्या जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या यानिक सिनरने मियामी ओपन २०२६ मध्ये शानदार कामगिरी करत जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हला पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला. आता विजेतेपदाच्या सामन्यात त्याचा सामना चेक प्रजासत्ताकच्या जिरी लेहेकाशी होणार आहे. सिनरने उपांत्य फेरीत झ्वेरेव्हचा ६-३, ७-६ (७/४) अशी मात केली. झ्वेरेव्हविरुद्धचा हा त्याचा सलग सातवा विजय होता. यासह, मास्टर्स १००० स्तरावर सलग सेट जिंकण्याचा सिनरचा विक्रम ३२ वर पोहोचला आहे.**

विम्बल्डन चॅम्पियन सिनरने यापूर्वी इंडियन वेल्सच्या उपांत्य फेरीत झ्वेरेव्हला हरवले होते आणि आता तो तीन वर्षांत आपले दुसरे मियामी ओपन विजेतेपद पटकावण्याच्या जवळ पोहोचला आहे. २०१७ मध्ये रॉजर फेडररनंतर सनशाईन डबल (इंडियन वेल्स आणि मायामी दोन्ही स्पर्धा जिंकणे) मिळवणारा पहिला टेनिसपटू बनण्याचे त्याचे ध्येय आहे.

दुसरीकडे, २१ व्या मानांकित लेहेकाने फ्रान्सच्या आर्थर फिल्सला एकतर्फी सामन्यात ६-२, ६-२ असे पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला. लेहेका संपूर्ण स्पर्धेत एकही सेट हरलेली नाही आणि ही त्याची पहिली एटीपी मास्टर्स १००० अंतिम फेरी असणार आहे. दरम्यान, सिनरविरुद्ध लेहेकाची कामगिरी खराब आहे. आतापर्यंत या दोघींमध्ये झालेले तिन्ही सामने सिनरने जिंकले आहेत, तर लेहेकाला एकही सेट जिंकता आलेला नाही. अनुभवी आणि फॉर्मात असलेल्या सिनरचा सामना युवा आणि आत्मविश्वासू लेहेकाशी होणार असल्याने, अंतिम सामना एक रोमांचक लढत होण्याची अपेक्षा आहे.





# बंगळुरू मैदान दोन मिनिट शांत

**बंगळुरु,ता.२८–**

**आयपीएल २०२६ हंगामाची दमदार सुरुवात शनिवार (२८ मार्च) रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामन्याने झाली. बंगळुरू येथे खेळल्या जाणाऱ्या या सामन्यात आरसीबीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.**

दरम्यान, सामन्यापूर्वी एक भावनिक क्षण पाहायला मिळाला. मागील वर्षी झालेल्या चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्या ११ चाहत्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी केएससीए आणि दोन्ही संघातील खेळाडूंनी दोन मिनिटांचे मौन पाळले. तसेच त्या दुर्दैवी घटनेत जीव गमावलेल्या चाहत्यांच्या स्मरणार्थ स्टेडियममधील ११ जागा प्रतिकात्मकरीत्या रिकाम्या ठेवण्यात आल्या. या हृदयस्पर्शी श्रद्धांजलीनंतर सामन्याला सुरुवात झाली. इतकेच नाही, आरसीबीसोबतच, सनरायझर्स हैदराबादच्या खेळाडूंनीही या सामन्यात हातावर काळी पट्टी बांधली होती.

# आर. अश्विन पुन्हा मैदानात उतरणार!

**नवी दिल्ली,ता.२८–**

**आर. अश्विनने आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि आयपीएलमधून निवृत्ती घेतली आहे. भारतीय क्रिकेट इतिहासातील महान गोलंदाजांपैकी एक मानला जाणारा अश्विन आता निवृत्तीनंतर पुन्हा एकदा मैदानावर पुनरागमन करताना दिसणार आहे.**



निवृत्तीनंतर तो बिग बॅश लीग खेळणार होता, परंतु दुखापतीमुळे त्याने त्यातून नाव मागे घेतले होते. आता तो अमेरिकेतील मेजर लीग क्रिकेट या स्पर्धेत खेळताना दिसणार आहे.

रविचंद्रन अश्विनला मेजर लीग क्रिकेटमधील सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्स या संघाने आपल्या ताफ्यात सामील करून घेतले आहे. तो २०२६ मध्ये खेळणार असून, या स्पर्धेत सहभागी होणारा तो भारताचा पहिला माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू ठरला आहे. ३९ वर्षीय अश्विन शेवटचा जुलै २०२५ मध्ये मैदानात दिसला होता. आता जूनमध्ये सुरू होणाऱ्या मेजर लीग क्रिकेटच्या माध्यमातून तो जवळपास एका वर्षानंतर पुन्हा क्रिकेटच्या मैदानात उतरणार आहे.

ईएसपीएनशी बोलताना अश्विन म्हणाला, अमेरिकेत राहणाऱ्या आशियाई लोकांकडून मिळणारे प्रेम पाहून मला येथे क्रिकेटसाठी मोठी संधी असल्याचे जाणवले. युवा खेळाडू आणि अमेरिकेत स्थायिक झालेल्या लोकांमध्ये या खेळाबद्दल दिसलेली ओढ पाहून मला मेजर लीग मध्ये खेळण्याची प्रेरणा मिळाली.

अश्विनचा टी-२० क्रिकेटमधील रेकॉर्ड अत्यंत जबरदस्त आहे. त्याने भारतासाठी ६५ सामन्यांत २३.२२ च्या सरासरीने ७२ विकेट्स घेतल्या आहेत.